**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७४

निर्णय दिनांक ०२-०६-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (कुलकर्णी), व्दारा- बुद्रुककर निवास, विद्यानगर, परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे – ०१ | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), पुणे – ०१ | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | प्रशासन अधिकारी, कार्यालय शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१ |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१ |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (कुलकर्णी) (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कार्यालय शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००६ ते डिसेंबर २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. आपल्या कार्यालयाकडे दि. १२-५-२००६ व दि. २२-७-०६ रोजी मी दिलेल्या निवेदनावर आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही अहवाला च्या सत्यप्रती.

२. सदर निवेदनावर कार्यवाही केली नसल्यास का केली नाही केंव्हा केली जाणार याबाबत माहिती द्यावी.

३. दप्तर दिरंगाई कायद्यानुसार दिलेल्या निवेदनावर किती दिवसात कार्यवाही करणे बंधनकारक आहे याबाबत दोषी अधिका-याचे संपूर्ण नाव व पदनाम द्यावे.

४. कै. लक्ष्मीबाई देशमुख महीला महाविद्यालय परळी-वै जि. बीड येथील शिक्षकेत्तर कर्मचा-याची बेकायदेशीर केलेली भरतीबाबत आपल्या कार्यालयाकडे दि. ०१-११-२००६ रोजी दिलेल्या तक्रारीवर आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत.

५. सदर महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या रोष्टरमध्ये केलेला बदल व जाहिरातीपूर्वीची मान्यता याबाबत दि. १-११-०६ रोजी दिलेल्या तक्रारीवर आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाही अहवालाची सत्यप्रत.

६. वरील सर्व निवेदन / तक्रारीवर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार किती दिवसात कार्यवाही करणे बंधनकारक आहे. याबाबत कार्यवाही केली नसल्यास दोषी अधिका-याचे संपूर्ण नाव पदनाम द्यावे. ”

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, “ उपरोक्त संदर्भांकिंत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण संचालनालयास दि. १२-५-२००६, दि. २२-७-२००६ व दि. १-११-२००६ रोजी सादर केलेले निवेदन / तक्रार यावर संचालनालय स्तरावरुन केलेली कार्यवाहीच्या सत्यप्रती पाठविण्यासाठी छायांकन व पोस्टेज खर्च रु. ४० /- इतका अपेक्षित आहे. तसे सदर खर्चासाठी रु. ४० /- चा धनाकर्ष मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे या नावाचा पुणे येथील बॅकेवर देय असलेला धनाकर्ष सादर करण्यात यावा. धनाकर्ष प्राप्त होताच सदर प्रती आपणास पोस्टाने पाठविण्यात येतील. ”

तथापि अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. या प्रकरणी दिनांक ११-१२-२००६ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एक मूळ माहितीसाठीचा अर्ज व दुसरा अपील अर्ज असे दोन वेगवेगळे अर्ज केले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास रुपये ४० इतके शुल्क जमा करण्यास सांगितले व अपील अर्जासाठी रुपये २५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयामध्ये जमा करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०२-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रुपये ५५ इतक्या रक्कमेचा भरणा केला. अपिलार्थीने आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करुनही त्यांना अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस खालील प्रमाणे कळविले आहे.

" उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण संचालनालयास दि. ११-१२-२००६ रोजी दोन माहिती अधिकार अर्ज सादर केलेले आहेत. त्यापैकी एक अपील अर्ज होता. सदर अपील अर्जाच्या माहितीबाबत आपणास रु. २५ /- भरण्याबाबत दि. २२-१२-२००६ अन्वये कळविण्यात आले होते व दुस-या अर्जातील माहिती बाबत आपणास रु. ४० /- पाठविण्याबाबत दि. ९-१-२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. आपण फक्त रु. २५ चे चलन सादर केले आहे. रु. ४० /- अद्यापपर्यत भरलेले नाहीत. त्यामुळे विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून सादर केलेला अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे. " सदर पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीचे या प्रकरणातील प्रथम अपील फेटाळले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची व दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना आवश्यक ते शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती पुरविली नाही.

तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी न घेता त्यांचे अपील फेटाळले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचा अपिलार्थीस माहिती न देण्याचा उद्देश प्रथमपासून नाही तसेच अपिलार्थीस माहिती न देण्याचा त्यांचा कधीही उद्देश नव्हता. अपिलार्थीने एकूण दोन अर्ज केले होते. त्यापैकी एक माहितीसाठीचा अर्ज होता व दुसरा दुस-या प्रकरणातील अपील अर्ज होता. माहितीसाठीच्या अर्जाकरिता रुपये ४० व अपील अर्जासाठी रुपये २५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने आयोगासमोर दाखल केलेल्या रुपये ५५ इतके शुल्क भरल्याची चलनाची प्रत दाखल केली आहे ती दुस-या माहिती अर्जाच्या संदर्भातील आहे. अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ते आता ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१२-२००६ रोजी दोन अर्ज केले होते व यापैकी एक माहितीसाठीचा अर्ज होता व दुसरा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अपील अर्ज होता. वास्तविकतः अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे केलेल्या अपील अर्जावर कोणतेही शुल्क लावण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रुपये २५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयास भरण्याचे का कळविले याचे कारण आजही उपस्थित जन माहिती अधिकारी देऊ शकत नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता

अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारली असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या माहितीची मागणी केली आहे तिचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्दयावर माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. या ६ मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक २, ३ व ६ मध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. ती माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी (माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च)) सुसंगत नाही त्यामुळे या ६ मुद्दयापैकी २, ३ व ६ संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. मात्र उर्वरीत मुद्दयावरील म्हणजे मुद्दा क्रमांक १, ४ व ५ शी संबंधीत माहिती माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अशा प्रकारची माहिती विनामूल्य देण्याची तयारी देखील दर्शविली आहे. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या अपील अर्जावरील शुल्काची मागणी करुन शिक्षण संचालकाकडून चुकीची कृती केली गेली आहे असे आयोगाचे मत आहे, किंबहुना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींची शिक्षण खात्यासारख्या महत्वाच्या खात्याला आवश्यक ती जाण नाही यासारखे कोणतेही दुर्दैव नाही असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, ४ व ५ ची संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी तसेच अपिलार्थीच्या अपील अर्जापोटी त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये २५ त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावेत. जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर कोणतीही माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगवशात अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक २, ३ व ६ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयावर शिक्षण संचालक यांनी विनाविलंब सखोल चौकशी करुन त्यावर आवश्यक ती कारवाई करावी अशी त्यांना आयोगाची शिफारस आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्याकडून अपील अर्जापोटी प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये २५ हे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावेत.

औरंगाबाद
दिनांक ०२-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (कुलकर्णी), व्दारा- बुद्रुककर निवास, विद्यानगर, परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कार्यालय शिक्षण

संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०४०

निर्णय दिनांक ०२-०६-२००८

श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, : अपिलार्थी
एन-९, ए-११५, ३२/३, शिवनेरी
कॉलनी, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, वैजापूर जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. शामलाल रतनसिंग छानवाल (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" ‘‘राष्ट्रीय कामासाठी धान्य कार्यक्रम’’ योजनेच्या कामावर उपस्थीत असलेल्या सर्व मजुरांच्या मस्टरच्या प्रतिलीपी (कुपन व रकमा वाटपासहीत) सत्यप्रती आणि सविस्तर माहिती मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून त्यांचा क्रमांक व वर्ष या अर्जामध्ये दिले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले आहे की, ‘‘वरील विषयी व आपले संदर्भिय अर्जानुसार आपण मागविलेली माहितीचे अधिकारा-खालील माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

‘‘ या कार्यालया अंतर्गत राष्ट्रीय कामासाठी धान्य कार्यक्रम योजने अंतर्गत सन २००५-२००६ मध्ये कुठल्याही प्रकारची कामे करण्यात आली नाहीत. त्यामुळे संबंधीत माहिती निरंक आहे. तरी माहितीस्तव रवाना.’’

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम

अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या सुनावणी इतिवृत्तानुसार अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे दिसून येत आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर होते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००६ रोजी माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या कडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये कामासाठी धान्य कार्यक्रमांतर्गत त्यांच्या कडे त्यांच्या विभागामार्फत कोणतेही काम झाले नसल्याची खोटी माहिती दिली त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेऊन त्यांना माहिती देण्याचे नाकारले. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती शास्ती लावण्यात यावी व त्यांना विनामूल्य माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ज्यावेळी अपिलार्थीने माहितीची मागणी केली होती त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते.

त्यावेळी श्री. सु. ना. नवले नावाचे अधिकारी कार्यरत होते. सदर माहिती अधिकारी आता दिनांक ३०-०६-२००७ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति असल्याबाबतचा कोणताही पुरावा जोडला नव्हता. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्यासंदर्भात रजिस्टर्ड पोस्टाने एक पत्र पाठविले होते. तथापि ते पत्र अपिलार्थीने स्विकारले नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता त्यांच्याबरोबर आणली असून ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेले टपाल का स्विकृत केले नाही असे विचारण्यात आले असता त्यांनी आयोगास असे उत्तर दिले की, ज्यावेळी पोस्टमन टपाल घेऊन त्यांच्याकडे गेला होता त्यावेळी ते त्यांच्या घरी उपस्थित नव्हते व काही कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपाल आले होते असे त्यांना त्यांच्या कुटूंबियांकडून समजल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वेळोवेळी हजर झाले परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. माहितीसाठीचा मूळ अर्ज करतांना त्यांनी दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र का जोडले नव्हते अशी त्यांना विचारणा केली असता सदर प्रमाणपत्र त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नव्हते असे त्यांनी आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करतांना ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे या अर्जामध्ये नमूद केले होते व दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या अनुक्रमांकाचा या अर्जामध्ये उल्लेख केला होता. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११-१०-२००५ रोजी जारी केलेले क्रमांक R.T.I.

2005/C.R. 315/05/5 च्या अधिसुचनेनुसार कोणत्याही अर्जदाराला जर ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असेल तर त्यांनी त्याप्रमाणे योग्य तो पुरावा त्यांच्या अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतू या प्रकरणी मुळात अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख करुनही याबाबतचा कोणताही ठोस पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला नव्हता ही बाब येथे प्रामुख्याने लक्षात घेतली पाहिजे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस गैरसमजुतीने चुकीची माहिती दिली असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि त्यांची चूक लक्षात घेता येथे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती घेऊन जाण्यासाठी दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या रजिस्टर्ड पोस्टाने कळविले होते. आज रोजी देखील उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत तर अपिलार्थी यांनी ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र आयोगासमोर मूळ प्रतीत सादर केले आहे. सदर प्रमाणपत्र त्यांना गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती फुलंब्री त्यांनी दिनांक ०२-११-२००६ रोजी (म्हणजेच त्यांनी मूळ अर्ज करण्यापूर्वीच्या तारखेचे) दिल्याचे दिसून येत आहे.

वरील परिस्थिती पाहता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर न करताही त्यांना विनामूल्य माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवूनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याबद्दल कोणताही ठोस

पुरावा उपलब्ध नाही हे पाहता व जन माहिती अधिकारी या संपूर्ण घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे दोषी असल्याचे आढळून न आल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०२-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर दगडू बोरसे, एन-९, ए-११५, ३२/३, शिवनेरी कॉलनी, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, वैजापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३३

निर्णय दिनांक ०२-०६-२००८

श्री. जयचंद्र श्रीकिसन मोदानी, : अपिलार्थी
रंगारहट्टी गोजरेगल्ली, पैठण, तालुका
पैठण जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय
आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जयचंद्र श्रीकिसन मोदानी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण श्री. आशूतोष दिगंबरराव चिंचाळकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.

प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय श्री. सोमनाथ गुंजाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे डिसेंबर २००६ ते २३-०४-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" नगरपरिषदेने डिसेंबर २००६ पासून आस्थापना व पगार बिले भत्ते इत्यादी सोडून किती धनादेश कोणाला किती रक्कमेचे दिले त्याची माहिती डिसेंबर २००६ ते २३-०४-२००७ पावेतो. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले अंतीम आदेश दिनांक ०३-०७-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशीत केले आहे.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविण्यात आली नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील दिनांक २४-०५-२००७ रोजी केले. या अपिलावर सुनावणी होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही. माहिती घेण्यासाठी ते संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उद्देशून उपमर्दकारक भाषा वापरली त्याबद्दल त्यांना योग्य ती समज देण्यात यावी. तदनंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २७-०७-२००७ रोजी माहिती पुरविली. सदर माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेल्या दिवसापासून म्हणजे दिनांक २९-०६-२००७ ते २७-०७-२००७ पर्यतच्या कालावधी करिता जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याची मागणी त्यांनी शेवटी आपल्या युक्तिवादामध्ये केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्याकरिता त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नव्हते. त्यांच्या कार्यालयात लेखा अधिकारी या पदावर लेख्याचा हिशोब ठेवण्याकरिता कोणत्याही विशिष्ट व्यक्तीची नेमणूक केलेली नाही, मात्र त्यांच्या कार्यालयात सहाय्यक लेखा अधिकारी हे पद मंजूर असून या पदावर तात्पूरत्या स्वरुपात आग्निशामक शाखेतील कर्मचा-यांना काम दिले जात आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये मुख्याधिका-याने त्यांना उपमर्दकारक भाषा वापरली असा उल्लेख केला आहे तथापि ते प्रकरण अपिलार्थीने माहितीचा अर्ज करण्यापुर्वीचे आहे.

अपिलार्थी हे ठेकेदार असून ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे काम मागण्यासाठी आले होते. याबाबत त्यांची विनंती मान्य न केल्याने त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे उपरोक्त प्रकरणी माहितीसाठीचा अर्ज केला. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतेही काम न दिल्या गेल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दिनांक ०३-०७-२००७ रोजी आपले आदेश पारीत केले व या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशीत केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती हे अत्यंत सोपे व मर्यादित स्वरुपाचे होते. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविणे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही परिस्थितीत अशक्य नव्हते. अपिलार्थीने मागितलेली माहिती नगरपालिकेच्या लेखा विभागाशी संबंधीत असून लेखा विभागामध्ये ठेवण्यात येत असलेल्या कॅशबुकाच्या पानाच्या सत्य झेरॉक्स प्रती जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्या असत्या तरी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकली असती. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०७-२००७ रोजी अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस त्यांनी प्रथम प्रतिसाद दिनांक २७-०७-२००७ रोजी देऊन त्या दिवशी अपिलार्थीस

आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अपुरे कर्मचारी असल्याबाबतचा त्यांनी केलेला युक्तिवाद आयोग मान्य करत नाही कारण या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही परिस्थितीत अवघड होते असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. कॅशबुकाच्या विशिष्ट भागाच्या विशिष्ट कालावधीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आलेल्या अपयशाचे कारण हे केवळ त्यांच्या इच्छाशक्तीचा अभाव हेच असू शकते. अपिलार्थीस माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीला कोणतेही समर्थनीय कारण आज रोजी उरत नाही हे येथे विशेष करुन ध्यानात घेणे गरजेचे आहे. हे पाहता असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण ६५ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील संबंधीत सहाय्यकाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस ६५ दिवस इतक्या विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी, संबंधीत माहिती त्यांना देण्यासाठी असलेले सर्व सहाय्यक / कर्मचारी हे जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये माहिती न देऊन त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. जन माहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची भरपूर संधी देऊनही ६५ दिवसाच्या विलंबाचे समर्थन ते करु शकले नाहीत. किंबहुना या विलंबाचे कोणतेही समर्थन असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७-०७-

२००७ रोजी संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगवशात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला मुद्दा की, अपिलार्थी हे ठेकेदार आहेत व त्यांना काम न दिल्याने त्यांनी आयोगाकडे हे व्दितीय अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी यांचा सदर मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (३) व ६ (२) च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक नागरिकास कोणत्याही कारणाशिवाय त्यांच्याकडे माहिती मागण्याचा अधिकार आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ६५ दिवसाच्या विलंबाप्रित्यर्थ विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये १६२५० /- (अक्षरी रुपये सोळा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारामध्ये जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये करावा.

“ लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”

३. सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७

दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जून २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून पुढे दरमहा, सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत, आयोगास पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक ०२-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जयचंद्र श्रीकिसन मोदानी, रंगारहट्‌टी गोजरेगल्ली, पैठण, तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७६

निर्णय दिनांक : ०३.०६.२००८

१ श्रीमती प.गं.कोदरकर, : अपीलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग
(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),
मंत्रालय, मुंबई-३२

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),
मंत्रालय, मुंबई-३२.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती प. गं.कोदरकर (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष श्री. ज्ञानदेव लक्ष्मण सुळ ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष श्रीमती स्मिता दत्तात्रय मंत्री ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १६.०१.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वातंत्र्यसैनिकाच्या अवलंबितास नोकरी देणेबाबत शासनाचे धोरणाबाबत सद्यस्थितीची माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" स्वा. सै. अवलंबितांना पसंतीक्रमानुसार नोकरी द्यायची असे आपले पत्र क्र.संकिर्ण २००५/७४६/प्र.क्र.१५५/०५/स्वासैकक्ष १ दि. ३.१.०६ द्वारे कळविले आहे. त्यानुसार-पसंती क्रमवारी कोणती आहे?

(त्याची अनुक्रमानुसार माहिती).

शासन ज्या प्रमाणे आरक्षणाची वेळोवेळी पडताळणी करुन घेते त्या प्रमाणे या पसंती क्रमाची अंमलबजावणी बाबत शासन तशी माहिती घेते काय ? तसेच स्वा.सै.अवलंबिताच्या पसंतीक्रमाचे बाबत शासनाचा स्वासै कक्षाची भुमिका काय आहे/असते. शासनाच्या साप्रविच्या दिनांक ४/३/९१ वा कुठल्याही परिपत्रका स्वासै अवलंबितासाठी परिक्षा पध्दती विहीत केलेली नसतांना काही ठीकाणी या प्रकारचा अवलंब होत आहे हे नियमास अनुसरुन आहे काय ?

(असल्यास तो नियम कोणता) स्वा.सै.स./त्याचे –पाल्यााचे अर्जास साप्रवि शा परिपत्रक दि. १८-१-९३ नुसार त्वरित कार्यवाही न करुन मिळाल्याने त्यांनी कुणाकडे दाद मागावी याबाबतची माहिती कळवावी."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २३.०१.२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये शासन निर्णय दि. ३१.५.१९९३ ची प्रत व शासन धोरणानुसार नोकरीसाठी पसंतीक्रमाचा तपशील कळवून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे संदर्भित केलेल्या शासन सामान्य प्रशासन विभागाच्या दि.४.३.१९९१ च्या परिपत्रकात परिक्षा पध्दती विहित केली नसल्याचे कळविले.

तथापि मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०१.०३.२००६ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही, जी माहिती दिली ती चुकीचे विश्लेषण करुन दिले असल्याचे नमुद केले आहे. अपिलार्थीने दाखल केलेल्या सदर अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून आले नाही. सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण स्पष्टीकरणासह पाठविली असल्याने व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्याअगोदरच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल केले असल्याने, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर सुनावणी घेतली नाही, असे कारण त्यांनी द्वितीय अपील करण्याचे कारण म्हणून या अर्जामध्ये दर्शवून त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे ज्या वेळी प्राप्त झाला त्यावेळी ते या पदावर कार्यरत

नव्हते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीचा प्रथम अर्ज दि. २३.१.२००६ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी त्यांचेकडील दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे अपेक्षित माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. तसेच अपिलार्थी या माहितीच्या अधिकारात एकाच विषयावर वेळोवेळी माहितीची मागणी करीत असतात. अपिलार्थीच्या आतापर्यंतच्या माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या सर्व अर्जावर त्यांचेकडून यथायोग्य उत्तर व शासन निर्णयाच्या प्रती । पाठविण्यात आल्या आहेत. अपिलार्थीस शासन निर्णयातील एखाद्या व्याख्येचा अथवा शब्दाचा विपर्यास करुन वारंवार अर्ज करण्याची सवय असल्याचे त्यांच्या पत्रव्यवहाराच्या वारंवारितेवरुन दिसून येते. अपिलार्थीच्या अवलंबितास शासकीय सेवेत नेमणूक प्राप्त करुन घ्यावयाची असल्याने ते माहितीच्या अधिकाराचा वापर करुन त्यांना नोकरी प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.३.२००६ रोजी अपेक्षित माहिती संपूर्णरित्या पुरविली असल्याने व अपिलार्थी या वयोवृध्द महिला असल्याने त्यांना अपिलार्थीस मुंबई येथे सुनावणीसाठी बोलावणे त्यांना संयुक्तिक वाटले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १६.१.२००६ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागविली आहे. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना २३.१.२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जामध्ये अपिलार्थीने विचारलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.३.२००६ च्या पत्राद्वारे दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेल्या सदर माहितीतील मुद्दे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी

सुसंगत नसूनही, त्यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांची भूमिका स्पष्ट करणारे पुरेसे स्पष्टीकरण पुरविले गेले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडून प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी अशा प्रकारची बहुतांश माहिती विचारली आहे. माहिती अधिकायाची या प्रकरणातील भूमिका ही त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीची जपवणूक करणाया विश्वस्ताची आहे. या माहितीसंदर्भातील कोणत्याही कृतीची, निर्णयाची कारणमिमांसा करणे, अपिलार्थीच्या प्रश्नास उत्तरे देणे व आपले अभिप्राय व्यक्त करणे हे माहिती अधिकाराखाली माहिती देणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. या माहितीमधील प्रत्येक निर्णय वेगवेगळया टप्प्यावर काही विशिष्ट प्रक्रियेचा अवलंब करुन घेतलेले असतात त्यामुळे मूळात अपिलार्थीने मागितलेली 'माहिती' हा माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाचा विषय होऊ शकत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्या भूमिकेचे स्पष्टीकरण देऊन सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती यांचेकडून अधिनियमामध्ये विहित केलेल्या मुदतीचे उल्लंघन झालेले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस २२ दिवसांच्या विलंबाने दिली आहे व माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली ही माहिती विनामूल्य पुरविली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांना असे सूचित करण्यात येते की, यापुढे त्यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय घेण्याची दक्षता बाळगावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आता आवश्यक ते स्पष्टीकरण त्यांच्या पत्राद्वारे दिले असल्याने व सदर स्पष्टीकरण अपिलार्थीच्या मूळ मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आढळून आले असल्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती

आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक 	०३.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती प.गं.कोदरकर,द्वारा श्री. अकोलकर ३३ (अ) रेणूका, छत्रपतीनगर गारखेडा परिसर औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९२

निर्णय दिनांक : ०३.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती प.गं.कोदरकर,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा अवर सचिव,<br>सामान्य प्रशासन विभाग<br>(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),<br>मंत्रालय, मुंबई-३२ | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपसचिव,<br>सामान्य प्रशासन विभाग,<br>(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),<br>मंत्रालय, मुंबई-३२. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती प. गं.कोदरकर(त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष श्री. ज्ञानदेव लक्ष्मण सुळ (त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग,

स्वातंत्र्य सैनिक कक्ष श्रीमती स्मिता दत्तात्रय मंत्री ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २९.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून केंद्राचे सन्मान निवृत्ती वेतन मिळणेबाबत केलेल्या अर्जांच्या सद्यस्थितीची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) मंत्रालयात स्वा. सै.च्या केंद्राच्या सन्मान निवृत्ती मिळणे बाबत अर्ज प्राप्त झाल्यावर त्या वर किती दिवसात कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

२) मी दि. १०.४.९१ आणि दिनांक ५-२-०५ रोजी शासनास जवाबी रजिस्ट्रीने पाठविलेल्या अर्जावर प्रथम तो कुण्या अधिकाऱ्याकडे पोहोचला नंतर तो कुण्या अधिकाऱ्याकडे किती वेळ राहिला, संबंधित अधिकाऱ्याने त्यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्यावर त्या वर कोणती कार्यवाही केली - तसेच त्यांची नांवे व पदे द्या.

३) स्वा सै च्या शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या वृध्दावस्थेतील आर्थिक सहाय्याबाबत केंदाच्या सन्मान निवृत्ती मिळणेबाबत वेळीच कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही होवू शकते काय? असे असल्यास अशी कार्यवाही केव्हा करण्यांत येईल.

४) माझ्या दि. १०.४.९१ आणि दि. ५.२.०५ बाबत वेगवेगळी माहिती द्यावी.

५) अधिकाऱ्यांच्या वेळीच कार्यवाही न करण्याच्या प्रवृत्ती मुळे होवू घातलेले आर्थिक नुकसान कधी भरुन निघणार आहे, याबाबतच्या कार्यवाहीची माहिती द्यावी.

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन जिल्हाधिकारी, बीड यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविले.

जन माहिती अधिकारी यांचेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.०६.२००६ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही, तथापि त्यांचेकडील दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी बीड यांचेकडून मागविलेला खुलासा प्राप्त होताच अपिलार्थीस उत्तर पाठविण्यात येईल, असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१०.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीसाठी प्रथम अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे केला, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांनी दि. १०.४.९१ व दि. ०५.०२.२००५ रोजी शासनास सादर केलेल्या अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने केलेल्या या अर्जावर राज्य शासनाने काय कार्यवाही केली याची माहिती अपिलार्थीस त्यांनी याच विषयावर त्यांच्या दि. १.३.२००६ रोजी केलेल्या वेगळया अर्जाच्या अनुषंगाने दि.१.४.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे. तसेच त्यांच्या दि. ५.२.२००५ रोजीच्या अर्जासंदर्भातील सामान्य

प्रशासन विभागाने केलेल्या कार्यवाहीची कल्पना त्यांनी, अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १९.६.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे. म्हणजेच अपिलार्थीस दि. १०.४.१९९१ व दि. ५.२.२००५ च्या अर्जावर केलेली कार्यवाही अपिलार्थीस सामान्य प्रशासन विभागाने दोन वेगवेगळया पत्राने अवगत करुन दिली आहे. या वस्तुस्थितीमुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील माहिती पुन्हा पुरविली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी या वयोवृध्द महिला असल्याने त्यांना सुनावणीसाठी मुंबई येथे बोलावणे संयुक्तिक न वाटल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.५.२००६ रोजीच्या विचाराधीन अर्जाद्वारे मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद या दोन्ही बाबी भिन्न आहेत. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकूण पाच मुद्यांवर माहिती मागितली असून, त्यापैकी मुद्दा क्र. ३ व मुद्दा क्र.५ मध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रश्नार्थक स्वरुपातील व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते. सदर माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जावर मुद्दा क्र. ३ व ५ ची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. मात्र उर्वरित तीन मुद्यांची माहिती (मुद्दा क्र. १,२ व ४) जन माहिती अधिकारी यांचेकडून अनुत्तरीत राहिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या स्वातंत्र सैनिक कक्षाशी संबंधित होती. तर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती बीड जिल्हाधिकारी यांचेकडून मागितली, यावरुन संबंधित जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे वाचन देखील नीटपणे केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जर नीट अवलोकन केले असते तर, अपिलार्थी यांनी मागितलेली ती माहिती त्यांना देणे सहज शक्य झाले असते. अपिलार्थीने विचाराधीन अर्जाद्वारे मागितलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून वेगळया संदर्भात दिली गेलेली कथित माहिती हे दोन्ही विषय पूर्णतः भिन्न असून एका माहितीचा दुसऱ्या माहितीशी कोणत्याही प्रकारे संबंध पोहोचत नाही. मूळात अपिलार्थीने मागितलेली माहिती, त्यांना दुसऱ्या संदर्भात पुरविली गेली असल्याने, आता ती माहिती देण्याची गरज नाही, हे जन माहिती अधिकारी यांचे गृहीतक बरोबर नाही. माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत केलेल्या प्रत्येक माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, जरी ती माहिती दुसऱ्या कोणत्याही इतर संदर्भाने अर्जदारास पुरविली गेली असली तरी, माहितीच्या विचाराधीन अर्जासंदर्भात त्यांना ही माहिती अपिलार्थीस वेगळयाने देणे बंधनकारक आहे. अर्जदारास माहिती देतांना कोणत्याही प्रकारचे गृहीतक जन माहिती अधिकारी यांनी मनात धरुन अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेणे, अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिली नसल्याचे सिध्द होत आहे. या प्रकरणामध्ये अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, सचिव सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष) यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या अशाप्रकारच्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे त्यांचेवर यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन आपला अनुपालन अहवाल त्यानंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष) यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या अशाप्रकारच्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन आपला अनुपालन अहवाल त्यानंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती प. गं. कोदरकर, ३३ (अ) रेणूका द्वारा श्री. अकोलकर, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग,(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),

मंत्रालय, मुंबई-३२. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४५

निर्णय दिनांक : ०३.०६.२००८

१ श्री. दत्ता पाटील काकडे, : अपीलार्थी

रा. टाकळी कोलते, ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग
(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),
मंत्रालय, मुंबई-३२

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
(स्वातंत्र्य सैनिक कक्ष),
मंत्रालय, मुंबई-३२.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दत्ता पाटील काकडे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष श्री. ज्ञानदेव लक्ष्मण सुळ ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष श्रीमती स्मिता दत्तात्रय मंत्री ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक नसलेल्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वातंत्र्य सैनिक प्रमाणपत्राबाबत त्रयस्थ पक्षासंबंधी खालीलप्रमाणे मागितली होती.

‘ १) मनकरणाबाई काशिनाथ चव्हाण रा. धानोरा पो.टाकळी कोलते ता.भोकरदन जि.जालना.

२) श्री. तेजराव किसन कोलते रा. टाकळी कोलते पो. टाकळी को. ता.भोकरदन जि.जालना

३) यमुनाबाई सारंगधर कोलते मु. रिधोस पो. टाकळे कोलते

या तिघांचे स्वातंत्र्य सैनिक संचिकांच्या झेरॉक्स प्रति पाहीजेत.

अपिलार्थीच्या या अर्जावर अपिलार्थीने दिनांकाचा उल्लेख केला नाही, तथापि अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ११.६.२००७ रोजी प्राप्त झाला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २.८.२००६ व १५.९.२००६ च्या पत्रान्वये आवश्यक ते शुल्क रु. २४४/- भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने दि. २७.९.२००६ रोजी सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात केला व दि. २८.९.२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांचेतर्फे देण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.११.२००६ रोजी प्रथम अपील सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपीलाची नोंद राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. १५.१.२००७ रोजी झालेली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी श्रीमती मनकर्णाबाई काशिनाथराव चव्हाण यांच्या स्वातंत्र्य सैनिक प्रकरणाच्या मूळ संचिकेच्या प्रतीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे श्रीमती मनकर्णाबाई काशिनाथराव चव्हाण, श्री.तेजराव किसन कोलते व श्रीमती यमुनाबाई सारंगधर कोलते या तीन स्वातंत्र्यसैनिकाचे संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून मागितली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून प्रथमतः रु. २४४/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरल्यानंतर श्री. तेजराव कोलते व श्रीमती यमुनाबाई कोलते यांचेबद्दलची माहिती प्राप्त झाली तथापि, श्रीमती मनकर्णाबाई चव्हाण यांचेविषयी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली नाही. या संदर्भात पत्रव्यवहाराद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठपुरावा केल्यानंतर श्रीमती मनकर्णाबाई चव्हाण यांची माहिती पुरविण्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रक्कम रु. ६६/- भरण्याचे सूचविले. सदर रकमेचा भरणा करण्याकरिता ते सामान्य प्रशासन विभागात गेले असता, त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीची नस्ती सामान्य प्रशासन विभागात उपलब्ध नसल्याचे समजले. त्यांना या नस्तीची आजही आवश्यकता आहे. सदर नस्तीचा क्रमांक 'पीओएस-१२००/जालना/प्र.क्र.३४४/२०००/स्वासैक-२' असा आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये एकूण तीन व्यक्तींच्या संदर्भात माहिती मागितली

होती. यापैकी अपिलार्थीच्या अर्जामध्ये नमुद केलेल्या क्र. २ व क्र. ३ च्या व्यक्तींसंदर्भातील माहिती अपिलार्थीस, त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क घेऊन दि. २८.९.२००६ रोजी पुरविली आहे. तथापि त्यातील श्रीमती मनकर्णाबाई काशिनाथराव चव्हाण यांच्या संबंधी माहिती त्यांच्या विभागात उपलब्ध नसल्याने त्यांनी ही माहिती जिल्हाधिकारी, जालना यांचेकडून मागवून दि. ०६.१२.२००६ रोजी अपिलार्थीस हस्तांतरित केली. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये संदर्भित केलेली नस्ती आज रोजी त्यांच्या विभागामध्ये उपलब्ध नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,अपिलार्थीच्या दि. २०.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांनी आपला निर्णय अपिलार्थीस दि. ६.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविला आहे. या निर्णयामध्ये श्रीमती मनकर्णाबाई चव्हाण यांच्या प्रकरणाशी संबंधित उपलब्ध सर्व कागदपत्रे अपिलार्थीस दि. १२.९.२००६ रोजी पाठविल्याचे नमुद करुन दि. ६.१२.२००६ रोजीच्या पत्राबरोबर त्यांनी पुन्हा श्रीमती मनकर्णाबाई चव्हाण यांची माहिती अपिलार्थीस कळविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मूलतः जन माहिती अधिकारी यांचेकडे ज्या प्रकारे माहिती मागितली आहे, त्यावरुन अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्या प्रथम अर्जात उल्लेखिलेल्या स्वातंत्र्यसैनिकाच्या नस्तीच्या सर्व पृष्ठांच्या झेरॉक्स प्रत अपिलार्थीस देण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे त्यांनी दोन व्यक्तींच्या संदर्भात अपिलार्थीस माहिती दिली आहे. परंतु श्रीमती मनकर्णाबाई चव्हाण यांची माहिती ज्या नस्तीमध्ये आहे व ज्या नस्तीचा उल्लेख अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये केला आहे, ती नस्ती आज रोजी सामान्य प्रशासन विभागाकडे उपलब्ध नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे

आहे. अपिलार्थी यांना सदर माहितीची कोर्ट प्रकरणी आवश्यकता असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी उल्लेखिलेल्या नस्तीचा परत एकदा त्यांचेकडील अभिलेख कक्षामध्ये शोध घ्यावा व जर सदर नस्ती त्यांचे विभागाकडून नष्ट करण्यात आली असेल तर, त्याप्रमाणे अपिलार्थीस तसे प्रमाणपत्र द्यावे, जेणेकरुन अपिलार्थी यांचा प्रश्न सोडवण्यास मदत होईल, तसेच अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरण्यासाठी गेले होते, तथापि ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात संबंधित नस्ती उपलब्ध नसल्याने, भरले गेले नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सदर माहिती अधिनियमातील कलम ७(६) अन्वये विनामूल्य द्यावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांचे युक्तीवादामध्ये संदर्भित केलेल्या नस्तीमधील सर्व पृष्ठांची झेरॉक्स प्रत हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती ३० दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्ता पाटील काकडे,रा. टाकळी कोलते, ता.भोकरदन, जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०४

निर्णय दिनांक : ०३.०६.२००८

१ श्री. दत्तात्रय पंडितराव काळे, : अपीलार्थी

रा. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यशाळा जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यशाळा जि.लातूर

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दत्तात्रय पंडितराव काळे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित श्री. अशोक रामचंद्रराव येरमाळकर ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित श्री. दत्तात्रय दिगांबर हामंद

( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे त्यांचे विधी सल्लागार ॲड. के. जी. साखरे यांचेसह हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील माहे १८.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे तीन कर्मचाऱ्यांची सेवाविषयक माहिती मागितली होती.

" १) श्री. साबदे (कनिष्ठ अभियंता किल्लारी) यांची Appointment order व Service Book ची नक्कल, हा नौकरीला लागल्यापासून कुठे कुठे, कोणत्या-कोणत्या ठिकाणी, किती ते किती तारखेपर्यंत नौकरीला होता. याची माहीती नक्कल.

२) श्री. सोरडे (हरंगुळ युनिट) यांची Appointment order व Service Book ची नक्कल याची , सद्या तो हरंगुळ युनिट येथे तो कोणत्या पोष्टवर नौकरीस आहे, व कधीपासुन, किती तारखेपासुन तो त्या पोष्ठवर नौकरी करीत आहे, याची माहीती नक्कल , तो हरंगुळ युनिटला किती तारखेला बदलुन आला आहे, व किती वर्षापासुन तो हरंगुळ युनिट येथे नौकरीला आहे. नि यापुर्वी त्याची डयुटी कोठे कोठे व कोणत्या कोणत्या गावी किती ते किती तारखेपर्यंत होती, याची माहीती नक्कल.

३) श्री. शेटे लाईनमन (हरंगुळ युनिट) याची Appointment order व Service Book ची नक्कल याची , यापुर्वी तो कुठे कुठे, कोणत्या-कोणत्या गावी व किती ते किती तारखेपर्यंत नौकरीला होता. याची माहीती नक्कल, हा नौकरीला लागल्या पासुन तो हरंगुळ युनिटला डयुटीवर कोणत्या आधारावर, किती तारखेला बदलुन आला आहे. आणि तो हरंगुळ युनिट येथे किती तारखेपासुन किती वर्षापासुन नौकरीला आहे. नि इतक्या वर्षापासुन तो

एकाच ठिकाणी हरंगुळ युनिट येथे कसा काय डयुटीवर आहे. त्याचे नेमके काय कारण आहे, याची माहीती नक्कल.

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २०.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी शुल्क रक्कम रुपये ६०/- यांच्या कार्यालयात भरण्याविषयी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थी यांनी दि. १४.२.२००७ रोजी त्यांचे कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. १५.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. १४.२.२००७ रोजी पावती क्र. १२५१८५३ द्वारे रु. ६०/- इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.०२.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६०३.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १०.०४.२००७ रोजी पारित केले. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपिल अंशतः फेटाळले असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे कार्यालयात बोलावून संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका दाखविण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दि. ०५.०६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ठरलेल्या मुदतीत माहिती दिली नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमुद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, श्री. साबदे यांच्या नेमणूकीचे आदेश व श्री. शेटे व श्री. सोरडे यांच्या सेवापुस्तिकांच्या पूर्ण नकला त्यांना प्राप्त झाल्या नाहीत. श्री. शेटे हे २१ वर्ष हरंगुळ युनिट येथे कार्यरत असल्याचे कारण विचारले असून प्रशासकीय कारणावरुन बदली केली नाही, असे कारण सांगून त्यांना टोलवाटोलवीचे उत्तर जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाले. त्यांनी लेखी स्वरुपात माहिती अपेक्षिली असतांना देखिल त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीची पाहणी करण्याचे सूचविले. तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून जी माहिती प्राप्त झाली ती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाली नाही. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी २७ दिवस इतक्या विलंबाने दिली होती. जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना आवश्यक ती माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कालावधीपेक्षा विलंबाने प्राप्त झाल्यामुळे त्यांचेविरुध्द कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांनी दि. १५.२.२००७ रोजी अपिलार्थीकडून रु.६०/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरुन घेऊन, दिलेली आहे.अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये नमुद केलेले श्री. साबदे यांचे नेमणूक आदेश व श्री. सोरडे व श्री. शेटे यांच्या सेवापुस्तिका यांच्या संपूर्ण नकला त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या आहेत. या उप्परही अपिलार्थीस काही माहिती हवी

असल्यास त्यांचे कार्यालयातील संबंधित नस्त्या, अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलात उपस्थित केलेले मुद्दे त्यांनी प्रथम अपिलाचे सुनावणीचे वेळी मांडले असते, तर त्या मुद्यांचे जन अपिलीय अधिकारी यांचेकडेच निराकरण झाले असते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज दि. १८.९.२००६ रोजी केला होता, त्यामुळे अधिनियमातील विहित तरतुदींनुसार अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती दि. १७.१०.२००६ पर्यंत प्राप्त होणे या प्रकरणी अभिप्रेत होते. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीचा भंग केल्याचे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीवरील त्यांचे अभिप्राय जन अपिलीय अधिकारी यांना दि. १६.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते, त्यामध्ये त्यांनी श्री. साबदे यांचे नेमणूक आदेश आणि श्री. सोरडे व श्री. शेटे यांच्या सेवापुस्तिकाच्या नकला दिल्या नसल्याचे त्यांचे निदर्शनास आणून दिले होते. आज रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये श्री. साबदे यांचे नेमणूक आदेश आढळून आले नाहीत. मात्र श्री. साबदे, श्री. शेटे व श्री. सोरडे यांच्या सेवापुस्तिकांच्या झेराक्स प्रती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविली नाही व जी माहिती अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क त्यांचेकडे भरणा केल्यानंतर दिली ती अपूर्ण असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन व अर्धवट माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव

स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देता अधिनियमातील विहित केलेला कालावधी उलटून गेल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी शुल्क घेण्याची जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाल्यामुळे त्यांना अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे अपिलार्थीस द्यावयाची माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती १५ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर यथायोग्य

प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०३.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय पंडितराव काळे, 'काळेभवन', २३/११, पापविनाश रोड, महावीर चौक, लातूर, जि. लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, लातूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड,५ वा मजला, वांद्रा (पूर्व) मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८७७

निर्णय दिनांक ०४-०६-२००८

श्री. दे. म. अकोलकर, : अपिलार्थी
३३ (अ) "रेणुका" छत्रपतीनगर,
गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
सामान्य प्रशासन विभाग (सेवा
उपविभाग), मंत्रालय, मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
सामान्य प्रशासन विभाग (सेवा
उपविभाग), मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२
जन अपिलीय अधिकारी : उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दे. म. अकोलकर हे गैरहजर

आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय श्री. प्रताप वसंतराव चव्हाण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय श्री. श्रीकांत प्रभाकर पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सद्यस्थितील सेवाविषयक संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ कर्मचारी पद भरतीबाबत आपला विभाग राज्यातील सर्व विभागांना निर्देश देतो तो निर्देश पाळणे राज्यातील सर्व विभागास बंधनकारक आहे वा नाही प्रशासन सुधारणा समितीचा राज्य शासनाने अहवाल स्विकारुन त्या अनुषंगाने राज्यात सर्व राजपत्रित पदे ५० टक्के पदोन्नतीने आणि ५० टक्के नामनिर्देशित पध्दतीने भरली जावीत तर सर्व अराजपत्रित पदे ७५ टक्के पदोन्नतीने तर २५ टक्के नामनिर्देशीत पध्दतीने भरली जावीत जेणेकरुन प्रशासनास नव्या दमाचे मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकेल असा आशयाचा दिनांक २६-३-१९७० रोजी साप्रविने परिपत्रक क्रमांक एसआरव्ही SRV-1069-D काढले आणि सर्व विभागांनी त्यांच्या खात्यांतर्गत पदाचे भरती नियमात त्याप्रमाणे सुधारणा करुन घ्यावी असेही निर्देश दिलेत - <u>हे निर्देश पाळणे शासनाच्या सर्व विभागास बंधनकारक आहे वा कसे - असल्यास ज्यांनी ते पाळले नाही त्यांचे काय आणि नसल्यास ते जर पाळीत नसतील तर मग शासनाच्या साप्रविने निर्देश देण्याचे प्रयोजन काय हे जाणून घेणे आहे. तसेच ज्यांनी याबाबत अंमलबजावणी केली नाही त्यांचे कडून तात्काळ</u>

अंमलबजावणी करुन घेणार आहे वा कसे याची माहिती घेणे - असा साप्रविस अधिकार आहे काय हे जाणून घेणे आहे. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, “शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २६-०३-१९७० नुसार प्रशासकीय पुनर्गठन समितीने केलेल्या शिफारसी सर्व मंत्रालयीन विभागांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रक सेवा प्रवेश नियम तयार करण्याच्या प्रक्रियेतील मार्गदर्शनपर / सूचनावाचक परिपत्रकाचा एक भाग आहे. शासकीय पदांचे सेवा प्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतरच अंतिम केले जातात. क्ष्यामुळे सेवा प्रवेश नियमास अंतिम मान्यता देताना त्यातील भरतीचे मार्ग व त्यांचे प्रमाण याबाबत विभागाचे समर्थन (पदोन्नतीची साखळी, त्या पदाच्या कनिष्ठ व वरिष्ठ पदावरील मंजूर पद संख्या, कर्तव्ये व जबाबदा-या,इ. बाबी लक्षात घेऊन) विचारात घेऊन सेवा प्रवेश नियम संबंधीत प्रशासकीय विभागाकडून मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर अंतिमतः निर्गमीत केले जातात. ही सर्व कार्यवाही नियुक्ती अधिका-यांच्या प्रशासकीय विभागांनी करावयाची आहे. ”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अपील अर्ज परिपूर्ण नसल्यामुळे व अपील ३० दिवसात केले नसल्यामुळे फेटाळला आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व त्यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी अशी आहे. ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस त्यांची भूमिका स्पष्ट करणारे पत्र दिनांक २५-०१-२००६ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पाठविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जावर निर्णय प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ३० दिवसाच्या आत प्रथम अपील करणे भाग होते. तथापि या प्रकरणी

अपिलार्थीने दिनांक ०२-०३-२००६ रोजी म्हणजेच मुदत व्यपगत झाल्यानंतर त्यांच्या कडे प्रथम अपील केले आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाची अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांची भूमिका दिनांक २५-०१-२००६ रोजी स्पष्ट केली असल्यामुळे त्यानी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेता अपिलार्थीचा अपील अर्ज फेटाळला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ''माहिती'' या शब्दाच्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. माहिती या शब्दाची व्याख्या माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

**कलम २ (च)**

''माहिती'' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेली माहिती ही वरील व्याख्येशी विसंगत असल्याचे सहज लक्षात येते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेचा प्रथम विचार करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी हे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे विश्वस्त म्हणून कार्यरत असतात. जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेली माहिती त्या स्वरुपात उपलब्ध आहे ती जशीच्या तशी अर्जदारास देणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर अभिप्राय देणे अथवा स्वतःचे मत प्रदर्शित करणे हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अपेक्षित नाही.

माहिती या शब्दाची व्याख्या आणि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारलेली माहिती व आयोगाचे वरील अभिप्राय यांचे अवलोकन करता सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध असणार नाही हे स्पष्ट आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देश पाळणे शासनाचे सर्व विभागास बंधनकारक आहे वा कसे, असल्यास ज्यांनी ते पाळले नाही त्यांचे काय, शासनाचा सामान्य प्रशासन विभागाने निर्देश देण्याचे प्रयोजन काय, ज्यांनी याबाबत अंमलबजावणी केली नाही त्यांच्याकडून तात्काळ अंमलबजावणी करुन घेणार आहे किंवा कसे अशा प्रकारची भविष्यातील देखील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. अशा प्रकारची माहिती हा सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय निर्णय प्रक्रियेचा अथवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेच्या पार्श्वभूमीचा एखादा भाग अप्रत्यक्षरित्या असू शकतो, मात्र तो माहिती या स्वरुपात संबंधीत विभागाकडे उपलब्ध असू शकत नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०९-२००  च्या पत्रान्वये दिलेले उत्तर आयोगास सुसंगत वाटत आहे. वास्तविकतः अपिलार्थीस त्यांनी आपली भूमिका

स्पष्ट करण्याची काहीही आवश्यकता नसतांनाही त्यांनी अपिलार्थीस जास्तीत जास्त खुलासा देऊन अपिलार्थीच्या प्रथम अर्जात केलेल्या मागणीस विहित मुदतीत सकारातमक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत आहे त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळणे योग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०४-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दे. म. अकोलकर, ३३ (अ) ''रेणुका'' छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०५

निर्णय दिनांक ०४-०६-२००८

श्री. पटेल शेख अहेमद महंमद अब्दुल हफीज, : अपिलार्थी
रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, हजरत उमर
फारुक उर्दु हायस्कूल, मिल्लतनगर,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, हबीबीया वेल्फेअर ॲण्ड
एज्युकेशन सोसायटी, मार्फत हजरत
उमर फारख उर्दु हायस्कूल,
मिल्लतनगर, नांदेड

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पटेल शेख अहेमद महंमद अब्दुल

हफीज (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत उमर फारुक उर्दु हायस्कूल व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हबीबीया वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " आपल्या हायस्कूल येथे कार्यरत असलेल्या एकूण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नावाची यादी तसेच त्यांची नेमणूक दिनांक कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांचे शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र व त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती तसेच त्यांना कायम नियुक्ती करण्यासाठी सदरील शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची सत्यप्रत, मुलाखत घेणा-या संचालक मंडळाच्या शे-याची सत्यप्रत तसेच कायम स्वरुपी नियुक्तीसाठी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या सत्यप्रती मिळणेबाबत तसेच सध्या आपल्या शाळेत किती पदे रिक्त आहेत व ती पदे केव्हा भरावयाची आहेत याची लेखी माहिती मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपील अर्जाची रजिस्ट्री जाणून बुजून परत केली.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०४-२००७ रोजी केलेल्या अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी घेतली नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही आजच्या सुनावणीस त्यांना लेखी व दूरध्वनीव्दारे सूचना देऊनही गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १६-०४-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली होती त्या माहितीतील - ती पदे केव्हा भरावयाची आहेत - हा भाग वगळता उर्वरीत सर्व माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम ३ अन्वये प्रत्येक नागरिकास कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क आहे. अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे, ती शासन अनुदानित शैक्षणिक संस्था आहे त्यामुळे सदर संस्था ही शासकीय प्राधिकरण ठरत आहे. सबब अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविणे हे या संस्थेतील जन माहिती अधिकारी (संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक) यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ प्रमाणे अनिवार्य आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज व प्रथम अपील अर्जास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. एवढेच नव्हे तर त्यांना आज रोजीच्या सुनावणीस हजर राहण्याची आयोगातर्फे लेखी व दूरध्वनीव्दारे दिनांक १४-०५-२००८ रोजी दुपारी १२-३५ वाजता श्री. एस. एम. पसरवाड प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्यामार्फत कळवूनही त्यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर हजर नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीस जाणून बुजून गैरहजर राहून त्यांच्यातील बेपर्वाई व बेशिस्तीचे पूरेपूर दर्शन घडविले आहे असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हजरत उमर फारुक उर्दू हायस्कूल यांना विहित मुदतीत देणे भाग होते तथापि आता विहित कालावधी व्यपगत झाल्यामुळे त्यांना अपिलार्थीस आता अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती द्यावी लागेल. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या सुनावणीस दिलेला प्रतिसाद पाहता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत देण्यासाठी त्यांनी संबंधीत मुख्याध्यापकास भाग पाडावे व आवश्यक वाटल्यास संबंधीत शिक्षण संस्थेचे अपिलार्थीने अर्ज केलेल्या माहितीशी संबंधीत सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात मागवून घेऊन अपिलार्थीस माहिती मिळण्याप्रित्यर्थ सहकार्य करावे. जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ केली गेली, चुकीची माहिती दिली गेली व विहित मुदतीत माहिती दिली गेली नसल्याचे त्यांना आढळले तर संबंधीत संस्थेवर प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई त्यांनी करावी असेही त्यांना या ठिकाणी आदेशीत करण्यात येत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांना रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पटेल शेख अहेमद महंमद अब्दुल हफीज, रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत उमर फारुक उर्दु हायस्कूल, मिल्लतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हबीबीया वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, मार्फत हजरत उमर फारख उर्दु हायस्कूल, मिल्लतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०६

निर्णय दिनांक ०४-०६-२००८

श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर, : अपिलार्थी
एन. डी. ४२, जे-३-५३-६ "सत्यम"
विद्यानिकेतन हायस्कूलसमोर, हडको,
नवीन नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपसंचालक, आरोग्य सेवा
(शुश्रुशा), सेंट्रल बिल्डींग, पुणे-०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहसंचालक, आरोग्य सेवा
(आरोग्य), सेंट्रल बिल्डींग, पुणे-०१

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर, जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुशा) व जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) हे सर्व गैरहजर आहेत.

आज रोजी होणा-या सुनावणीसाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगाकडील दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये लेखी कळविले होते, तसेच आजच्या सुनावणीस हजर राहण्याचे निर्देश आयोग कार्यालयाने संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १४-०५-२००८ रोजी दूरध्वनीव्दारे दिले होते. सदर निर्देश सह संचालक यांच्या कार्यालयातील सहाय्यक अधीक्षक श्रीमती एल. एच. खांडके यांच्यामार्फत उपसंचालक श्रीमती मंदाकिनी मेघ यांना दिले होते. आयोगाने लेखी व तोंडी सूचना देऊनही संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस गैरहजर राहून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेशिस्त वर्तनाची सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी चौकशी प्रकरणातील त्यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मिळण्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपणास मा. संचालक (आरोग्यसेवा) मुंबई – १ यांच्या आदेशाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा नांदेड अंतर्गत करार पध्दतीवर चुकीची नेमणूक करणेबाबतची चौकशी देण्यात आली होती, त्या चौकशीसाठी आपण १ ऑगस्ट ०५ रोजी नांदेड येथे येऊन चौकशी केलेली आहे. तरी आपणकेलेल्या चौकशी अहवालाची सत्यप्रत (True Copy) देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास त्यांच्याकडील दिनांक ०५ जून २००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, "संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांच्या आदेशान्वये सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा नांदेड अंतर्गत करार पध्दतीवर चुकीची नेमणूक करणेबाबतची चौकशी करण्यात आलेली असून अंतिम अहवाल मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे."

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी अपिलाचे कारण म्हणून चौकशी अहवालाची सत्यप्रत देण्यात आली नसल्यामुळे व दिशाभूल करणारा निकाल दिल्यामुळे असे दिले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, "सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा नांदेड करार पध्दतीवर चुकीची नेमणूक करणेबाबत असलेल्या तक्रार प्रकरणी डॉ. ए. पी. पोतदार उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रुशा) पुणे यांनी चौकशी केलेली नाही. यास्तव चौकशी अहवालाची सत्यप्रत उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही."

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक

२९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०५-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे उपसंचालक आरोग्य सेवा यांच्याकडे, त्यांनी सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत काढलेल्या अनियमिततेबाबत चौकशी करुन वरिष्ठांना सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वप्रथम दिनांक ०५-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे या चौकशी प्रकरणाचा अंतीम अहवाल संचालक आरोग्य सेवा यांना सादर करण्यात आला आहे असे म्हटले आहे तर अपिलार्थीच्या दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सदर तक्रार प्रकरणी डॉ. ए. पी. पोतदार यांनी चौकशी केली नाही त्यामुळे चौकशी अहवालाची सत्यप्रत उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही असे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या अशा प्रकारच्या विसंगत भूमिकेमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिले आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेला चौकशी अहवाल जर संचालक आरोग्य सेवा यांच्या कार्यालयात उपलब्ध असेल तर सदर कार्यालयातून चौकशी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी हस्तगत करुन नंतर ती अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित आहे. सदर अहवालाची प्रत अपिलार्थीस देण्याने पुढील चौकशीमध्ये अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा कसे हे कळण्यास आज रोजी आयोगास काहीही मार्ग नाही. आपले म्हणणे मांडण्यासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगाने

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विनंती करुनही ते आज सुनावणीस हजर राहिले नाहीत हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिली जाईल असे संचालक आरोग्य सेवा मुंबई यांनी पहावे व यांसदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिली जाईल असे संचालक आरोग्य सेवा मुंबई यांनी पहावे व यांसदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर, एन. डी. ४२, जे-३-५३-६ "सत्यम"

विद्यानिकेतन हायस्कूलसमोर, हडको, नवीन नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रुशा), सेंट्रल बिल्डींग, पुणे-०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य), सेंट्रल बिल्डींग, पुणे-०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक आरोग्य सेवा, आरोग्य भवन, व्ही. टी. मुंबई – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०७

निर्णय दिनांक ०४-०६-२००८

श्री. बस्वराज विश्वनाथ मतकट्टे, : अपिलार्थी
व्दारा- पी. आय. मांटे निवास,
पिपल्स बॅक कॉलनी, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बस्वराज विश्वनाथ मतकट्टे व

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. बलभीम रामभाऊ देवणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०३-१९९९ रोजीच्या त्यांच्या आस्थापना विभागाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" आपल्या विभागात गट "ब" पदावर नियमीत कलेल्या नेमणुकासंदर्भात खालील प्रमाणे माहिती द्यावी.

| कर्मचारी नांव | सामावून घेण्यापुर्वीची माहिती द्यावी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | प्रथम नेमणूक दिनांक | नियुक्ती कालावधी | जाहिरात दिनांक | लेखी परीक्षा दिनांक | सेवेतील एकूण खंड | सामावणे पूर्वी सलग सेवा | सामावणे पूर्वी वेतनश्रेणी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| सामावले नंतरची माहिती | | |
|---|---|---|
| सामावलेले पद | सामावलेनंतर वेतनश्रेणी | पहिली वेतरवाढ दिनांक |
| १० | ११ | १२ |

वरील प्रमाणे १२ मुद्दे यात गट ब पदावर अनियमीत नियुक्या नियमीत केल्या याची माहिती द्यावी. सोबत अवलोकनार्थ मंत्रालयास पाठवलेला अर्ज व सा. बा. विभाग पत्र क्र. ममाअ २००६/प्र.क्र.४२८ सेवा ३ मंत्रालय मुंबई – ३२ दिनांक २ डिसेंबर २००६ वरील १२ कॉलममध्ये माहिती द्यावी.

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी अपिलाचे कारण म्हणून माहिती न देणे, अपील अधिकारी व अपील कालावधी कळवला नाही असे देऊन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. यासंदर्भात त्यांनी पारित केलेल्या त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या सुनावणीच्या कार्यवृत्तांतामध्ये अर्जदाराने मागणी केलेल्या अभिलेख्याच्या प्रती / माहिती बाबत या कार्यालयाने गट ब पदावरील नियुक्त्या नियमीत केलेल्या नसल्याने माहिती निरंक समजावी व सदर सुनावणीस अर्जदार गैरहजर राहिल्याने अपील फेटाळण्यात आले असे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयातर्फे गट ब पदावर कोणत्याही प्रकारच्या नियुक्त्या झाल्या नाहीत अथवा अनियमित नियुक्त्या नियमीत केल्या गेल्या नाहीत. अपिलार्थीस याची कल्पना त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याकडील गट ब पदावर अनियमित नियुक्त्या नियमीत केल्या गेल्याच्या संदर्भातील माहिती एकुण १२ रकाने असलेल्या प्रपत्रामध्ये मागितली होती व या माहितीच्या अर्जासोबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ०२-१२-२००६ च्या पत्राची प्रत जोडली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ०२ डिसेंबर २००६ च्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दिनांक ०८-०३-१९९९ च्या निर्णयान्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील एकूण ७८ कनिष्ठ अभियंत्यांच्या अनियमीत नियुक्त्या नियमीत करण्यास मान्यता दिली होती. सामान्य प्रशासन विभागाच्या या निर्णयाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांना त्यांच्याकडील ज्या कनिष्ठ अभियंत्याच्या सेवा तात्पूरत्या चालू ठेवण्यात आल्या आहेत अशा कर्मचा-यांना नियमीत करण्याचे आदेशीत केले आहे. कनिष्ठ अभियंता हे गट ब (अराजपत्रित) या वर्गातील पद आहे व त्या पदावर नियुक्ती देण्यास अधीक्षक अभियंता हे सक्षम

प्राधिकरण आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाने अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या पत्रामध्ये म्हटले आहे. शासनाने अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांना गट ब (अराजपत्रित) अनियमीत नेमणूका नियमीत करण्याची सूचना दिली आहे, मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना गट ब या पदावरील नियुक्त्यासंदर्भात माहिती मागितली होती. यामध्ये त्यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती राजपत्रित पदा-संदर्भातील आहे की अराजपत्रित पदासंदर्भातील आहे याचा कोठेही उल्लेख केला नाही. त्यामुळे माहितीसाठीचा केलेला अर्ज त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळण्याच्या दृष्टीने अपूर्ण व चुकीचा ठरतो. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीची मांडणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात चुकीची केली असल्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यास ते स्वतःच जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीचा मूळ अर्ज अशा प्रकारे चुकीचा ठरत असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस गट ब (अराजपत्रित) पदावरील माहिती हवी असेल तर त्यासाठी त्यांना अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांच्याकडे वेगळ्याने अर्ज करावा लागेल.

अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यांच्या हातून घडलेल्या अशा प्रकारच्या अनियमिततेबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून अशा प्रकारच्या चूका त्यांच्या हातून इतःपर परत होणार नाही याची दक्षता त्यांनी भविष्यात घ्यावी अशी सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०४-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बस्वराज विश्वनाथ मतकट्टे, व्दारा- पी. आय. मांटे निवास, पिपल्स बॅक कॉलनी, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४९

निर्णय दिनांक ०४-०६-२००८

श्री. बलभीम प्रल्हाद आडसूळ, : अपिलार्थी
रा. भोगनी पोस्ट सेलू तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
कृषि कार्यालय कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बलभीम प्रल्हाद आडसूळ हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. मुक्ताराम नामदेवराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. धोंडिराम शेकू भालेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी श्री. धर्मराज रेवण तोडकर व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. दादाराव विठ्ठलराव जाधवर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००० ते २००६ या कालावधी-तील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " ईकूर, भोगजी, बहुला शिवारात कोणकोणत्या गटात शेततळी व नाला बंडीग कामे पूर्ण झाली व कोणकोणत्या गटातील कामे आद्याप अपूर्ण आहेत याची माहिती मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे व संबंधीत प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध आहे असे कृषि सहाय्यक श्री. यादव सी. एन. यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती मागविली. तथापि संबंधितांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती न दिल्याने ते अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे अवगत करु शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र त्यांच्याकडील दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरीत माहिती देण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत कृषि सहाय्यक यांच्याकडे दिनांक २२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये परत माहिती मागविली. तथापि एवढे करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

हर त-हेने प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे टाळले असे नमूद केले आहे. याच बरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालया-मध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नावांचे / पदनामांचे फलक दर्शनी भागात लावले नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. धर्मराज रेवण तोडकर) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी जाणून बुजून टाळाटाळ केली नाही. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी त्यांच्या कडे ३ वेगळ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार होता. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या हाताखालील कृषि सहाय्यक यांच्याकडे उपलब्ध होती. संबंधीत कृषि सहाय्यकाला त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००७ व २२-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे सूचित केले होते व माहिती विहित मुदतीत सादर न केल्यास होणा-या परिणामाची जाणीव करुन दिली होती, तथापि त्यांच्या सहाय्यकाने ही माहिती त्यांना वेळेत न दिल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई होऊ नये मात्र इतर कारवाई झाल्यास त्यांची हरकत नाही.

सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी (कृषि अधिकारी) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असून सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यथ अपिलार्थीची पोच पावती त्यांना प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस पाठविलेली माहिती यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली आहे व अपिलार्थीची पोच पावती आयोगास दाखविली यावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती दिनांक ०९-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे व

पदनामाचे फलक दर्शनी भागात सहजपणे दृष्टीस पडतील अशा पध्दतीने लावले आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी (श्री. दादाराव विठ्ठल जाधवर) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे त्यांनी प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यापासून ४५ दिवसाच्या नंतर प्राप्त झाला त्यामुळे या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांनी त्यांची भेट घेतली असून भेटीतील चर्चेअंती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक १६-०३-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशीत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अत्यंत साधी सरळ व सोपी होती. ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता संबंधीत जन माहिती अधिकारी यांना व त्यांचे सहाय्यक यांना फारसे कष्ट घ्यावे लागले असते अशापैकी कोणतेही कारण या प्रकरणी संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला त्यांच्याकडील जादा कार्यभाराचा युक्तिवाद आयोगास मान्य नाही कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी आपले कर्तव्य नियमीतपणे पार पाडणे हा त्यांच्या दैनंदिन कामाचा अविभाज्य भाग आहे. त्यांच्या सहाय्यकाकडून ते अपिलार्थीने मागितलेली एवढी साधी माहिती प्राप्त करुन घेऊ शकले नाही किंवा त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रा-वरुन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी कोणत्याही टप्प्यावर व कधीही सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. केवळ त्यांच्या कडील इच्छाशक्तीचा अभाव, हाताखालील

कर्मचा-यावरील नियंत्रणामध्ये असलेली शिथिलता, संबंधीत कर्मचा-याचे बेशिस्त व बेपर्व वर्तन मात्र या ठिकाणी दिसून येत आहे. ज्या कर्मचा-यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्या कर्मचा-यावर साधी प्रशासकीय कारवाई करण्याचे देखिल त्यांनी प्रस्तावित केल्याचे दिसून येत नाही व तसे त्यांनी आपल्या तोंडी युक्तिवादामध्ये कबूलही केले आहे. याचबरोबर संबंधीत अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तालुका कृषि अधिकारी हे किती प्रयत्नशील राहिले याचा पुरावा देखील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये आढळून येत नाही. त्यांनी अपिलार्थीने केलेले अपील कालबाह्य असल्याचा उल्लेख आपला युक्तिवादामध्ये केला आहे जो सपशेल चुकीचा आहे. कोणाही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला निर्णय त्यांना मान्य नसल्यास त्यांना माहिती प्राप्त न झाल्यास जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी विहित केलेल्या मुदतीनंतर ३० ते ४५ दिवसांचा आत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करावयाचे असते एवढी साधी माहिती जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी नव्हती असे येथे खेदपूर्वक नमूद करण्यात येत आहे. संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेपर्व कार्यशैलीची कृषि आयुक्त पुणे यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाचा व कार्यशैलीचा परिपाक अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यपासून वंचित राहण्यात झाला आहे. जी माहिती अपिलार्थीस सर्वसाधारणतः दिनांक १४-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणे आवश्यक होते, ती माहिती अपिलार्थीस अंदाजे एक वर्षाच्या विलंबानंतर प्राप्त झाली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे.

अपिलार्थीस जरी विलंबाने माहिती मिळाली असली तरी सदर विलंब कोणत्याही परिस्थितीत क्षमापित करण्याच्या योग्यतेचा आहे असे आयोगास वाटत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी संबधीत जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या संबंधीत सहाय्यकाने त्यांना आवश्यक ते सहकार्य दिले नाही, जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत सहाय्यकाच्या अशा बेशिस्त वर्तनाबाबत त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई प्रस्तावित केली नाही. या सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे प्रशासन किती ढिसाळपणे चालले आहे हे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या प्रकरणी केलेले वर्तन हे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करते असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्या-साठी जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधीत सहाय्यक हे सर्व जण या प्रकरणी जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब कृषि आयुक्त, पुणे यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच तीन महिन्याच्या आत करुन, तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आता

विनामूल्य माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. कृषि आयुक्त, पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच तीन महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बलभीम प्रल्हाद आडसूळ, रा. भोगनी पोस्ट सेलू तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१७

निर्णय दिनांक : ०५.०६.२००८

१ श्री. सुरेश दामोधर गवळी, : अपीलार्थी
रा. बोरगाव (बु), पो.जानेफळ,
ता.जाफ्राबाद जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
जाफ्राबाद जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उप विभागीय कृषी अधिकारी,
जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तर जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी जाफ्राबाद जि.जालना श्री. माधव सुभाषराव बोईनवाड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुरेश दामोधर गवळी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०४.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००५ ते २००९ या कालावधीतील  रोजगार हमी योजनेअंतर्गत कामासंबंधी खालीलप्रमाणे मागितली होती.

" मंडळ अधिकारी वरुड (बू।।) यांच्या अखतारीत येणाऱ्या गावातील २००५-२००७ पर्यत झालेल्या व मंजूर असलेल्या कामांची यादी, कामावर असलेल्या मजुराची यादी (मस्टर), अंदाजपत्रक व किती खर्च झाला त्याची सविस्तर माहीती , बोरगाव (मह) येथे मंजूर मातीबांधच्या कामावरील मजुरांची (मस्टर्स) यादी ,अंदाजपत्रक मंजूरी पूर्व नकाशा- कामावरील कर्मचाऱ्यांची नावे. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ९.५.२००७ रोजी प्राप्त झाला.सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०६.२००७ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणी संदर्भातील आपले आदेश त्यांनी दि. २२.०६.२००७ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने खालीलप्रमाणे आदेश दिले.

"माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा पोटकलम ६ अन्वये संबंधीतास ती माहिती दयावी आणि विनंतीचा अर्ज निकालात काढावा"

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. २१.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये, त्यांना आवश्यक ती माहिती

प्राप्त करुन घेण्यासाठी रु.४५६२/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. २१.७.२००७ रोजी हस्तांतरित केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी सूचना देऊनही अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरले नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी त्यांच्या कार्यालयात केली होती, त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. जे.एम.ठेंग नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते. श्री. ठेंग तत्कालीन तालुका कृषी अधिकारी, जाफ्राबाद यांना तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याची कारणे विचारली होती. तथापि श्री. ठेंग यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रास कोणतेही उत्तर दिले नाही. त्यांनी (उपस्थित जन माहिती अधिकारी) या पदाचा पदभार दि. २५.५.२००७ रोजी स्वीकारला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ते शुल्क रक्कम रु. ४५६२/- चा भरणा त्यांचे कार्यालयात करण्याच्या अपिलार्थीस सूचना देऊनही अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा न

केल्याने, त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती पुरविली नाही. त्यानंतर मात्र त्यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ माहिती हस्तांतरित केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा ते आयागोसमोर दाखवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी केलेली पुरेपूर उपेक्षा जास्त जाणवते. अपिलार्थीच्या दि. ४.४.२००७ रोजीच्या अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याची तरतुद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(६) मध्ये केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल जन माहिती अधिकारी यांना याच तरतुदीचा वापर करुन अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना केल्या आहेत. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क भरण्याचे सूचित केले. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दि. ४.४.२००७ रोजी केलेल्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना उशिरात उशिरा दि. ३.५.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी मिळणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळात प्रथम प्रतिसादच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर दि. २१.६.२००७ रोजी दिलेला आहे. त्यानंतर अपिलार्थीस त्यांनी निश्चितपणे कोणती व केव्हा माहिती दिली याचा पुरावा देखिल आज ते आयोगासमोर दाखवू शकले नाहीत. या प्रकरणातील त्याचे वर्तन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करते. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनामूळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांना देखिल माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे इतर सर्व अधिकारी/कर्मचारी या प्रकरणी निःसंशयपणे जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांना, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल एकूण २५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारामध्ये जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

"००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा- ८०० इतर जमा रक्कम- १८
माहितीचा अधिकार-००७०-००६-१"

सदर शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी उपविभागीय कृषी अधिकारी, जालना यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत करावी. संबंधित अधिकारी/ कर्मचारी हे या शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात जुलै,२००८ पासून नियमितपणे करतील असे पहावे व या संदर्भातील आपला अहवाल शास्तीची संपूर्ण रक्कम कोषागारात भरली जाईपर्यंत दरमहा आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे सहाय्यक कर्मचारी/अधिकारी यांच्यावर, त्यांना अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु. २५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश दामोधर गवळी,रा. बोरगाव (बु), पो.जानेफळ, ता.जाफ्राबाद जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषी अधिकारी कार्यालय,जाफ्राबाद जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषी अधिकारी,जालना. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१८

निर्णय दिनांक : ०५.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पुरुषोत्तम दादा गायकवाड,<br>द्वारा दिगांबर नवघरे,<br>मु.सोमठाना पो.देवळाना ता.भोकर<br>जि.नांदेड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी कार्यालय,<br>लोहा जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>लोहा ता.लोहा जि. नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, लोहा जि.नांदेड श्री. पांडुरंग नारायणराव ब्याळे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. पुरुषोत्तमदादा गायकवाड (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,

तालुका कृषी अधिकारी कार्यालय लोहा जि. नांदेड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १५.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील २ फेब्रुवारी २००६ ते ३० सप्टेंबर २००६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामासंबंधी खालीलप्रमाणे मागितली होती.

"एनटी, ढाबा, अर्दन स्ट्रक्चर, एल.बी.एस.,एस.बी,सी.सी.टी, आरटी ची कामे कोणत्या ठिकाणी झाले किंवा चालु आहेत. प्रत्येक कामाचा प्रतिमीटर दर किती? मजुरांस दिलेला दर किती ? अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती, मस्टरच्या सत्यप्रती, कामाच्या स्थळांच्या नकाशाच्या सत्यप्रती, पतमर्यादा सत्यप्रत, लेबर रिपोर्ट सत्यप्रत, इत्यादि सविस्तर माहिती सत्य द्यावी. अन्यथा माहिती खोटी दिल्यास कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात येईल. "
सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीच्या अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १५.०३.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी त्यांचेकडे सदर अपील प्राप्त झाले नसल्याचे शपथपत्राद्वारे सादर केले. अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांचेकडे प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी या अपिलावर निर्णय घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन अपिलातील प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडून जी माहिती मागितली होती, ती माहिती अपिलार्थीस त्यांनी दुसऱ्या एका अर्जाच्या संदर्भात दिली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना जून २००७ मध्ये देण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीस निश्चित कोणत्या तारखेस माहिती दिली हे त्यांना कागदपत्राअभावी आयोगास सांगता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.१.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेला अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सदर अर्ज पाठविलेल्या रजिस्टर्ड पोस्टाच्या पावतीची सत्यप्रत सादर केली आहे. यावरुन अपिलर्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दाखल झाल्याचे दिसून येते. याचबरोबर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी तालुका कृषी अधिकारी, लोहा यांना लिहिलेल्या दि. १७.५.२००७ रोजीच्या पत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.५.२००७ पर्यंत माहिती न दिल्यामुळे अपिलार्थीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड यांचेकडे दि. ११.५.२००७ रोजी एक तक्रार अर्ज केला होता व या तक्रार अर्जासंदर्भात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी तालुका कृषी अधिकारी, लोहा यांना दि. १७.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पत्राची प्रत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. आज रोजी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्यासंदर्भात कुठल्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये देखिल त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिनियमातील तरतुद कलम ३ अन्वये हक्क असतांना देखिल त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कापासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. आपल्या अशाप्रकारच्या नकारात्मक कृतीमुळे जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. त्यांच्या या प्रकरणातील कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, कृषी आयुक्त पुणे यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने अधिनियमातील विहित केलेली मुदत आता व्यपगत झाली असल्यामुळे अधिनियमातील कलम ७(६) मधील तरतुदीनुसार ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. तेव्हा या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

**१.** अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. कृषी आयुक्त,पुणे यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांनी या प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन त्यानंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०५.०६.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पुरुषोत्तम दादा गायकवाड,द्वारा दिगांबर नवघरे,मु.सोमठाना पो.देवळाना ता.भोकरजि.नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषी अधिकारी कार्यालय,लोहा जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी,लोहा ता.लोहा जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१९

निर्णय दिनांक : ०५.०६.२००८

१ श्री. रमेश दौलतराव माने, : अपीलार्थी
नांदेड जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, किनवट जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, किनवट जि. नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रमेश दौलतराव माने (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, किनवट जि. नांदेड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट जि.नांदेड ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व त्रयस्थ पक्ष मे.सचिन ट्रेडींग कं. किनवट व इतर ८ अर्धघाऊक केरोसिन परवानाधारक (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १५.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील किनवट तालुक्यातील आठ

अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांबाबत दि. १ जानेवारी २००६ ते ३१ डिसेंबर २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे मागितली होती.

"१) मे. सचिन ट्रे.कं. प.नं.४३/९८ (२) सिराज अकबरअली जिनानी परवाना ४४/९८ (३) अशोक राघोलु नेमानीवार क्र. ४५/९८ किनवट सर्व.शहर. (४) साईबाबा ट्रे.कं.बोधडी बु. क्र. ५१/९८ (५) मे. गजानन ट्रे.कं.इस्लापुर क्र. ५२/९८ (६) रविंद्र मधुकर राठोड मांडवी क्र. ४८/९८ (७) प्रशांत प्रकाश राठोड मांडवी क्र. ४९/९८(८) माधव अंगडना श्रीमनवार मांडवी क्र. ५०/९८. व घाऊकरॉकेल विक्रेते मे.साईबाबा एन्टरप्रायजेस गोकुंदा कीनवट परवाना क्र. ९/९८.यांच्याकडील रॉकेल वाटप व स्टॉक रजिस्टरच्या तसेच आपल्या कार्यालयातील मासीक अहवालाच्या साक्षांकित सत्यप्रती मिळणे बाबत. तसेच त्यांना दरमहा किति नियतन दिले जाते त्याच्या माहितीच्या सत्यप्रती मिळणेबाबत. "

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नाही अथवा प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.०२.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०५.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील तरतुदीनुसार प्रथमतः दि. १५.१.२००७ रोजी अर्ज केला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जातही जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणताही प्रतिसाद न दिल्या गेल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.५.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. हे अर्ज संबंधित कार्यालयात प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांची पोचप्रत (Receipt) त्यांचेकडे उपलब्ध आहे. सदर दोन्हीही पोचपावत्या त्यांनी आयोगास दाखविल्या. यावरुन त्यांचा माहितीचा अर्ज व त्यावरील अपील हे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व संबंधितांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई व्हावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप व्यापक होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती - संबंधित अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांच्याकडील स्टॉक रजिस्टरच्या व रॉकेल वाटपाची माहिती संबंधित विक्रेत्याकडे उपलब्ध असते. मात्र त्यांना केले जाणारे नियतन हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असते. मूळात या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना माहिती पुरविण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर व कुठल्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. आजच्या सुनावणीची वेळ व दिनांका बाबत नायब तहसीलदार श्री. डुकरे यांना लेखी पत्राशिवाय दिनांक १५.०५.२००८ रोजी दुपारी १२.२० वाजता आयोगाच्या कार्यालयातून दूरध्वनीद्वारे सूचना दिली गेली होती, तरीही जन माहिती

अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीस गैरहजर राहिले आहेत. यावरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे, असे आयोगास वाटते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागण्याचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीप्रमाणे हक्क आहे व अपिलार्थीने मागितलेली माहिती ही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना निश्‍चितपणे कोणत्या अडचणी होत्या, हे समजून येत नाही किंवा त्यांचे म्हणणे आयोगासमोर मांडण्यासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना सुनावणीस उपस्थित राहण्याची सूचना मिळूनही त्यांच्यापैकी कोणीही हजर नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांचे मनात थोडीशी जरी इच्छा असती तरी त्यांनी अपिलार्थीशी या संदर्भात काहीतरी पत्रव्यवहार केला असता. परंतु तसे जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाकडे व प्रथम अपील अर्जाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा.विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश काय करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेऊन व त्याद्वारे अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आणि आयोगासमोरील सुनावणीस हेतुपुरःस्सर गैरहजर राहून आपल्या बेशिस्त कार्यशैलीचे दर्शन आयोगास घडविले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेशिस्त कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, नांदेड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश दौलतराव माने, सोमेश कॉलनी कलामंदिर मागे, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिलहाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२०

निर्णय दिनांक : ०५.०६.२००८

१ श्री. प्रशांत पोपशेटवार, : अपीलार्थी
गांधी चौक रा. भोकर जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रशांत पोपशेटवार (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद जि. नांदेड यांचे प्रतिनिधी उपशिक्षणाधिकारी श्री. मनोहर धोंडिबाराव पाटील ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड श्री. पोपट विठ्ठलराव बनसोडे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २०.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील जानेवारी २००५ ते ३१ डिसेंबर २००६ या कालावधीतील शिक्षकांच्या जादा वेतनवाढीसंबंधी खालीलप्रमाणे मागितली होती.

"१. आपल्या शिक्षण विभागामार्फत दि.६ डिसेंबर २००६ रोजी जाहिर झालेल्या जादा वेतनवाढीच्या कर्मचाऱ्यांची (प्रा.शिक्षक/मा.शिक्षक/शिक्षण विस्तार अधिकारी/कें.प्रमख) यांची यादी मिळणेबाबत.

२. उपशिक्षणाधिकारी ते मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरील यादी बाबतच्या टिप्पणीची झेरॉक्स प्रत मिळणे

३. या शिवाय किती कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल उपशिक्षणाधिकारी स्तरावर बदलण्यात आले त्याची यादी देण्यात यावी.

४. किती कर्मचाऱ्यांच्या जादा वेतनवाढीसाठी उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर प्रस्ताव पाठवण्यात आला त्याची साक्षांकित प्रत देणे.

५. सर्व शिक्षकांना ज्यांना वेतनवाढ देण्यात आली व ज्यांची नावे वगळण्यात आली अशा सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवालांच्या प्रती मिळणे.

६. १९९९ ते २००४ या शैक्षणिक वर्षात ज्या कर्मचाऱ्यांची वेतनवाढ बंद करण्यात आली त्यांची यादी देणे.

७. श्री शिक्षणाधिकारी ढोणे यांच्या कार्यकाळातील वेतनवाढी बंद करण्यात आलेल्यांपैकी किती शिक्षकांना जादा वेतनवाढ देण्यात आली त्याची यादी.

८. सदरील माहिती संवर्गनिहाय देण्यात यावी.

९. सदरील प्रस्ताव कोणत्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या काळात मान्य करण्यात आला त्या प्रस्तावाची प्रत व त्यांचे नाव देण्यात यावे.

१०. १९९९ ते २००४ च्या कार्यकाळात उपशिक्षणाधिकारी कोण कोणते होते त्यांच्या नाव व कार्यकाळासहीत यादी मिळणे बाबत.

११. सदरील ज्यादा वेतनवाढीच्या आदेशामुळे शासकीय तिजोरीवर प्रतिमाह वेतनासाठी वाढणारा रक्कमेचा बोझा किती. "

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.१२.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क रु. १७९९६/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्यासंबंधी अपिलार्थीस सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर कळविल्याचे आढळून येत नाही. तथापि अपिलार्थी यांनी सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात न करता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.०१.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची सुनावणी दि. २६.२.२००७ रोजी घेऊन त्यासंबंधी आपले आदेश दि. २६.२.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील प्रश्नार्थक स्वरुपाच्या पाच मुद्यांवरील माहिती न देता एकूण सहा मुद्यांवर अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती दि. ५.३.२००७ पर्यंत उपलब्ध करुन देण्याचे व ती स्वीकारण्याचे अपिलार्थीने या सुनावणीमध्ये मान्य केल्याचे या निर्णयावरुन दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे

दि. २१.०४.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत न पुरविल्याबद्दल त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकूण अकरा मुद्यांवर असून त्यातील बरेचशे मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपात त्यांनी मांडले आहेत व या माहितीमध्ये त्यांनी शिक्षकांच्या गोपनीय अहवालाच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात ही माहिती अपिलार्थीस द्यावी किंवा देऊ नये या करिता विचारविनिमय करण्याकरिता व ते स्वतः संभ्रमित झाल्याने त्यांना अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देण्यासाठी बराच कालावधी लागला व त्यांनी यासंबंधी अंतीम निर्णय घेतल्यानंतर लगेच अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रु. १७९९६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात केलेला नाही. अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी ज्या दिवशी पत्र लिहिले, त्या दिवशी म्हणजेच दि. २४.१.२००७ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार होती. तथापि अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्याकडे न भरल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही व अंतीमतः अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांचेकडून, जन अपिलीय अधिकारी यांचेकडे सुनावणी झाल्यानंतर विनामूल्य माहिती देण्यात आली.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दि. २६.२.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ५.३.२००७ पर्यंत माहिती देण्याचे सूचित

केले. अपिलार्थीने मागितलेल्या एकूण अकरा मुद्यांवरील माहिती पैकी पाच मुद्यांवरील माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची व गोपनीय अहवालाशी संबंधित असल्यामुळे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' या संज्ञेशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस माहिती न देण्याचा निर्णय घेण्यात आला व अपिलार्थीने सदर निर्णय या सुनावणीमध्ये मान्य केल्यानंतर उर्वरित सहा मुद्यांवरील माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडे एकूण अकरा मुद्यांवर माहिती मागितली होती. या अकरा मुद्यांपैकी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्र.३,५,७,८ व ११ यांचेशी संबंधित माहिती देण्याचे नाकारले व उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५.३.२००७ पर्यंत द्यावी, असे त्यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार या सहाही मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३.३.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ज्या पाच मुद्यांवर माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यापैकी मुद्दा क्र. ३ व ७ या संबंधीची माहिती 'निरंक' असल्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले. वास्तविक पाहता त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारण्याऐवजी सदरची माहिती 'निरंक' आहे, अशा स्वरुपाची माहिती दिली असती तर ते या प्रकरणी उचित ठरले असते. अपिलार्थीने मागितलेल्या उर्वरित मुद्यांसंदर्भातील (मुद्दा क्र. ५,८ व ११) माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने या मुद्याद्वारे शिक्षकांच्या गोपनीय अहवालाची प्रत मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. सदर गोपनीय अहवालाच्या प्रती अपिलार्थीस न देण्याचा जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बरोबर आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ८ मध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती संवर्गनिहाय

देण्यात यावी, असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी हे त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे विश्वस्त म्हणून कार्यरत असतात. केवळ अपिलार्थीने संवर्गनिहाय माहिती मागितली म्हणून त्यांना ती संवर्गनिहाय माहिती नव्याने तयार करुन देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नाही. जन माहिती अधिकारी हे सदर माहिती संवर्गनिहाय ठेवत नाहीत, म्हणून अशा स्वरुपामध्ये त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याने ही माहिती त्यांना देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्र. ११ मध्ये अपिलार्थीने शिक्षकांना दिलेल्या वेतनवाढीचा शासकीय तिजोरीवर प्रतिमाह वाढणारा रकमेचा बोजा किती आहे, असा प्रश्न जन माहिती अधिकारी यांनी विचारली आहे. या मुद्यावर देखिल मुद्दा क्र. ८ बाबतचे आयोगाचे अभिप्राय लागू होतात. अपिलार्थीने मागितलेली या मुद्यावरील माहिती देखिल अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने या मुद्यांवर अपिलार्थीस त्यांनी माहिती देणे अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत नाही. थोडक्यात मुद्दा क्र. ३ व ७ वगळता, इतर मुद्यांवरील माहिती निरंक आहे व उर्वरित तीन मुद्यांवरील माहिती देण्याचा जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा दि.२०.१२.२००६ चा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.१२.२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे ३० दिवसांचे आत निर्णय घ्यावयास हवा होता, तथापि अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी तीन दिवस इतक्या विलंबाने निर्णय घेतल्याचे दिसून येते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दि. २४.१.२००७ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यास त्यांचेकडे तयार होती. तथापि अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने त्यांनी अपिलार्थीस ती माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देण्यासंदर्भात आवश्यक ते शुल्क कळविले नाही, मात्र विहित मुदतीनंतर आवश्यक ते शुल्क कळविले असल्याने, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची घेतलेली भूमिका ही चुकीची ठरते, याशिवाय

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये संपूर्ण उहापोह होऊन अपिलार्थीस दि.५.३.२००७ पर्यन्त एकूण सहा मुद्यांवर माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यास आदेशित केले व या सहा मुद्यांवरील माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीने मान्य देखिल केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३.३.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असून रजिस्टर्ड पोस्टाची पोच पावती त्यांनी आयोगासमोर दाखविली. यावरुन सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येते. यामुळे अपिलार्थीस ते माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांना माहिती विलंबाने प्राप्त झाली म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. मात्र सदर माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब हा कोणताही असद्हेतू मनात बाळगून लावला असल्याचे अथवा हेतूपुरस्सर माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीस दोन दिवस उशिराने त्यांनी आवश्यक ते शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याच्या सूचना देऊन अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जास प्रतिसाद दिल्याचे येथे दिसून येते.येथे अपिलार्थीस मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाल्याने त्यांना सल्लामसलतीसाठी वेळ लागला, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आयोग अमान्य करीत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाचा ‘विहित कालमर्यादा’ हा गाभा आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी मूळात या गाभ्यालाच छेद दिला आहे. सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक यांना, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाप्रीत्यर्थ आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, येथून पुढे भविष्यात त्यांनी त्यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त होणाऱ्या अर्जावर अधिनियमातील

विहित मुदतीत कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या ताकीदीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी या सर्वांच्या सेवापुस्तिकेमध्ये एक महिन्याच्या आत घ्यावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक यांना आयोगातर्फे त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाप्रीत्यर्थ सक्त ताकीद देण्यात येत आहे. या ताकीदीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी या सर्वांच्या सेवापुस्तिकेमध्ये एक महिन्याच्या आत घ्यावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रशांत पोपशेटवार,गांधी चौक रा. भोकर जि.नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२५

निर्णय दिनांक : ०५.०६.२००८

१ श्री. गणेश किसनराव हणमंते, : अपीलार्थी
अहमदपूर जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय,
अहमदपूर जि. लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, किसान शिक्षण प्रसारक मंडळ,
विद्यावर्धिनी हायस्कुल, उदगीर,
जि. लातूर.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गणेश किसनराव हणमंते (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, विद्यावर्धिनी हायस्कुल, उदगीर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २१.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००० ते १ ऑगस्ट २००७ या कालावधीतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " इ.स.२००० ते २००१, व २००१ ते २००२,इ.स.२००२ ते २००३ व २००३ व २००४ इ.स.२००४ ते २००५ व २००५ ते २००६ इ.स. २००६ ते २००७ या कालावधीत कीती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजुर झाली होती. व त्यांना किती शिष्यवृत्ती देण्यात आली होती. "

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमुद केले आहे. अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नाही अथवा कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.०७.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. तथापि सदर अपील अर्ज स्वीकारण्यास जन अपिलीय अधिकारी यांनी नकार देऊन तो अपिलार्थीस परत पाठविला. या संदर्भातील आवश्यक तो पुरावा अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास आज सुनावणीच्या वेळी दाखविला. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.त्यांनी माहितीसाठी केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही, तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा अपील अर्ज स्वीकारण्याचे नाकारले. जन

माहिती अधिकारी यांना त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने माहितीसाठीचा अर्ज पाठविला असून सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. २२.६.२००७ रोजी प्राप्त झाला आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांना सदर अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने दि. २२.६.२००७ रोजी प्राप्त झाल्याची पोचपावती दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज दि. २२.६.२००७ रोजी प्राप्त झालाचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २१.६.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने त्यांच्या प्रथम अर्ज पाठविला होता, या प्रीत्यर्थ त्यांनी पावती क्र.१६७१ द्वारे रु.२५/- इतक्या रकमेचा भरणा संबंधित पोस्ट कार्यालयात दि. २१.६.२००७ रोजी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २००० ते २००७ या सात वर्षाच्या कालावधीतील ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली, त्या विद्यार्थ्यांच्या नावांची यादी व शिष्यवृत्तीच्या रकमेचा विद्यार्थीनिहाय तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला होता. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे व सरळ होते. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन त्याद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांनी  जन माहिती अधिकारी यांचेवरही कडी करुन अपिलार्थीचा मूळ प्रथम अपील अर्ज देखिल स्वीकारण्याचे सौजन्य दाखविले नाही. यावरुन किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियमाचा कशा प्रकारे अनादर करित आहेत, याचे दर्शन होते. अपिलार्थीस एवढया साध्या माहितीसाठी थेट राज्य माहिती आयोगापर्यंत यावे लागते, हे संबंधित शिक्षण संस्थेचा कारभार पारदर्शक नसल्याचे द्योतक आहे, असे आयोग मानते. अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली होती, ती संस्था शासन अनुदानित शिक्षण संस्था असल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार सदर संस्था ही शासकीय प्राधिकरण ठरत आहे. त्यामुळे या संस्थेने जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त

केलेले मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील कलम (७) मधील तरतुदीप्रमाणे देणे आवश्यक आहे. या प्रकरणामध्ये अपिलार्थीस माहिती मिळविण्यासाठीचा असलेला हक्क जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे कोणत्याही परिस्थितीत डावलू शकत नाहीत. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी दि. २१.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या माहितीच्या प्रथम अर्जावर कोणत्याही प्रकारे सकारात्मक कार्यवाही न करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता, माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश कायम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात् सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी अशा प्रकारच्या शिक्षण संस्थांसंदर्भात आवश्यक ती कडक कार्यवाही करण्याची गरज निर्माण झाल्याचे आयोगास जाणवत आहे. आयोगाकडे प्राप्त झालेल्या बऱ्याच अपील व तक्रार प्रकरणामध्ये शिक्षण संस्थांच्या कारभारामध्ये पारदर्शकता नसल्याबाबत उल्लेख आहे. आता या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासाठी त्यांनी संबंधित शिक्षण संस्थेला भाग पाडून अपिलार्थीस सहाय्य करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या न्याय्य मागणीपासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश कायम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

४. वरील आदेश क्र. २ च्या अनुपालनास्तव सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अपिलार्थीस आवश्यक ते सर्व सहाय्य करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश किसनराव हणमंते,अहमदपूर जि.लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (आर.पी.ए.डी.द्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, किसान शिक्षण प्रसारक मंडळ,विद्यावर्धिनी हायस्कुल,

उदगीर,जि. लातूर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहसंचालक, उच्च शिक्षण, शासकीय तंत्रनिकेतन (पॉलीटेक्निक) परिसर, यशवंत महाविद्यालयासमोर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२४

निर्णय दिनांक : ०५.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. उरुज अहमद सिद्दीकी,<br>रा. औरंगाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपआयुक्त (महसूल),<br>महानगर पालिका, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त, महानगर पालिका,<br>औरंगाबाद. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. उरुज अहमद सिद्दीकी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल),जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल) महानगर पालिका, औरंगाबाद श्री. उध्दव घुगे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद श्री. नवीन सोना ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १२.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील दि.१४.२.२००५ ते

२९.०३.२००५ या कालावधीतील ऑक्ट्रायसंबंधी फरकाची रक्कम महानगर पालिकेकडे जमा करणेबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" विषयः जकात सी बुक क्रमांक ९००, ९२०,९७०,११४०,१३००,१४०० व १५५० मध्ये जकात फरकाच्या फाडलेल्या पावत्यांवर आधारीत प्रश्न.

१) वरील विषयी सात पुस्तकात फाडलेल्या जकात फरकाची रक्कम खालिलपैकी कशाची आहे?

अ) संबंधीत आयतकाच्या वर्षभराचे ऑडीट करुन जकात फरक वसुल केला.

ब) संबंधीत आयातकाच्या एखादया पार्सलच्या कमी जकात भरलेल्या फरकाची रक्कम.

क) संबंधीत आयातकाने आयात केलेल्या मालाची पुर्ण जकात फरकाच्या नावाखाली वसुल केलेली रक्कम.

२) वरील विषयी जकात पावती खालील पैकी कुठे फाडली.

अ) जकात नाक्यावर.

ब) आयातक व्यापाऱ्याच्या दुकानावर.

क) ट्रान्सपोर्टच्या गोडाऊनवर

३) वरील विषयी सात जकात सी पुस्तके खालील पैकी कोणत्या पथकास देण्यात आली होती.

अ) पथक "अ"

ब) पथक "ब"

क) पथक "क"

४) वरील विषयी सात पुस्तकांची जकात फाडतांना पथका मधील कोणत्या कर्मचाऱ्यांनी संबंधीत दुकानांचे ऑडीट केले, त्यांची नावे.

५) वरील सात पुस्तकातील ज्या आयातक व्यापाऱ्यांच्या पावत्या पथकातील लोकांनी फाडल्या, त्यापैकी खालील व्यापाऱ्यांचे पत्ते देण्यात यावेत.

६) खालील दुकानांची जकात फरकाची पावती किती वेळा फाडली, एका पेक्षा जास्त पावत्या फाडल्या असतील तर त्या दुकानांचे लेखापरिक्षण किती वेळेस झाले? जास्त पावत्या फाडण्याचे कारण काय ?

अ) मे. दुल्हा दुल्हन

ब) मे. सत्या ईलेक्ट्रीकल्स.

क) मे. अमर एजन्सीज

ड) मे. राज क्लॉथ

इ) मे.मॅचवेल

७) पथक क्रमांक अ,ब,क च्या जकात निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत.

८) वरील विषयी सात पुस्तकांचे लेखा परिक्षण होऊन त्यात बऱ्याच त्रूटी असुन आयुक्तांनी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती प्रशासकिय कार्यवाही केली. त्याची माहिती देण्यात यावी. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अर्जास दि. ११.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दाम त्रास देण्याच्या उद्देशाने चुकीची व खोटी तसेच

दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांचेविरुध्द कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची व अंतीमतः योग्य माहिती प्राप्त व्हावी, अशी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०६.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. २८.६.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केले व अपिलार्थी हे त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे कर्मचाऱ्यांच्या चुकांबाबत अथवा त्यांच्या निदर्शनास आलेल्या चुकांच्या आधारे सक्षम प्राधिकाऱ्याकडे वेगळा अर्ज करुन दाद मागू शकतात, असे त्यांनी अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, महानगर पालिकेच्या जकात विभागाचे कर्मचारी हे महानगर पालिका परिक्षेत्रातील दुकानांकडे नियमितपणे मालाची तपासणी करुन जकातीतील फरक वसूल करत असतात. अशाच एका दुकानाची महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याने १६ वेळा तपासणी केली व त्या दुकानाच्या हिशोबाचे लेखापरिक्षण केले. या तपासणीच्या लेखापरिक्षणाची माहिती व जकात निरीक्षकाचा जकात अधीक्षक यांना दिलेल्या अहवालाची प्रत त्यांना हवी आहे. तसेच या पथकाने ज्या ज्या वेळी दुकानाना भेटी दिल्या होत्या त्या सर्व दुकानाच्या पत्त्याची माहिती त्यांना आवश्यक आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दि. १७.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या दुकानाचे पत्ते ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ही माहिती ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये नमुद केलेल्या जकात निरीक्षकांच्या अहवालासंदर्भात

त्यांनी असे सांगितले की, अशाप्रकारची स्वतंत्र अहवाल देण्याची कोणतीही पध्दत महानगरपालिकेमध्ये प्रचलीत नाही. दुकानदारांकडून आवश्यक ती थकबाकी वसूल केल्यानंतर दुकानदारांना देण्यात आलेल्या पावतीची स्थळप्रत जकात विभागात सादर केली जाते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दि. २८.५.२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. २८.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी आपले आदेश पारित केले. अपिलार्थीस अद्यापही त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेल्या माहिती बाबत काही शंका असेल अथवा आक्षेप असतील, तर जकात विभागातील या विषयाशी संबंधित सर्व नस्त्या व अभिलेखे ते अपिलार्थीस केव्हाही दाखविण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण आठ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. याबाबत अपिलार्थीने मुद्दा क्र. १,२,३ व ६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितल्याचे दिसून येते, जी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येशी सुसंगत नाही. येथे जन माहिती अधिकारी यांची भूमिका प्रथमतः स्पष्ट करण्याची गरज आहे, असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांची या संबंधातील भूमिका ही त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नस्त्या जतन करण्याची म्हणजेच विश्वस्ताची असते. कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न / खुलासा विचारणे आणि त्याचे उत्तर/खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे हे माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीबाबत जर काही शंका असेल तर

त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या विषयाशी संबंधित असलेल्या अभिलेखांची तपासणी करुन घेणे योग्य राहिल, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने नमुद केलेल्या मुद्यातील माहिती त्यांनी जरी प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असली तरी, अपिलार्थींच्या शंकांचे निरसन करण्याचा जन माहिती अधिकारी यांनी पुरेपूर प्रयत्न केल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र.५ मधील नमुद केलेल्या २५ व्यापाराच्या दुकानाच्या पत्त्याबाबत आग्रही असल्याचे दिसून आले. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर, जकात विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने संबंधित व्यापाऱ्यांच्या दुकानांचे पत्ता शोधणे शक्य होईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. सबब त्यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ मध्ये निर्देशित केलेल्या व्यापारांच्या दुकानांचे पत्ते त्यांनी त्यांच्याकडील जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने प्राप्त करुन घ्यावेत व ते अपिलार्थीस दहा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावेत.अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे, जर जकात विभागातील अभिलेखे व नस्त्यांची पहाणी करणे आवश्यक वाटत असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या नस्त्यांच्या पहाणीसाठी वेगळा अर्ज करावा. अपिलार्थीचा नस्ती/अभिलेखे पहाणीसाठीचा असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर जन माहिती अधिकारी यांनी प्राधान्याने विचार करुन अपिलार्थीस आवश्यक त्या नस्त्या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात. सदर पहाणी नंतर अपिलार्थीस या माहितीच्या सत्यासत्यतेबाबत काही शंका असल्यास, त्या शंका अथवा तक्रारीचे निराकरण त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याकडून अथवा आयुक्त, महानगर पालिका अथवा इतर योग्य त्या शासकीय प्राधिकरणाकडून करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील विहित तरतुदीनुसार दिली असल्याने, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.सबब अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०५.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उरुज अहमद सिद्यीकी, घर नं. ३-९-१८, वजीर मंजिल, किराणा चावडी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३२

निर्णय दिनांक ०६-०६-२००८

श्री. चाँदसाब जाफरसाब चौधरी, : अपिलार्थी
अध्यक्ष, लातूर जिल्हा मनियार हातगाडा
व्यापारी असोसियशन, गैवसपुरा, गल्ली
नं. ४, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, लातूर
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा धर्मादाय सह आयुक्त, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर
जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक धर्मादाय आयुक्त, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चाँदसाब जाफरसाब चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय श्री. बी. आर. नागरे (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मणियार हातगाडा व्यापारी असोसिएशन संदर्भात ०१-१२-२००६ ते ०६-०२-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ दि. ३१-१-२००७ व त्या अगोदर आपल्या कार्यालयात लातूर जि. मणियार हातगाडा असोसिएशन मध्ये काही सदस्य व पदाधिकारी यांनी सदस्याकडून पैसे घेवून अपहार केला त्याची चौकशी करुन त्यांना घटना विरोधी कृत्य केल्याबदल कमी करण्यात यावे. करिता दिलेल्या अर्जावर आपल्या ऑफीसकडून काय कारवाई केली त्याची लेखी माहिती पुराव्यासह मिळावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तथापि या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा प्रथम अर्ज दिनांक ०७-०२-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. पोस्टाच्या पोच पावतीबाबत अपिलार्थी यांना विचारणा केली असता ते पोस्टाची पोच आयोगास दाखवू शकले नाही. त्यांनी आयोगास फक्त पत्र रजिस्टर केल्याची पावती दाखविली. त्यांनी त्यांच्या दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आज देखील आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०७-०२-२००७ चा कथित अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेला प्रथम अपील अर्ज देखील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही. अपिलार्थीचे दोन्ही अर्ज त्यांच्या व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त न झाल्याने त्यांच्याकडून अपिलार्थीच्या दोन्ही अर्जावर कोणतीही कारवाई केली गेली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी ते आज देखील तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती ते आजही त्यांना देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००७ रोजी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनियार हातगाडा असोसिएशन संदर्भात दिनांक ३१-०१-२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर काय कारवाई केली याची माहिती अपेक्षिली आहे. तथापि अपिलार्थी यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पोहोचला नसल्याने जन माहिती अधिकारी त्यांच्या अर्जावर कोणतीही कारवाई करु शकले नाहीत. तर अपील अर्ज देखील सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात न पोहोचल्याने त्यांना देखील दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई करता आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांचा दिनांक ३१-०१-२००७ रोजीचा अर्ज व माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांना दिल्यास ते अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीचा मूळ व अपिल अर्जाची प्रत अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने अर्ज केल्यापृष्ट्यर्थ फक्त पोष्टात रजिस्टर केल्याची पावती आयोगास दाखविली आहे. सदर पत्र हे "माहितीसाठीचा अर्ज" होता हे अपिलार्थी आयोगासमोर पुराव्यासह सिध्द करु शकले नाहीत. आज रोजीच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने आता संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०७-०२-२००७ रोजीच्या मूळ माहिती अर्जाची व त्यांनी संदर्भ केलेल्या दिनांक ३१-०१-२००७ च्या तक्रार

अर्जाची प्रत सादर करावी.  सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्याची पोच सही घ्यावी. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मागणी केलेली त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चाँदसाब जाफरसाब चौधरी, अध्यक्ष, लातूर जिल्हा मनियार हातगाडा व्यापारी असोसियशन, गैवसपुरा, गल्ली नं. ४, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अंबाजोगाई रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अंबाजोगाई रोड, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४३

निर्णय दिनांक ०६-०६-२००८

श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
पिंपळगाव रेणुकाआई तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप विभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे
(स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग श्री. जससिंग शिवसींग महेर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ यांचे प्रतिनिधी सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री. गुलाब नामदेव सोनवणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " पा. त. शेळूद, दगडवाडी, पळसखेडा पिंपळे क्र. ६, ७ पिंपळगाव व रेणुकाई, करजगाव या कामाचे मजुराचे हजेरीपत्रक, गहू कुपन झेरॉक्स, अंदाजपत्रके, आलेला निधी, प्रत्यक्षात झालेला खर्च दि. ८-७-२००५ अखेरपर्यंत शाखा अभियंता आर. एल. कोरडे यांचे कडील कामे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे म्हटले आहे. मात्र त्यासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबत कोणताही पुरावा जोडल्याबाबत उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये जारी केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती निःशुल्क देण्याचे व उपविभागीय अभियंता यांना प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याचे आदेशीत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होऊनही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते तीन वेळा गेले होते. ते निश्चितपणे कोणत्या तारखेस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले याची माहिती अपिलार्थीस आयोगास देता आली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते उपस्थित राहिल्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा आज त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २८-०६-

२००७ रोजी दिलेली असून त्यांची आता याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे अपिलार्थीने त्यांना लेखी लिहून दिले आहे. अद्यापही अपिलार्थीस माहितीची आवश्यकता असेल तर अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्यावर दिनांक २४-०४-२००७ रोजी आदेश पारीत केले आहेत. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्यासंदर्भात कोणतेही पत्र त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली होती तीचे अवलोकन करता ती अपिलार्थीस विहित मुदतीत देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना फारसे परिश्रम घ्यावे लागले असते अशातली कोणतीही बाब संभवत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाझर तलाव शेळूद, दगडवाडी, पळसखेडा पिंपळे, पिंपळगाव व रेणुकाई करजगाव येथील कामावरील मजुराच्या हजेरीपत्रकाच्या, अंदाजपत्रकाच्या प्रती, प्राप्त निधी व झालेला खर्च इत्यादी माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी ती कामे प्रगतीपथावर होती त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती निश्चितपणे उपलब्ध असावयास हवी. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कोणत्याही प्रकारे विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे

त्यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदींचा पूर्णतः भंग केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे लावित असलेल्या विलंबाचे समर्थन या घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर करता येणे केवळ अशक्य आहे. किंबहुना जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी घेतलेल्या भूमिकेचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत त्यांना करता येणार नाही अशी परिस्थिती येथे निर्माण झाली असल्याचे दिसून येत आहे असे येथे म्हणणे जास्त संयुक्तीक ठरेल असे आयोगास वाटते. अपिलार्थीने दिनांक ०५-०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली व आपले आदेश दिनांक २४-०४-२००७ रोजी पारीत केले. एखाद्या सुनावणी अर्जावर निर्णय कसा असू नये याचे हा निर्णय म्हणजे उत्तम उदाहरण आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. सदर निर्णय त्यांनी त्यांचे कोणतेही समर्थन न करता दिला आहे. या निर्णयावर सहाय्यक अधीक्षक अभियंता यांची सही आहे. तसेच या निर्णयामध्ये त्यांनी उपविभागीय अभियंता यांना प्रतिदिनी रुपये २५० /- इतका विलंबाच्या कालावधीसाठी दंड लावला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या दोन्ही कृती पूर्णतः अवैध आहेत असे आयोगाचे मत आहे. कोणत्याही अपिलावर निर्णय देतांना तो निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतःच्या सहीने पारीत करणे आवश्यक आहे. निर्णय घेणा-या व्यक्तिची स्वतःची सही असल्याशिवाय तो वैध ठरत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे कोणतेही अधिकार नसतांना त्यांनी केवळ आपल्या कडील प्रशासकीय अधिकाराचा गैरवापर करुन सदर निर्णय दिल्याचे दिसून येत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेला त्यांचा दिनांक २४-०४-२००७ रोजीचा आदेश आयोग रद्द ठरवित आहे.

अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने त्यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची व्यक्तिशः मागणी केली होती. **व्यक्तिशः माहिती अपेक्षित असल्यास अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेणे असा होतो. ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थी ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहतील त्यावेळी त्यांच्या उपस्थितीपृष्ट्यर्थ संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालया-कडून तसे प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे असे येथे नमूद करण्यात येत आहे.** अपिलार्थीने अशा प्रकारची कोणती कृती या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. कोरडे आर. एल. शाखा अभियंता यांच्या कडील कामासंदर्भात केलेली तक्रार मागे घेत असल्याबाबतचे अपिलार्थीचे दिनांक २८-०६-२००७ चे निवेदन आयोगास सादर केले आहे व या निवेदनाच्या आधारे त्यांनी दिनांक २८-०६-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचा युक्तिवाद केला आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या निवेदना-खालील सही त्यांची नाही. अपिलार्थीचे यांचे म्हणणे ग्राह्य धरुन त्यांना माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच त्यांना १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या संपूर्ण प्रकरणा-मध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका आयोगास संशयास्पद आढळून येत असून त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले

व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक २४-०४-२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

४. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगाव रेणुकाआई तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५७

निर्णय दिनांक ०६-०६-२००८

श्री. सपकाळ स्वप्नील दशरथ, : अपिलार्थी
मु. पो. वारेवडगाव, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, भूम, जिल्हा
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सपकाळ स्वप्नील दशरथ हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्री. चवरे बिभीषण मारुती (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. बाळासाहेब अणाजी बोटे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील करण्यात आलेल्या कामासंदर्भात ०१ एप्रिल २००१ ते १५ डिसेंबर २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. भूम तालुक्यात संपूर्ण ग्रामीण रोजगार १२ वा वित्त आयोगा अंतर्गत झालेली कामे ऑडिट, आक्षेप, अपहार प्रकरणात किती ग्रामपंचायती दोषी आहेत.

२. यात दोषी आढळलेल्या ग्रामपंचायती संदर्भात संबंधीत व्यक्तीवर कोणती कार्यवाही केली.

३. किती ग्रामपंचायतीचे ऑडिट झालेले नाहीत व झालेले नसल्यास का झालेले नाही.

तरी विनंती की वरील सर्व सत्य माहिती देण्यात यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जावरुन नेमक्या कशा प्रकारची माहिती त्यांना हवी आहे याचा बोध होत नसल्याचे कळवून अपिलार्थीस साध्या कागदपत्रावर त्यांना हवा असलेला तपशील सुस्पष्ट व मुद्देनिहाय लिहिण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

१९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर खुद्द जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता त्यांचे कनिष्ठ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना सुनावणी घेण्यासाठी सूचित केले. त्यांनी दिनांक २२-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन कोणतेही आदेश निर्गमीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यांनी आयोगाकडे या माहितीसंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी या प्रकरणासंदर्भात संबंधिता-कडून फक्त माहिती प्राप्त करुन घेतली. मात्र अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची व मोफत माहिती मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी त्यांचे म्हणणे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी फॅक्सव्दारे पाठविले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, त्यांनी त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार नाही. सदर माहिती त्यांना पोस्टाने मिळाल्याने सदर प्रकरण निकाली काढण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०६-०१-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती दिली आहे. सदर माहितीचा गोषवारा त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस कळविला. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना सदर माहिती प्राप्त झाल्याचे त्यांना दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे लेखी लिहून दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २२-११-२००७ रोजी सुनावणी घेतली. जन अपिलीय अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक केली असतांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेण्याचे कारण त्यांना विचारले असता त्यांनी वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे सुनावणी घेतल्याचे सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली होती. अशा स्वरुपात माहिती विचारणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट करण्यात आलेली आहे. तिचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती या व्याख्येमध्ये निःसंशयपणे बसत नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०१-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याचे म्हटले

आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेले हे पत्र म्हणजे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी केलेली टाळाटाळ असल्याचे दिसून येत आहे. कारण अपिलार्थीने जरी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली होती तरी त्यांना जी माहिती अपेक्षित होती ती त्यांनी स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस दिनांक ०६-०१-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रामध्ये माहिती दिल्याचे म्हटले आहे. सदर पत्र व त्यासोबतच्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, हे पत्र गट विकास अधिका-याने त्यांच्या कनिष्ठ सहाय्यकाला लिहिलेले आहे व त्याची प्रत अपिलार्थीस दिली आहे. कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार अधिनियमातंर्गत अर्जदाराने माहिती मागविली असल्यास संबंधीत कार्यालयाचे वरिष्ठ अधिका-याने त्याच्या कार्यालयातील संबंधीत कनिष्ठ अधिका-याला अशा प्रकारची माहिती देण्याची पध्दत रुढ नाही, किंबहुना प्रचलीत प्रशासकीय पध्दतीमध्ये अशा प्रकारची कोणतीही कृती अभिप्रेत नाही. माहिती अपिलार्थीने मागितली असता स्वतःच्या कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यकाला ती माहिती देऊन त्याची प्रत अपिलार्थीस देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी काय साध्य केले हे कळून येत नाही, तसेच या पत्रासोबत त्यांनी पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या बाराव्या वित्त आयोगातील कामाचा तपशील कळविला आहे. या पत्रामध्ये देखील अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कोणत्याही प्रकारे समावेश करण्यात आलेला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे परत बाराव्या वित्त आयोगातंर्गत घेण्यात आलेल्या परिस्थितीचा परत एकदा तपशील कळविला आहे. त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जातील मागणीच्या माहितीचा समावेश आढळून येत नाही. थोडक्यात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे

व्दितीय अपील करेपर्यंत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती पुरविली गेली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागद-पत्रावरुन दिसून येत आहे. आता या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दिल्याचे पत्र अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे पाठविले असून यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे या पत्रामध्ये त्यांनी नमूद केले आहे. अपिलार्थीस जरी त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त होण्याप्रीत्यर्थ कोणतीही तक्रार नसली तरी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती अधिकार अधिनियमा-तील कलम ७ अन्वये कोणताही प्रतिसाद दिला नाही हे सत्य शेवटी उरत आहे. उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीबाबत व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबाबत त्यांना आयोगा-तर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर भविष्यात त्यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीत कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, जिल्हा परिषद, उस्मानाबाद मध्ये जन अपिलीय अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांची नेमणूक झाली असतांना त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीचे काम त्यांच्या हाताखालील उप मुख्य कार्यकारी अधिका-याकडे सोपविले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची अशा प्रकारचे त्यांना नेमून दिलेले काम त्यांच्या कनिष्ठाकडे हस्तांतर करण्याची कृती अवैध आहे असे आयोगाचे मत आहे, कारण अपील सुनावणीचा हक्क त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमतील तरतुदीमधून प्राप्त झालेला असतो. त्यांना

एकदा प्राप्त झालेल्या अधिकाराचे त्यांना परत हस्तांतरण करता येणार नाही. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर घेतलेल्या कथित सुनावणीचे कार्यवृत्तांत पाहिल्यानंतर सुनावणी कशी घेऊ नये याचे हे कार्यवृत्तांत उत्तम नमुना असावा असे आयोगास वाटते. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील आपले कर्तव्य नीटपणे न पाळून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग आणि सचिव ग्रामविकास विभाग यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावाबददल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सपकाळ स्वप्नील दशरथ, मु. पो. वारेवडगाव, तालुका भूम, जिल्हा

उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२६

निर्णय दिनांक ०६-०६-२००८

श्री. दिलिप रामगोपाल चितलांगे, : अपिलार्थी
तापडिया सर्कल, निराला बाजार समोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नगर रचनाकार – २,
महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, महानगरपालिका,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक संचालक, महानगरपालिका, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दिलिप रामगोपाल चितलांगे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप

अभियंता, महानगरपालिका श्री. पवार प्रकाश गोपीनाथ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, महानगरपालिका हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे समूह गृहनिर्माण योजने अंतर्गत २६ लोकांना बांधकाम परवानगी देण्यात आली. या परवानगी देण्याच्या प्रक्रियेतील कार्यालयीन टिपणीच्या प्रति मिळण्यासंदर्भात १५ मार्च ते ३१ मार्च २००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" (अ) समूह गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधकाम परवानगी देण्याच्या प्रक्रियेतील कार्यालयीन टिपणीच्या संपूर्ण प्रति मिळाव्यात.

(ब) या २६ लोकांनी बांधकाम परवानगी मिळावी म्हणून आपला अर्ज कधी दाखल केला होता त्याची माहिती द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा कोणताही पुरावा न जोडल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज नामंजूर करुन दप्तरी दाखल केला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०६-२००७ रोजी व दिनांक २०-०७-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. त्याचप्रमाणे अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी सुनावणीस हजर राहिले होते यासंबंधी त्यांनी योग्य तो पुरावा सादर केला आहे. अपिलार्थीने हजर राहूनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना मोफत उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांना आयुक्तांचे स्वीय सहाय्यक यांच्या सहीने निर्गमीत झाले आहेत.

तथापि यापुर्वीच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्याकरिता, त्यांच्याकडील साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यामुळे त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविता येणे शक्य नाही असे कळविले व त्यांच्या कडील त्यांनी विचारलेल्या माहितीशी संबंधीत सर्व नस्त्या त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची व त्यातून त्यांना आवश्यक ती माहिती सशुल्क देण्याची तयारी दर्शविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य

माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी माहिती अधिकारी यांनी चुकीचे कारण पुढे करुन माहिती देण्याचे टाळले, प्रथम अपिलीय अधिका-याने मुदतीत प्रकरण निकाली काढले नाही. अशी कारणे व्दितीय अपील करण्याचे प्रयोजन म्हणून दर्शविली आहेत. या अर्जात त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेले कथित दिनांक १९-०४-२००७ चे पत्र त्यांना दिनांक १९-०५-२००७ रोजी प्राप्त झाले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबत पुरावा त्यांनी सादर न केल्यामुळे त्यांचा अर्ज दप्तरी दाखल केला असल्याचे कळविले आहे. वास्तविकतः त्यांनी मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत असा उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज नीटपणे न वाचता स्वतःच्या मनाने अपिलार्थीने दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडला नसल्याचे अनुमान काढून अपिलार्थीस माहिती न देण्याचे प्रथमतः निर्णय घेतला आहे. या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या निर्णयावर कोणाकडे अपील करावे याचा उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती न मिळाल्याने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रथम अपील करावे लागले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०६-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपलब्धतेमुळे सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे ह्या सुनावणीची तारीख दिनांक २०-०७-२००७ रोजी ठेवण्यात आली. तथापि दिनांक २०-०७-२००७ रोजी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहूनही त्यांची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली नाही. जन अपिलीय

अधिकारी त्या दिवशी कार्यालयामध्ये १२-३० वाजेपर्यत उपलब्ध नव्हते. सुनावणीची वेळ ११-३० अशी ठरली होती त्यामुळे त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांची वाट पाहून ते हजर असल्याबाबतचे पत्र त्यांच्या कार्यालयात देऊन त्यांचे, कार्यालय सोडले. दिनांक २०-०७-२००७ रोजी त्यांच्या अपिलावर अपिलार्थीच्या उपस्थित सुनावणी झाली नाही. अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर या अपिलावर सुनावणी होण्याच्या मधल्या काळामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये देता येणे शक्य नाही असे कळविले व त्यांना त्यांच्या कार्यालयातील काही नस्त्या तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ०४-०८-२००७ रोजीचे आदेश त्यांना त्यांनी आयोगाकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी अपील केल्याने दिनांक १७-०८-२००७ रोजी प्राप्त झाले. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आजतागायत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. यासंदर्भात त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १३-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे त्यांनी महानगर-पालिकेच्या वेबसाईटवर जाऊन ही माहिती शोधण्याचा प्रयत्न केला असता सदर माहिती महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे आढळून आले नाही. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे त्यानी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मोफत मिळावी व जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीचे पालन न केल्यामुळे त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती एकूण २६ नस्त्याच्या संदर्भातील होती. प्रत्येक नस्तीमध्ये असलेल्या २०० पृष्ठांची संख्या विचारात घेता अपिलार्थीने मागितलेली माहिती अंदाजे ५२०० इतक्या पृष्ठांची होती. सदर माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्या कार्यालयातील त्यांच्या मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागत असल्यामुळे त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमातील कलम ७ (९) प्रमाणे देण्यास नाकारले होते त्याचबरोबर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या नस्त्या पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यासाची तयारी दर्शविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व नस्त्या चौकशीसाठी संचालक नगर रचना पुणे त्यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आल्या असून सदर नस्त्या संचालक नगर रचना यांच्या कार्यालयाकडून परत आल्यानंतर त्या अपिलार्थीस दाखविण्यास त्यांची तयारी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी केलेला अर्ज अपूर्ण आहे. अर्जदार दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहे किंवा कसे, असल्यास त्याबाबतचा पुरावा छायांकीत प्रत जोडावी या, अर्जाच्या विहित प्रपत्रातील क्रमांक (४) च्या मुद्दयापुढे अपिलार्थीने कोणतेही भाष्य केले नाही. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ मध्ये मुद्दा क्रमांक ५ हा संगणक चुकीने एकाच ओळीत या टंकलिखीत केला गेला असल्याचे दिसून येत आहे. अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील क्रमांक (V) मुद्दा क्रमांक ४ हे मुद्दे एकाच ठिकाणी एकाच ओळीत टंकलिखीत केले असल्यामुळे अर्जदार हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा त्यांचा समज होऊन अपिलार्थीचा मूळ माहितीचासाठीचा अर्ज त्याच दिवशी निकाली काढला, तथापि त्यानंतर आपली चुक लक्षात आल्यानंतर व अपिलार्थीने जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील गेल्यानंतर त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००७ रोजी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावरील निर्णय अपिलार्थीस दिला. जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी या माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे अपिलार्थीस माहिती दिलेली नाही मात्र अपिलार्थीस सदर नस्त्यांची पाहणी करण्यासाठी देण्याची तयारी दर्शविली आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. या टाळाटाळीचे कारण, जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत प्रमाणात होती असे दिले आहे. सदर कारण आयोगास मान्य नाही. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना त्यांचा प्रथम अर्ज चुकीच्या पध्दतीने व अपूर्णरित्या भरला आहे त्यामुळे आता त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी अधिनियमातील विहित केलेली मुदत जरी व्यपगत झाली असली तरी त्यांना आवश्यक असलेल्या माहिती-साठी त्यांना आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रती पृष्ठ रुपये २ या दराने भरावे लागेल. विचाराधीन अपिलामधील माहितीच्या उपलब्धेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी या सर्व २६ प्रकरणाशी संबंधीत नस्त्या चौकशीसाठी संचालक नगर रचना कार्यालय पुणे यांच्या कार्यालयात पाठविल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. आता या टप्प्यावर जर अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास तयार असतील तर त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचा कोणताही आक्षेप असण्याचे कारण नाही असे आयोगास

वाटते. सदर नस्त्या त्यांनी जरी संचालक नगर रचना कार्यालय यांच्याकडे चौकशी-कामी पाठविल्या असल्या तरी त्यांनी या नस्त्या संचालक नगर रचना कार्यालय पुणे त्यांच्याकडून हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हस्तांतर करुन घ्याव्यात व त्यातील माहितीशी संबंधीत पृष्ठाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस सशुल्क पुरवाव्या असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे नीटपणे वाचन न केल्याने त्यांनी घिसाडघाईने आपला अपिलार्थीस माहिती न देण्याचा निर्णय कळविला ही त्यांच्या हातून घडलेली चूक आहे. तद्वतच अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात दिनांक २५-०६-२००७ रोजी या अधिनियमातील विहित मुदत व्यपगत झाल्यानंतर आपला निर्णय कळविला आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब खचितच समर्थनीय नाही. या विलंबाबाबत त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे दाखल झालेल्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीन्वये विहित केलेल्या मुदतीत निर्णय घ्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगवशात येथे असे आढळून आले आहे की, प्रशासकीय कारभारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने बांधकाम परवानगी संदर्भातील सर्व प्रकरणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याचे धोरण अवलंबिले आहे. तथापि अपिलार्थीने युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना ही माहिती महानगरपालिकेच्या वेबसाईटवर आढली नाही. या प्रकरणातील वस्तुस्थिती पाहता महानगरपालिकेचा कारभार कितपत पारदर्शक आहे याबाबत आयोगाच्या मनात शंका निर्माण होत आहे. त्यांनी आपल्या वेबसाईटचे व्यवस्थापन काटेकोरपणे व योग्य त-हेने करण्याबाबत दक्षता घ्यावी असे आयोगातर्फे आयुक्त महानगरपालिका

औरंगाबाद यांना या प्रकरणी सूचित करण्यात येत आहे. सदर सूचना त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) च्या तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

३. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैली-तील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

४. संचालक नगर रचना यांनी उपरोक्त प्रकरणाशी संबंधीत त्यांच्याकडे महानगरपालिका औरंगाबाद यांनी पाठविलेल्या, सर्व नस्त्या जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याप्रित्यर्थ तात्काळ हस्तांतरीत कराव्यात.

औरंगाबाद
दिनांक ०६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलिप रामगोपाल चितलांगे, तापडिया सर्कल, निराला बाजार

समोर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, (नगररचना), मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, बी. जे. रोड पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२७

निर्णय दिनांक ०६-०६-२००८

श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी, : अपिलार्थी
प्लॉट नं. २४०, सद्‌गुरु निवास,
टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय
आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद यांचे प्रतिनिधी जनसंपर्क अधिकारी श्री. पठाण अजरखॉंन

बशिरखाँन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार नगरपालिका प्रशासन श्रीमती अनिता एस. भालेराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष श्री. हिरालाल हरी ढाकरे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिल्लोड नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे क्र. ३७५ मधील उत्तरेकडील १ एकर क्षेत्र या जमिनीत हिरालाल हरी ढाकरे किंवा इतर व्यक्तींच्या नावाने नाहरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत व बांधकाम मंजुरी दिल्यासंदर्भात ०१ जानेवारी १९९२ ते ०७ मार्च २००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " सिल्लोड नगर परिषद हद्दीतील सर्वे क्र. ३७५ मधील उत्तरेकडील १ एकर क्षेत्र या शेत जमीनीत बांधकाम परवाना, हॉटेल, बिअरबार, विज जोडणी करण्यासाठी व इतर शासकीय कार्यालयातून आवश्यक असणा-या परवान्यासाठी हिरालाल ढाकरे किंवा इतर व्यक्तींचे नावे नाहरकत प्रमाणपत्रे दिलेले आहेत काय ? दिलेले असेल तर त्या प्रमाणपत्राची नक्कल व तसेच १९९६ या वर्षी सदरच्या शेत जमीनीत विना परवाना होत असलेल्या बांधकाम बंद करण्यासंबंधी आपल्या कार्यालयाने बजावलेल्या नोटीसांची व इतर बांधकाम करणा-या व्यक्तींने न. प. च्या नोटीसीना अनुसरुन दिलेल्या लेखी उत्तराची प्रमाणित नकल व त्यानुसार न. प. कार्यालयाने कोणती कायदेशीर कार्यवाही केली याची सविस्तर माहिती देणे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जास प्रथम प्रतिसाद देऊन असे कळविले की, “ आपण संदर्भिय अर्जान्वये मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने आपणास कोणती माहिती आवश्यक आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे आपणास माहिती देणे शक्य नाही. आपणास नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा स्वंयस्पष्ट उल्लेख करुन माहिती मागणी केल्यास आपणास विहित वेळेत माहिती देण्यात येईल. तरी स्वंयस्पष्ट कागदपत्राची माहिती मागावी म्हणजे ती देता येईल. ”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले अंतीम आदेश दिनांक २६-०६-२००७ रोजी पारीत केले. आपल्या सुनावणी निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीने माहितीपोटी भरलेले शुल्क त्यांना परत करण्याचे व अपिलार्थीस मुद्देनिहाय ७ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याची सूचना दिली.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या

अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्रमाणीत नकलेची माहिती दिली नाही व मुदतीनंतर माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या पत्राने उत्तर देऊन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे व त्यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास त्यांनी दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे स्पष्ट शब्दात विवेचन केले. सदर स्पष्ट विवेचन केल्यानंतर त्यांना दिनांक १५-०५-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली. सदर माहिती अपूर्ण असून त्यांना आपल्या मूळ अर्जासंदभात प्रथम अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिली आहे, म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. सिल्लोड नगरपरिषदेमार्फत ढाकरे यांना दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत अपिलार्थीने माहितीच्या अधिकारांतर्गत राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागितलेली माहिती त्यांच्या दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती १५-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे दिनांक १८-०४-२००७ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्या-

नंतर त्यांनी त्यावर दिनांक २६-०६-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जात अंशतः प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. तथापि या अर्जातील नाहरकत प्रमाणपत्रे दिलेली आहेत काय, वगळता उर्वरीत माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. वास्तविकतः अपिलार्थीने जरी अंशतः प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असली तरी त्या माहितीचे स्वरुप स्पष्ट होते. त्यामध्ये जन माहिती अधिकारी या दर्जाच्या अधिका-याला न समजावे अशी कोणतीही बाब नव्हती. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीशी केलेला पत्रव्यवहार निष्कारण केल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे हे त्यांच्याकडील दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले याही वेळी अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रश्नांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तरे दिलेली आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अर्धवट व चुकीची कशी आहे हे विचारले असता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील विनापरवाना बांधकाम प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कारवाईच्या माहितीची मागणी केली होती. सदर माहिती त्यांना अद्यापही प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती अर्धवट ठरत आहे, तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये हिरालाल हरी

ढाकरे यांना बांधकामासाठी कोणतेही नाहरकत प्रमाणपत्र दिलेले नाही असे नमूद केले आहे. मात्र अपिलार्थीने सिल्लोड नगरपरिषदेच्या कार्यालयाने हिरालाल हरी ढाकरे यांना दिनांक २७-०५-२००७ रोजी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची सत्य झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन असे दिसून येते की, श्री. हिरालाल हरी ढाकरे यांनी नाहरकत प्रमाणपत्र करिता दिनांक २७-०५-२००७ रोजी मुख्याधिकारी नगर परिषद सिल्लोड यांच्याकडे अर्ज केला होता. हिरालाल हरी ढाकरे यांनी ज्या दिवशी अर्ज केला त्याच दिवशी मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी तत्परतेने हिरालाल हरी ढाकरे यांना नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. ढाकरे यांना नहरकत प्रमाणपत्र न दिल्याची खोटी माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दयासंदभात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील प्रमाणे अर्धवट व खोटी माहिती दिल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अशा प्रकारची अर्धवट चुकीची माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा व नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. तेव्हा अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, सचिव (नगरविकास) यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या व नितांत सचोटीच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत

करण्यात येते की, त्यांनी आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (नगरविकास) यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जयचंद्र श्रीकिसन मोदानी, रंगारहट्टी गोजरेगल्ली, पैठण, तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण, तालुका

पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (नगरविकास), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२८

निर्णय दिनांक ०६-०६-२००८

श्री. कांबळे चतुरंग रामदास, : अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ता. किनवटचा
चतुरंग, कार्यालय, सिध्दार्थ नगर,
"जेतवन बौध्द विहार" जवळ, किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार तथा तालुका

दंडाधिकारी कार्यालय, किनवट,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,

किनवट, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार, महसूल-१, तहसील कार्यालय किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कांबळे चतुरंग रामदास (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व नायब तहसीलदार, महसूल-१, तहसील

कार्यालय यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार, महसूल-२, तहसील कार्यालय श्री. हावळे बंकट जळबाजी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरग्रस्तांना अनुदान वाटपा-संदर्भात ०४ ऑगस्ट २००६ ते ०८ ऑगस्ट २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ ता. ४ ते ८ ऑगस्ट दरम्यान किनवट तहसिल कार्यक्षेत्रात झालेल्या सततधार अतिवृष्टीमुळे आलेल्या महापुरात बाधीत झालेल्या लाभार्थ्यांची माहिती खालील कोष्टकामध्ये द्यावी.

(१) गावाचे नांव, (२) प्रभागाचे नांव, (३) पूर क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणा-या अधिका-याचे / कर्मचा-यांचे नांव व पदनाम, (४) सर्व्हेक्षण केल्याचा दिनांक व त्यांनी केलेल्या सर्व्हेक्षणाच्या छायांकित प्रती, (५) प्रभागातील पुरग्रस्ताचे नांव, कुटूंबातील सदस्यांची संख्या व नांवे, (६) पुरग्रस्ताचा घर क्रमांक, (७) वितरीत अनुदानाची रक्कम, (८) केरोसीन दिल्याचा क्रमांक व केरोसीन वितरकाचे नांव अनुज्ञाप्ती क्रमांक, (९) धान्य वाटपाचा तपशील – वितरकाचे नांव अनुज्ञाप्ती क्रमांक, (१०) अन्य साहित्य वाटत केले असल्यास त्याचे विविरण, (११) पुरक्षेत्राबाहेरील परंतु अनुदान उचललेल्यांची नांवे व अनुदानाचे स्वरुप, (१२) पुरक्षेत्राबाहेरील लाभार्थ्यांची यादी - अनुदान नकारल्याचे कारण, (१३) पुरग्रस्त अनुदान मंजूर परंतू उचल न केलेल्या लाभार्थ्यांचे नांव व रहिवासी क्षेत्र अणि अनुदान न उचलण्याचे कारण, (१४) अनुदान वाटपाचा दिनांक व कालावधी प्रत्यक्ष अनुदान वाटप करणा-या अधिकारी / कर्मचा-याचे नांव व पदनाम. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः / तहसील कार्यालयाच्या टपाल यंत्रणेव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबत सोबत छायांकीत प्रत जोडली असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले की, " माहितीचा अधिकार अंतर्गत, झेरॉक्स काढण्या-करिता मा. जिल्हाधिकारी नांदेड येथे निधीची मागणी केली असून निधी प्राप्त होताच आपणास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात येईल."

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०३-२००७ रोजी पारीत केले. सदर आदेश खालील प्रमाणे आहेत.

" माहिती अधिकारी यांनी अर्जदारांनी दिलेला अर्जावर योग्य ती चौकशी करुन दारिद्र्य रेषेखालील अर्जदारांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडून निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रयत्न करावे व माहितीचा अधिकारी २००५ अन्वये अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेल्या अर्जदाराचे अर्ज त्वरीत निकाली काढावेत असे आदेशीत करुन संबंधीत प्रकरण बंद करण्यात येते. "

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००६ रोजी माहितीची मागणी करुन आजतागायत म्हणजे दीड वर्षाचा कालावधी व्यपगत होऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झालेली नाही. या संपूर्ण कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडून त्यांना माहिती देण्यापोटी आवश्यक ते अनुदान प्राप्त करुन घेण्यापोटी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यांना आजही या माहितीची आवश्यकता आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे निर्देशीत केलेल्या कर्तव्यमध्ये कसूर केल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ व ०७-०३-२००८ च्या पत्राव्दारे आवश्यक ती मागणी अनुक्रमे जिल्हाधिकारी नांदेड व अन्न व नागरी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे केलेली आहे. तथापि संबंधितांकडून अद्यापही त्यांना निधी प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. तर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांच्या

कडे आवश्यक तो निधी उपलब्ध नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल याची जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधाकडे विचारणा केली असता त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अंदाजे रुपये २३०० /- इतका खर्च अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास अंदाजे दीड वर्षाचा कालावधी व्यपगत होऊनही रुपये २३०० /- इतका निधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कार्यालयीन खर्चासाठी उपलब्ध होऊ शकला नाही या बाबीवर विश्वास ठेवणे आयोगास कठीण वाटते. अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो निधी प्राप्त करुन घेण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नसल्याचे विधान त्यांच्या युक्तिवादामध्ये केले आहे त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीस याची विचारणा केली असता ते या मुद्दयावर आयोगास पटेल असे स्पष्टीकरण करु शकले नाही. त्यांनी फक्त जिल्हाधिकारी नांदेड यांच्या कडे दिनांक ०५-१२-२००६ व शासनाकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी निधीची मागणी केली एवढेच सांगितले. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या खरोखरच मनात असते तर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन अथवा टपालाव्दारे पत्र पाठवून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती किमान त्यांना तपासण्यासाठी उपलब्ध करुन दिली असती, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांच्या हातून या प्रकरणी घडली नाही. अपिलार्थीच्या दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदती मध्ये दिनांक २६-१०-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास मूळात प्रतिसाद दिला तोच मुळी अंदाजे २ महिने इतक्या उशिराने. त्यातील अनुज्ञेय कालावधी वगळला तर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास एक महिना विलंबाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस विहित

मुदतीत माहिती देणे हा माहिती अधिकार अधिनियमाचा गाभा असून हे माहिती अधिकार अधिनियमाचे वैशिष्ट्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपल्या वर्तनाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (१) चा भंग केला आहे असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जिल्हाधिकारी, नांदेड यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधीत माहिती अपिलार्थीस देण्याकरिता आवश्यक ते निधी तातडीने मंजूर करावा / करण्याची व्यवस्था करावी. अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र आयोगास सुनावणीच्या वेळेस दाखविले. सदर प्रमाणपत्र अपिलार्थीने दिनांक २०-०९-२००६ रोजी किनवट नगरपरिषदेकडून प्राप्त करुन घेतले आहे. यावरुन अपिलार्थी हे अर्ज करतेवेळी दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत आहे.

प्रसंगवशात अपिलार्थीने आज रोजी राज्य माहिती आयोगाकडे एक लेखी निवेदन दिले असून त्यामध्ये अशी विनंती केली आहे की, शासनाच्या सर्व विभागास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीव्दारे जनसामान्यांना माहिती प्राप्त करुन देण्यापोटी कार्यालयीन खर्च या शिर्षाखाली जास्तीचे अनुदान देण्याची शिफारस त्यांनी शासनाकडे करावी.  अपिलार्थी यांच्या सुचनेची आयोगाने नोंद घेतली असून आयोग त्यांच्या वार्षिक अहवालामध्ये अशा प्रकारची शिफारस शासनाकडे करण्याचा विचार करील असे त्यांना आश्वासीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना तातडीने आवश्यक तो निधी उपलब्ध करुन द्यावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक

महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद<br>दिनांक ०६-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कांबळे चतुरंग रामदास, मुख्य संपादक, साप्ता. किनवटचा चतुरंग, कार्यालय, सिध्दार्थ नगर, "जेतवन बौध्द विहार" जवळ, किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, महसूल-१, तहसील कार्यालय किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२१

निर्णय दिनांक : ०७.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मीर फकरअली मीर जफरअली,<br>औरंगाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालय अधीक्षक,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,<br>पानचक्की, औरंगाबाद.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,<br>पानचक्की, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद श्री. शेख जफर शेख इब्राहिम ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद श्री. सोमनाथ एस. गुंजाळ ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. मीर फकरअली मीर जफरअली (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०५.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून मौजे अंबा ता.कन्नड जि.औरंगाबाद येथील मालमत्तेचा लिलाव व भाडेपट्ट्याबाबत वक्फ बोर्डाकडून करण्यात आलेल्या कराराबाबत सन २००५ ते २००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " Copies in any form Xerox, floppy, cd registers, files, photo, or any other for the above land/property (1) The action taken and inspection report for the notices (a) ow. No. 732 dated 12/9/2005, (b) cw/749 dated 29/9/2005, (c) ow/28 dated 15,2/2006,(d) ow/dist/339/ dated 12/7/2006 (e) letter by fakhar Ali dated 22/6/2006, dated 13/6/2006, 13/6/2005, 8/6/2005,& letter of your off, dt. 27/7/2005, (2) The order/resolution passed for the lease of said property after application of cancellation & objection of the public. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती न देता अपिलार्थीस कळविले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेणे चालू असून, सदर माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त होताच, त्यांना ती पुरविण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तथापि त्यांनी या संदर्भात अपिलार्थीस दि. १८.५.२००७ रोजी अपिलार्थीस पत्र पाठवून असे कळविले आहे की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जिल्हा वक्फ

अधिकारी, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता टाळाटाळ केली असल्याचे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहितीचा प्रथमतः अर्ज केला, त्यावेळी ते माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीने अर्ज केला त्यावेळी मोहंमद मारुफ, ओव्हरसियर ऑफ द बोर्ड हे अधिकारी जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्याची कारणे ते आता सांगू शकत नाहीत. आता त्यांनी अपिलार्थी यांना, विचाराधीन अपिलासंदर्भातील माहिती दि. १५.५.२००८ रोजी संपूर्णपणे देऊन सदर माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थी यांची पोचपावती घेतली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही असलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी या पदाचा दि. १२.५.२००८ रोजी पदभार स्वीकारला असून तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यानी अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी का घेतली नाही, या संदर्भात त्यांना काहीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ८.२.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच अधिनियमातील विहित मुदत टळून गेल्यानंतर प्रथम प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्याचे काम चालू असून, संबंधित विभागाकडून त्यांना माहिती प्राप्त होताच ती त्यांना पुरविण्यात येईल, असे आश्वासित केले होते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थीस निश्चितपणे केव्हा प्राप्त होईल, यावर भाष्य केले नाही. अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीन्वये अपिलार्थीस माहिती देण्यापोटी किती शुल्क त्यांचे कार्यालयात भरावे लागेल या संबंधातील कार्यवाही देखिल संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत केल्याचे दिसून येत नाही. वास्तविकतः अपिलार्थीने मागितलेली माहिती ही नजिकच्या भूतकाळातील असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी फारसे परिश्रम घ्यावे लागले असते, अशातला भाग या प्रकरणी दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पहाता ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांचे कार्यालयातील मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागण्याची शक्यता देखिल या प्रकरणामध्ये कोणत्याही परिस्थितीत संभवत नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पुरेपूर टाळाटाळ केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय देण्याऐवजी अपिलार्थीस जिल्हा वक्फ बोर्डाकडून माहिती घेण्याचे सूचित केले. ही त्यांची

कृती चुकीची व बेपर्वाईची आहे, असे येथे स्पष्ट होत आहे. त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या त्यांच्या दिनांक १८.५.२००७ रोजीच्या पत्रावरुन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डामधील क्षेत्रीय कार्यालयामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका अद्यापपर्यंत झाल्या नसल्याचे प्रतीत होते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, मराठवाडा वक्फ बोर्ड असे सूचित करण्यात येते की, त्यांनी विभागातील जिल्हा स्तरावरील जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका सत्वर केल्या जातील, असे पहावे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती आता दि. १८.५.२००८ रोजी दिल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस विचाराधीन अपिलामधील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १८.५.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाली असली तरी ती अक्षम्य विलंबाने प्राप्त झाल्याचे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे कशा प्रकारे सिध्द होत आहे, याचे वरील परिच्छेदात योग्य ते विवेचन केले आहे. सारांश, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा १वर्ष,२महिने व ११ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये न देऊन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी लावलेल्या १ वर्ष,२ महिने व ११ दिवस इतक्या कालावधीच्या विलंबासाठी, त्यांना एकूण २५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात जास्तीत जास्त पाच हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली करावा.

लेखाशीर्ष-

**"००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार-००७०-००६-१"**

माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सहाय्यक व कर्मचारी यांना देखिल माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता वरील शास्ती जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी यांना एकत्रितपणे लावण्यात येत आहे. या शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांनी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसांचे आत करावी व संबंधित कर्मचारी शास्तीचा भरणा नियमितपणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे व या संबंधातील आपला अहवाल ऑगस्ट २००८ पासून दरमहा नियमितपणे, शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरली जाईपर्यंत, आयोगास पाठवावा.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी या सर्वांना मिळून एकूण २५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

३.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना वरील आदेश क्र.२ च्या अनुपालनाचा अहवाल आयोगास माहे ऑगस्ट ०८ पासून

नियमितपणे दरमहा आयोगास सदर शास्तीची रक्कम पूर्णपणे शासकीय कोषागारात भरुन होईपर्यंत सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मीर फकरअली मीर जफरअली,एस.आर.टी.११८, लेबर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोड, पानचक्की औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२२

निर्णय दिनांक : ०७.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण,<br>मु.पिंपरखेडा पो.हिवरा,<br>ता.आष्टी जि.बीड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>जिल्हा परिषद, बांधकाम विभाग<br>आष्टी, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बांधकाम )<br>जिल्हा परिषद, बीड. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, आष्टी जि.बीड श्री.वसंत मारुती गायकवाड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद बीड ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. रणजित नामदेवराव चव्हाण (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०६.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००६ ते ६.२.२००७ या कालावधीतील रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) संबंधित विभागाचे तालुक्यामध्ये किती कामे चालू आहेत.असलेल्या कामाचा तपशील घ्यावा.(२) संबंधीत कामाच्या निवीदा किती आल्या.(३) कोणत्या-कोणत्या कंपनीकडुन आल्या. (४) निविदा कोणत्या कमीटी समोर उघड झाल्या त्या दिवसाचा दिनांक व कमीटीचे नाव (५) संबंधित रस्त्यांविषयी सरकारी बजेट कीती (६) लेवल, खडीकरण,डांबरीकरण,बी.बी.एम.कार्पेट एकाच कंपनीला देण्यात झाल्या का ? (७) संबंधीत कामांचा कालावधी द्यावा. (८) जर संबंधीत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यास तुम्ही कंपनीला दंड आकारता का ? आणि आकारत आसल्यास आतापर्यंत किति व कोणत्या कंपनीला दंड आकारला (९) संबंधीत माहीती सखोल व सुअक्षरामध्ये देण्यात यावे. "

सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना कोणकोणत्या बाबतीत प्रतींची आवश्यकता आहे, याची विचारणा केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.०३.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कार्यवाही करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.४.२००७ व ७.५.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी व त्यांचे ॲडव्होकेट श्री. देशमुख या पैकी कोणीही सुनावणीस हजर राहिले नाहीत.अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ८.५.२००७ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले आहे. सदर अपील निकाली काढण्याची कारणमिमांसा देतांना त्यांनी असे नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांना त्यांचे कार्यालयाशी अपिलार्थीस संपर्क साधण्यास व प्रतीपृष्ठ रु.२/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात माहितीपोटी भरण्याची सूचना करुनही अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरणा करण्यासंदर्भात कोणताही संपर्क त्यांचेशी साधला नाही, तसेच दि. २५.४.२००७ व दि. ७.५.२००७ रोजी ठेवलेल्या सुनावणीस देखिल अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे अनुमान काढण्यात येत आहे व या अनुमानाच्या आधारे त्यांनी वरीलप्रमाणे निर्णय दिला आहे. जन अपिलीय यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०५.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना माहितीसाठी नेमकी किती फीस भरावी याबाबत काही कळविले नाही व त्यांना अद्यापही माहिती प्राप्त झाली नसल्याने ती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे व याचबरोबर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांचेकडे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये तयार होती. तथापि सदर माहिती अपिलार्थीस देण्यापोटीचे शुल्क अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात न भरल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. त्याचबरोबर अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठीही गैरहजर राहिले होते. यावरुन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी फारसे स्वारस्य नाही. असे त्यांना वाटते. अपिलार्थीने मागितलेली माहिती ते आजही अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने प्रथम अपील करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थी हे त्यांच्या प्रथम अपीलावर ठेवण्यात आलेल्या सुनावणीचे वेळी गैरहजर राहिले तसेच माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात स्वतः हजर न राहिल्याने त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीचे आवश्यक ते शुल्क कळविता आले नाही व माहिती पुरवता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीमध्ये बहुतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियमामधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीने प्रश्न विचारावयाचे व त्याची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची अशाप्रकारचा पत्रव्यवहार अपेक्षित नाही. अर्थात, या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना, कार्यकारी अभियंता म्हणजे या प्रकरणातील

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून घ्यावी लागत असल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठवून देणे भाग होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i)मधील तरतुदीनुसार त्यांना ही कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापि या प्रकारची कार्यवाही त्यांनी केल्याचे येथे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संबंधित डांबरीकरणाच्या कामाच्या संबंधित निविदा नस्तीमध्ये सहजपणे उपलब्ध होऊ शकली असती, त्यामुळे जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील कामाच्या निविदा नस्तीची व अर्थसंकल्पाशी संबंधित माहिती ही अपिलार्थीस पुरविता आली असती. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस जरी प्रथम प्रतिसाद अधिनियमातील विहित मुदतीत दिला असला तरी, त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस देऊ करण्यात येत असलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या कळविली नाही. तसेच अपिलार्थीने टपालाने माहितीची मागणी करुनही त्यांनी अपिलार्थीस स्वतःच्या कार्यालयात हजर राहण्याचे अपेक्षित केले ही जन माहिती अधिकारी यांच्या हातून या प्रकरणात घडलेली चुक आहे. अपिलार्थीने टपालाने माहितीची मागणी केली असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात समक्ष हजर रहावे, अशी त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी केलेली अपेक्षा चुकीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील प्रथम अर्जामध्ये अपिलार्थीने जशाप्रकारे माहिती अपेक्षित केली आहे, त्याचप्रकारे अपिलार्थीस माहिती देणे हे या अधिनियमामध्ये मूलतः अभिप्रेत आहे.अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार या प्रकरणी ३५ दिवसांचे आत अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क पत्राने कळविणे आवश्यक होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती केल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. अपिलार्थी हे त्यांच्या मागणीबाबत फारसे गंभीर नसल्याचा युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी

आयोगासमोर केला आहे. अपिलार्थी हे प्रथम व द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या या अनुमानास पुष्टी मिळते, असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे जबाबदार ठरत आहेत. त्यांनी अपिलार्थीबरोबर चुकीचा पत्रव्यवहार करुन व माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१), कलम ६(३)(i) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांनी उपरोक्त जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याचे आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांनी या प्रकरणी उपरोक्त जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रणजित नामदेवराव चव्हाण, मु. पिंपरखेडा, पो. हिवरा ता.आष्टी जि.बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, आष्टी जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२२९

निर्णय दिनांक : ०७.०६.२००८

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी, : अपीलार्थी
रा. सेलू, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, सेलू,
जि. परभणी
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, जि.परभणी यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. सुधाकर विठ्ठलराव खैरे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार श्रीमती. अनिता एस. भालेराव ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १८.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००६ ते २००७ या कालावधीतील मोडकळीस आलेल्या व पाडण्यात आलेल्या इमारतींविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " शास्त्रीनगर येथील पाडण्यात आलेली बारा खोल्या हि इमारत का पाडण्यात आली. त्याबद्दल कोणत्या सभेत ठराव घेण्यात आला त्याची प्रत. ही इमारत पाडतांना संबंधित विभागाकडून परवानगी घेण्यात आली का, परवानगी घेतली असता त्याची प्रत या इमारतीपेक्षा अधिक कालावधीच्या इमारती आज सेलू न.प.हद्दीत आहेत काही खाजगी संस्थांच्या निमशासकीय, शासकीय त्यांना का पाडण्यात आले नाही त्याबद्ल चा सर्व खुलासा लिखीत स्वरुपात मुख्याधिकारी व संबंधित अधिकायांच्या स्वाक्षरीत"

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही व त्यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.०६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०७.२००७ रोजी सुनावणी घेतली व आपले आदेश दि. ०९.०७.२०७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आहेत. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"शासकीय माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना त्यांचे विनंती अर्जात नमुद केल्यानुसार नगरपरिषद हद्दीतील १२ खोल्या ही इमारत पाडण्यात येण्यासंदर्भात जर नगरपरिषदेच्या सभेत ठराव घेण्यात आला असेल तर, त्या ठरावाची प्रत, अपीलार्थी यांना पुरवावी. ठराव घेतला नसल्यास तसे अपीलार्थी यांना कळवावे. तसेच इमारत पाडतांना परवानगी दिली असल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थी यांना पुरवाव्यात. नसल्यास तसे अपीलार्थी यांना कळवावे. या इमारती पेक्षा जास्त कालावधीच्या इमारती का पाडण्यात आल्या नाहीत या मागणीवर अपीलार्थी यांना कोणताही खुलासा करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर इमारती का पाडण्यात आल्या नाहीत, ही माहिती द्यावी अशी विनंती करणारा अपीलार्थी यांचा अर्ज खुलाशाचे हद्दीपर्यंत ना मंजूर करण्यात येत आहे. मात्र त्यांना आवश्यक असलेली वर नमूद केलेल्या माहितीच्या प्रती अपीलार्थी यांना ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात."

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. नगर परिषदेने या अर्जात उल्लेख केलेली इमारत पाडण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांची परवानगी घेणे आवश्यक होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही परवानगी संबंधित नगर परिषदेने जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतली नाही. सदर नगरपरिषदेच्या कारभाराविषयी त्यांनी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून सदर दावा चालविण्याकरिता त्यांना पुरावा म्हणून नगरपरिषदेकडून ही माहिती हवी आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस जाणीवपूर्वक माहिती देण्याचे टाळले जात असून आजतागायत त्यांना नगर परिषदेकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात उल्लेख केलेली इमारत ही नगरपरिषदेच्या मालकीची असून तिचे हस्तांतरण नगराध्यक्ष यांच्या भावाला शाळेकरिता अवैधरित्या झालेले आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील तीन विभागाशी संबंधित असून अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना, बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित लिपीक जे नगर पालिकेच्या वेळोवेळी होणाया बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यासाठी नेमले गेले आहेत, त्यांचेकडून मिळणे आवश्यक होते. तथापि या तीनही विभागाकडून माहिती मिळण्यास उशीर झाल्याने, ते अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता तयार असून सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २०.६.२००७ च्या अपील अर्जावर त्यांनी दि. ६.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.९.७.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मूलतः त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ‘माहिती’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिल निर्णयामध्ये पुरेसा उहापोह केला असून, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.७.२००७ रोजीच्या दिलेल्या आदेशामध्ये माहिती देण्याचा कालावधी वगळता बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.७.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे केलेले आदेश तसेच कायम ठेवण्यात येत आहेत, आता प्रश्न उरतो तो फक्त

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न पुरविण्याचा त्यासंदर्भात उपरोक्त प्रकरणी असे दिसून येते की, मूळात जन माहिती अधिकारी यांनी स्वतः अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आयोगासमोरील सुनावणीच्या दिनांकापर्यंत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींची जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीद्वारे एकप्रकारे विटंबनाच केली आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा केलेला युक्तीवाद की, त्यांना त्यांचेकडील तीन विभागाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, हे आयोगास मान्य नाही. कारण हे तीनही विभाग त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करत आहेत. तरीही या प्रकरणी त्यांनी स्वतःच्या हाताखालील विभागाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही, हे त्यांच्या ढिसाळ प्रशासनाचे द्योतक आहे, असे म्हणावे लागत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. उपरोक्त परिस्थिती पाहता, अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी हे सर्व जण जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु.२५०००/-एवढी शास्ती लावण्यात येत

आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात ऑगस्ट, २००८ पासून नियमितपणे जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

**"००७० इतर प्रशासकि सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"**

या शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत करावी व संबंधित जन माहिती अधिकारी हे शास्तीचा भरणा शासकीय कोषागारामध्ये नियमितपणे करतील, असे पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल नियमितपणे, सदर शास्तीची रक्कम पूर्णपणे शासकीय कोषागारात भरली जाईपर्यंत,ऑगस्ट ०८ पासून दरमहा आयोगास पाठवावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचे दि. ९.७.२००७ रोजीचे आदेश (अपिलार्थीस माहिती देण्याचा कालावधी वगळता) कायम ठेवण्यात येत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांचे आत संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

४. अपील मान्य करण्यात येत आहे.
५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांचे आत संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी.
६. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना सहाय्य करणाया सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांचेवर या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही असमर्थनीय कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून दीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल,एकूण २५०००/- इतकी शास्ती

लावण्यात येत आहे.सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

७. उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी वरील आदेश क्र.२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचारीनिहाय शास्तीची विभागणी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व तदनंतर शास्तीची संपूर्ण रक्कम संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नियमितपणे शासकीय कोषागारात जमा होईपर्यंत आपला अनुपालन अहवाल माहे ऑगस्ट ०८ पासून दरमहा आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ०७.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेशसिंह प्रकाशसिंह रघुवंशी,रा. गणपती गल्ली, घडी टॉवरजवळ, सेलू, जि.परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, सेलू,जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३३

निर्णय दिनांक ०९-०६-२००८

श्री. सय्यद आसीफअली नूरअली, : अपिलार्थी
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मांजरी,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सय्यद आसीफअली नूरअली हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा

परिषद श्री. जिवाजी बाबुराव बागूल (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. अरुण लक्ष्मणराव डुबे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष श्री. आर. डी. गायकवाड हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. आर. डी. गायकवाड माध्यमिक शिक्षक यांच्या पदोन्नतीसंबंधात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " श्री. आर. डी. गायकवाड माध्यमिक शिक्षक जिल्हा परिषद माध्यमिक शाळ भिवधानोरा तालुका गंगापूर यांची प्राथमिक शिक्षक या पदा-वरुन माध्यमिक शिक्षक या संवर्गात झालेल्या पदोन्नतीचा आदेश शासनाच्या (निर्देश व निकषासह) "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक २६-०६-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिनांक १६-०६-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित कालावधीत माहिती दिली नाही, अपिलीय अधिका-याने आदेशीत केल्यानंतरही १५ दिवस उशिराने माहिती दिली, दिलेली माहिती अर्धवट आहे अशा बाबी अपिलाची कारणे म्हणून दर्शविल्या आहेत.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. या पदावर पूर्वी श्री. नेटके नावाचे अधिकारी होते. नियत वयामानानुसार ते दिनांक ३१ जलै २००७ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. ते या पदावर दिनांक ०४-०९-२००७ पासून

कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्यापुर्वी दिनांक १६-०७-२००७ रोजी पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १८-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २६-०६-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागणी केलेली संपूर्ण माहिती ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये दिलेली माहिती त्यांना दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या आदेशामध्ये अपेक्षित असलेल्या माहितीशी सुसंगत आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या पदोन्नतीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारलेली माहिती देण्यासाठी त्यांची कोणतीही अडचण नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २७-०४-२००७ रोजी जिल्हा परिषदेच्या भिवधानोरा, तालुका गंगापूर येथील माध्यमिक शाळेतील शिक्षक श्री. आर. डी. गायकवाड यांच्या प्राथमिक शिक्षक या पदावरुन झालेल्या पदोन्नतीच्या आदेशाची प्रत शासनाच्या निर्देश व निकषासह मागितले होते. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कडून दिनांक २६-०५-२००७ पर्यत मिळणे अधिनियमातील

तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या पत्राने म्हणजे २१ दिवस इतक्या विलंबाने पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना श्री. आर. डी. गायकवाड यांच्या पदोन्नतीच्या आदेशाची प्रत दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली निर्देश व निकष यासंदर्भातील माहिती त्यांनी एकाच – वाक्यात माध्यमिक शिक्षकांच्या पदोन्नत्या पदवीधर प्राथमिक शिक्षकामधून बी. एड अर्हताधारक असलेल्या शिक्षकांना सेवाजेष्ठतेप्रमाणे पदोन्नती देण्यात येते - अशा प्रकारे दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते या वाक्यामध्ये पदोन्नतीचे निर्देश व निकष समाविष्ठ आहेत. जन माहिती अधिकारी यांचे सदरचे म्हणणे आयोग फेटाळून लावत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने निकषाबाबत मागितलेली माहिती त्यांच्या कडील दिनांक १६-०६-२००७ रोजी पत्राव्दारे पूर्णतः दिली नसल्याने त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस दिलेली माहिती अर्धवट ठरत आहे. शासकीय सेवेमध्ये पदोन्नतीचे नियम तयार करत असतांना प्रत्येक पदासाठी वेगवेगळे सेवानियम तयार केले जातात ज्यामध्ये पदनिहाय निकषांचा समावेश असतो. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्राथमिक शिक्षक ते माध्यमिक शिक्षक या पदोन्नतीसंदर्भात शासन निर्देशीत केलेल्या पदोन्नतीचे नियम (Recrutment Rules) यासंदर्भातील असलेले आदेश याच्या प्रती देणे आवश्यक आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशा प्रकारची माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली नसल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी २१ दिवसांचा विलंब लावला आहे. तथापि संबंधीत जन माहिती अधिकारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्यावर आता अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. अपिलार्थीने अपेक्षित केलेले माध्यमिक

शिक्षक या पदावरील पदोन्नतीकरिता केलेले निकष, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील पृष्ठ ३७ परिशिष्ट-४ अनुक्रमांक ४ मध्ये विस्तृत प्रमाणात स्पष्ट केले आहेत. सदर निकष जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आज सुनावणीचे वेळी दाखविण्यात आले आहेत. या निकषाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविल्यास, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना संपूर्णरित्या मिळू शकते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०९-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद आसीफअली नूरअली, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३६

निर्णय दिनांक : १०.०६.२००८

१ श्री. सुरेश गंगाराम साळवे, : अपीलार्थी

रा. प्रगती कॉलनी,औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, क्रांतीचौक, औरंगाबाद

१ श्री. आर.व्ही.परदेशी : त्रयस्थ पक्ष

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुरेश गंगाराम साळवे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्री. अनिलकुमार पुंजाजी दाबशेडे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) , श्री. सुभाष धोंडीराम माने जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. आर.व्ही. परदेशी (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २१.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. आर.व्ही.परदेशी, सहायक निरीक्षक यांच्याविषयी ते नोकरीस लागल्यापासून दि. २१.४.२००७ पर्यंतची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " श्री. आर.व्ही.परदेशी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था खुलताबाद, जि.औरंगाबाद हे राहणारे नाशिक जिल्हयाचे मात्र जातीचे प्रमाणपत्र राजपूत भामटा, औरंगाबाद तहसील कार्यालयाचे घेतले. त्यांचे जातीचे प्रमाणपत्र, शाळेचा टि.सी.,विभागीय जात पडताळणी समिती यांचा वैध्यते बाबतचा अहवाल, शाळा निर्गम उतारा व सर्व्हीस बुकाच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्सच्या प्रमाणीत प्रती. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दि. १५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे कार्यालयाचे शिपायामार्फत अपिलार्थी यांचे घरी पाठविली. तथापि अपिलार्थीने मूळ अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर अपिलार्थी घरी भेटले नसल्यामुळे त्यांनी ती माहिती दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पोस्टाने पाठविली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३१.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ११.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी आपले या संदर्भातील आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसात माहिती देण्याचे सूचित केले.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्रयस्थ पक्षाला त्यांच्याकडील जातीचे प्रमाणपत्र, शाळेचा टि.सी, विभागीय जात पडताळणी समिती यांचा जात प्रमाणपत्र वैधतेबाबतचा अहवाल, शाळा निर्गम उतारा व सर्व्हीस बुकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत इत्यादीच्या प्रमाणित प्रती अपिलार्थीस पाठविण्याचे सूचित केले व त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस दिली. त्यानंतर त्रयस्थपक्षाने जन माहिती अधिकारी यांना त्याचदिवशी म्हणजे दि. १५.०६.२००७ रोजी त्यांच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना असे कळविले की, अपिलार्थीने मागितलेली माहितीमधील त्यांचे शैक्षणिक व जात प्रमाणपत्र हे गहाळ झाले असल्याचे व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्यासंबंधी मागितलेली माहिती ही काही बऱ्याच वर्षापूर्वीची असल्याने ती उपलब्ध करण्यासाठी वेळ लागत असल्याचे जन माहिती अधिकारी यांना अवगत केले व निदान सध्या तरी ही माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही, असे कळविले. त्रयस्थपक्षाचे हे पत्र प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी परत त्यांच्याकडील दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद, जे या प्रकरणातील त्रयस्थपक्षाचे नेमणूक प्राधिकारी आहेत, त्यांच्याकडून अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात पत्र दिलेले आहे. तथापि त्रयस्थ पक्षाचे नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडेही अपिलार्थी यांनी मागितलेली त्रयस्थ पक्षाबाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांना आढळून आले. सदर माहिती विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २४.७.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रावरुन दिसून येते. त्यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती उपलब्ध झाली नसल्याचे नमुद केले आहे. त्याचबरोबर या अपील अर्जामध्ये

संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे त्रयस्थ पक्षास, ज्यांनी बनावट जातीचे प्रमाणपत्र शासनास सादर केले, त्यांना सहकार्य करीत असल्याचे नमुद करुन त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने त्यांना अपेक्षित असलेली माहिती व कागदपत्रे गहाळ केल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीमुळे त्यांना दि. २०.४.२००७ पासून शास्ती लावावी व संगनमताने रेकॉर्ड गहाळ केल्याबद्दल त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची अपिलार्थीने शेवटी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १५.५.२००७ रोजी कोणतीही माहिती पाठविली नाही. त्यांनी अपिलार्थीस दि. १५.६.२००७ रोजी टपालाने पाठविलेली सदर माहिती त्यांना दिनांक १६.६.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांनी मागणी केलेल्या संपूर्ण माहितीचा समावेश दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रामध्ये नसून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती दिली आहे. त्यांनी व्यक्तीशः माहितीची मागणी केल्याने, स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दि. २१.४.२००७ नंतर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेला होतात व या संदर्भात त्यांच्याकडे काही लेखी पुरावा उपलब्ध आहे काय, याची विचारणा केली असता, या प्रश्नाचे अपिलार्थी यांनी नकारार्थी उत्तर दिले. आजही त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आवश्यक आहे. असे आपल्या युक्तीवादाच्या शेवटी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. ५.६.२००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील शिपायामार्फत स्थानिक टपाल बटवडा पध्दतीने पाठविला होता. तथापि संबंधित शिपायाने या टपालवहीमध्ये 'घर सापडले नाही.पोस्टाने पाठविण्यात यावे.' असा शेरा दिला आहे. अपिलार्थीस स्थानिक टपाल पाठविल्याची सत्यप्रत अथवा नोंदवही जन माहिती अधिकारी हे आयोगास सादर करु शकले नाहीत. अपिलार्थी घरी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे, त्यांना तीच

माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. सदर पत्र अपिलार्थीस दि. १६.६.२००७ रोजी प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थी यांच्या घरातील व्यक्तीची पोचसही असलेले पोष्टाचे कार्ड त्यांनी आयोगास दाखविले. त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्याने या प्रकरणात अपिलार्थी हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर उपलब्ध होऊ न शकल्यामुळे सदर प्रकरण बंद केले होते व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.६.२००७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, त्यांनी अपिलार्थीस दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली होती. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तेवढी माहिती (सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची छायाप्रत व त्रयस्थ पक्षाच्या जातीची नोंद घेतल्याबद्दल त्रयस्थपक्षाच्या सेवापुस्तिकेत केलेल्या नोंदीची छायाप्रत ) त्यांनी अपिलार्थीस दिली. त्यानंतर दि. १९.५.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाने त्यांना त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे कळविले व तदनंतर सदर जात व वैधता प्रमाणपत्राची सत्य झेरॉक्सप्रत अपिलार्थीस आज दि. १०.६.२००८ रोजी सुनावणीच्या दिवशी पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,अपिलार्थीस अपेक्षित असलेली जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध माहितीवरुन व त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त करुन घेऊन दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.५.२००७ रोजीच्या अपिलावर दि. ११.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले आहेत.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती, त्यामुळे संबंधित प्राधिकरणाकडे वैयक्तीकरित्या संपर्क साधून त्यांना ही माहिती विशेष मेहनत करुन प्राप्त करुन घ्यावी लागली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची काहीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, त्रयस्थपक्षासह दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्षाच्या जातीचे प्रमाणपत्र, शाळेचा टी.सी., शाळा निर्गम उतारा, विभागीय जात पडताळणी पथकाचा त्यांच्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा अहवाल व सेवापुस्तिकेतील पहिल्या पानाच्या झेरॉक्सप्रतीच्या प्रमाणित प्रती इत्यादी माहितीची मागणी केली होती. या पैकी अपिलार्थीस सेवापुस्तिकेतील पहिल्या पृष्ठाची छायाप्रत व अपिलार्थीच्या जातीची नोंद घेतलेल्या पृष्ठाची छायाप्रत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. तर दि. १०.६.२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील त्रयस्थपक्षाच्या जातीचे प्रमाणपत्राची व विभागीय जात पडताळणी विभागाचे वैधता अहवालाची सत्य झेरॉक्स प्रत दिली आहे. या ठिकाणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्षाची शाळेच्या टी.सी. व शाळा निर्गम उताऱ्याच्या प्रतीची मागणी केली आहे. या प्रती शासकीय प्राधिकरणामध्ये उपलब्ध नसतात, हे सर्वश्रुत आहे. शालेय शिक्षण संपल्यानंतर महाविद्यालयात प्रवेश घेतांना शाळेच्या टी.सी.ची मूळ प्रत महाविद्यालयामध्ये दाखल करावी लागते, त्यामुळे ही माहिती त्रयस्थपक्षाकडे कोणत्याही परिस्थितीत असणे संभवत नाही. त्याचबरोबर शाळा निर्गम उतारा (School leaving Certificate) याची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे उपलब्ध असू शकणार नाही. त्रयस्थ पक्षाचा वैयक्तिक तपशील त्यांच्या सेवापटलामध्ये नोंदविला जातो, त्यांचे नोकरीच्या कार्यकाळातील घडणाऱ्या प्रत्येक आस्थापनाविषयक तपशील उदा. त्यांची प्रथम नेमणूक, त्यांची जन्मदिनांक, त्यांनी घेतलेल्या रजा व त्यांच्या वेळोवेळी झालेल्या बदल्या व इतर तदनुषंगीक तपशील नोंदले जातात. त्रयस्थपक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एवढीच माहिती असणे अपेक्षित आहे. हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून शाळेचा टी.सी. व शाळा निर्गम उतारा प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे. अपिलार्थीस जर त्रयस्थ पक्षाच्या शाळा

निर्गम उतारा व टी.सी. ची प्रत मिळविण्यामध्ये अद्यापही स्वारस्य असेल तर त्यांनी यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे वेगळया अर्जाद्वारे मागणी करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी विशेष मेहनत घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला व या कामी त्यांना त्रयस्थपक्षाचे देखील सकारात्मक सहकार्य प्राप्त झाले आहे, हे पाहता अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तनाबाबत घेतलेला आक्षेप पुराव्याअभावी आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यास अपिलार्थीने स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे जाऊन, त्यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून माहिती मिळविणे अपेक्षित आहे. जर अपिलार्थी अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांचेकडे स्वतः उपस्थित राहिलेल्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसेल तर, त्यांनी आपली उपस्थिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी नोंदवून ठेवणे अपेक्षित आहे, असे आयोग मानते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती मिळाली नाही, हे त्यांचे म्हणणे येथे गौण ठरते. तसेच या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उशिरा माहिती दिली आहे, या अपिलार्थीच्या मुद्यावर असे भाष्य करण्यात येते की, मूळात अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित मागितलेली माहिती देखील ३४ वर्ष इतकी जुनी असल्याने ती त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना वेळ लागू शकतो. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर हेतुपुरस्सर अथवा कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे निष्पन्न होत नसल्याने, त्यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती मिळाल्याने माहिती पुरविणेबद्दल कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश साळवे,रा. प्रगती कॉलनी,मनपा शाळेजवळ, मकई गेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, क्रांतीचौक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३४

निर्णय दिनांक ०९-०६-२००८

श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, : अपिलार्थी
जिल्हा उपाध्यक्ष नांदेड जिल्हा लघुवृत
पत्र व पत्रकार संघ, नांदेड रा. हिरासिंग
ढाकणीवाले यांचा वाडा बडपुरा,
गुरुव्दारा गेट नं. ३, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गट विकास अधिकारी, पंचायत
समिती, हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(पंचायत विभाग), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कामाजी तुकाराम बनसोडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा गट विकास

अधिकारी, पंचायत समिती श्री. दिलीप उत्तमराव इंगोले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत विभाग), जिल्हा परिषद श्री. विठ्ठल बालागोड बल्लूरकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपरोक्त प्रकरणी हिमायतनगर तालुका पाणीटंचाई निवारणार्थ राबविल्या गेलेल्या तात्पूरत्या नळयोजना संदर्भातील, जानेवारी २००७ ते मार्च २००७ या कालावधीतील, माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> “ हिमायतनगर तालुका पाणीटंचाई निवारणार्थ आपल्या कार्यालयांतर्गत कोणकोणत्या गावांमध्ये तात्पुरता पूरक नळ योजना राबविण्यात आली ? आणि त्यावर एकूण किती रुपये मंजूर करण्यात आले व तसेच एकूण किती रक्कम खर्च करण्यात आली ? ज्या गावामध्ये सदरील योजना राबविण्यात आली त्या गावांची नावे व संपूर्ण पत्तासहित यादी मिळणे व तसेच नवीन विंधन विहिर योजना कोणकोणत्या गावामध्ये व कोणकोणत्या शेत-यांच्या नावाने मंजूर करण्यात आली. व त्यावर एकूण किती रक्कम शासनाने मंजूर केली व प्रती शेतक-यास नवीन विंधन विहिरीसाठी किती रक्कम मंजूर केली त्या त्या शेतक-यांची गावनिहाय यादी व सदरील योजनेविषयीची तपशिलवार माहिती मिळणे. हिमायतनगर तालुका पाणी टंचाई निवारणार्थ कोणकोणत्या गावामध्ये तात्पूरता पुरक नळ योजना राबविण्यात आली त्या गावाच्या नावाची

यादी मिळणे व त्यावर एकूण किती खर्च झाला याविषयीची तपशिलवार व लेखी स्वरुपाची माहिती मिळणेबाबत. ”

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी ती माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती अशा प्राधिकरणाकडे त्यांच्याकडील अपिलार्थीचा अर्ज दिनांक १५-०५-२००७ रोजी हस्तांतरीत केला. संबंधीत प्राधिकरणाने अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती दिलेली नाही व त्यांनी मागितलेली माहिती देण्यास हेतूपूरःस्सर विलंब लावला असल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जासंदर्भात कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, जिल्हा परिषद यांना त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना खोटी व अर्धवट माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीवरुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिमायतनगर तालुक्यातील पाणीपुरवठा योजनासंदर्भात माहिती मागितली होती. वर्तमानपत्रात हिमायतनगर तालुक्यासाठी तात्पूत्या नळ पाणीपुरवठा आराखडा मंजूर झाल्याची बातमी आली होती. यासंदर्भात त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अधिकाराचा उपयोग करुन मागितली आहे. तथापि त्यांच्या या अर्जासंदर्भात त्यांना, कार्यकारी अभियंता (पापु) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून एकही तात्पुरती नळयोजना मंजूर झाली नसल्याचे दिनांक २०-०६-२००७ चे पत्र प्राप्त झाले. या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदर योजनेवरील झालेला खर्च कळविला नाही. मात्र त्यांना उपविभागीय अभियंता हदगाव यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव यांना त्यांच्याकडील दिनांक १५-०५-००७ च्या संदर्भात दिलेल्या उत्तराची एक प्रत प्राप्त झाली असून त्यामध्ये हिमायतनगर तालुक्यामध्ये एकूण ११ गावात नळ योजना मंजूर केल्या असल्याचे कळवून त्याची रक्कम मंजूर झाल्याचेही कळविले. त्यांना २ वेगवेगळ्या स्त्रोतामधून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जानेवारी २००७ ते मार्च २००७ या कालावधीशी

संबंधीत माहिती मागितली होती. या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यायाकडून तात्पूरत्या पाणीपुरवठा नळ योजने अंतर्गत कोणताही खर्च करण्यात आलेला नव्हता. प्रतिवर्षी पाणीटंचाई निवारणार्थ जिल्हा परिषदेमध्ये प्रत्येक पंचायत समितीची एक आमसभा संबंधीत आमदारमहोदयांच्या अध्यक्षेखाली घेण्यात येते. या आमसभेमध्ये जानेवारी ते मार्च व पुढील वर्षातील एप्रिल ते जून या कालावधीकरिता पाणीपुरवठा योजनेसंदर्भात एक कृती आराखडा तयार केला जातो. आमसभेत प्रस्तावित केलेल्या या आराखड्याची जिल्हाधिकारी स्तरावर छाननी केली जाते व तदनंतर सदर आराखडा मंजूर केला जातो. आमसभेने प्रस्तावित केलेला आराखडा जिल्हाधिकारी यांच्या कडून जशाच्या तसा मान्य होतोच असे नाही, वेळप्रसंगी त्यात कपातही केली जाते. या प्रकरणी अपिलार्थीने जानेवारी ते मार्च या कालावधीतील माहिती मागितली होती. या मुद्दयावर संबंधीत माहिती अपिलार्थीस कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), जिल्हा परिषद यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. ही माहिती अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपविभागीय अभियंता हदगाव यांनी त्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राचा उल्लेख केला आहे, ही माहिती २००५-२००६ या कालावधीतील आहे. अपिलार्थीस अधिक माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांना या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, माहितीच्या अधिकाराचे त्यांना आवश्यक ते ज्ञान नसल्याने त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन फक्त अपिलार्थीशी पत्रव्यवहार केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती हिमायतनगर या

कार्यालयाकडे मागितली होती. पंचायत समिती कार्यालय प्रमुख या नात्याने संबंधीत गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) च्या तरतुदीप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी ज्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे त्यांच्याकडे त्यांना अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून देणे अभिप्रेत आहे. तथापि अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००७ च्या अर्जाची गट विकास अधिकारी यांनी मूळात प्रथम दखल घेतली ती दिनांक १५-०५-२००७ रोजी. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुमारे ४७ दिवस इतक्या विलंबाने दखल घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव या प्रकरणी दर्शविला आहे असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याशी संबंधीत असल्याने गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी पाठविला व त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००७ रोजी उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली. कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) जिल्हा परिषद यांच्या अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थीस ही माहिती कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) जिल्हा परिषद यांनी जन माहिती अधिकारी म्हणून दिली नसल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी या नात्याने माहिती अधिकार अधिनियमाव्दारे निश्चित केलेल्या मुदतीत देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकरची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन अपिलार्थीस त्यांचे

म्हणणे मांडण्याची संधी नाकारली आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी वेळीच अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जाची सुनावणी घेतली असती तर कदाचित अपिलार्थीस आयोगाकडे येण्याचे काहीच कारण उरले नसते. वरील अधिका-याच्या प्रशासकीय अनियमिततेमुळे या प्रकरणामध्ये अपिलार्थी हे त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित राहिले असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस आता कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), जिल्हा परिषद नांदेड अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीस आता कोणतीही माहिती देण्याचे शिल्लक राहिले नाही असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे आयोगाचे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणीशी संबधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेउन संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतदीस पात्र ठरविले आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यास सहाय्य करणारे त्यांचे सहकारी कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी असमर्थनीय विलंब लावून दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या

अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहकारी कर्मचारी / अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०९-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष नांदेड जिल्हा लघुवृत पत्र व पत्रकार संघ, नांदेड रा. हिरासिंग ढाकणीवाले यांचा वाडा बडपुरा, गुरुव्दारा गेट नं. ३, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत विभाग), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३५

निर्णय दिनांक ०९-०६-२००८

श्री. खिसे श्रीधर जळबा, : अपिलार्थी
मु. पो. सुगाव तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. खिसे श्रीधर जळबा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी अधीक्षक श्री. रोकडोबा बाबुराव शिंदे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मा. उच्च न्यायालय औरंगाबाद रिट या. क्र. ४२२४/२००३ च्या आदेशानुसार खिसे एस. जे. यांच्या मान्यतेविषयी मा. शिक्षणाधिकारी साहेब (मा) यांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत मिळण्यासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहितीचा कालावधी १६-१२-२००४ ते १६-०१-२००५ असा दर्शविला आहे.

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र या अपील अर्जासंदर्भात त्यांनी अध्यक्ष / सचिव गिरीजन विकास मंडळ, देगलूर, जिल्हा नांदेड, मुख्याध्यापक जागृती विद्यालय, होट्टल, तालुका देगलूर जिल्हा नांदेड यांना त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे एक महिन्याच्या आत त्वरीत कारवाई करण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते जागृती विद्यालय, होट्टल, तालुका देगलूर येथे सह शिक्षक या पदावर कार्यरत होते. त्यांच्या या पदावरील नेमणुकीसाठी शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने त्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे दावा दाखल केला होता. या दाव्यावर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६-१२-२००४ रोजी निर्णय देऊन त्यांच्या मान्यतेसंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यासाठी आदेशीत केले होते. तथापि अद्यापही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी यासंदर्भात कोणताही निर्णय घेतला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार संबंधीत शिक्षणाधिकारी यांनी दिनांक १२-०१-२००५ रोजी अपिलार्थीच्या नेमणुकीस मान्यता न देण्याचा निर्णय घेऊन संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकास त्यांचा निर्णय दिनांक १२-०१-२००५ रोजी कळविला होता व त्यांचा निर्णय अपिलार्थीस कळविण्याचे संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकास आदेशीत केले होते. या सर्व संबंधीत कागदपत्राच्या प्रती व अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजी केलेल्या अपिलासंदर्भात त्यांना दिनांक २२-१०-२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्यातर्फे संपूर्ण माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मा. उच्च न्यायालयाकडे त्यांच्या नेमणुकीस मान्यता देण्यासंदर्भात जो दावा दाखल केला होता व ज्यावर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६-१२-२००४ रोजी निर्णय दिला त्या निर्णयावर काय कारवाई केली याची विचारणा केली. अपिलार्थी हे वर निर्देशीत केल्याप्रमाणे जागृती विद्यालय होट्टल तालुका देगलूर येथे सह शिक्षक या पदावर कार्यरत होते. त्यांनी धारण केलेल्या पदाकरिता डी. एड ही किमान शैक्षणिक अर्हता असतांना देखील अपिलार्थी जे बीपीएड ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे होते त्यांना संबंधीत शिक्षण संस्थेने नियुक्ती दिली होती. डी. एड च्या पदावर सेवानियमा-प्रमाणे बीपीएड ही पदविका धारण केलेल्यांना नियुक्ती देता येत नसल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीच्या नेमणुकीस मान्यता देण्यासाठी नाकारण्याचा निर्णय घेऊन तो संबंधीत मुख्याध्यापकास त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००५ रोजीच्या पत्राने कळविले तसेच अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात देखील त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर केलेली कारवाई कळविलेली आहे. सदर दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी मुख्य प्रश्न असा उपस्थित होतो की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या अर्जास मूळात कोणत्याही प्रकारे

प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे पुरेपूर दर्शन घडविले आहे. उपरोक्त प्रकरणी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांनी अपिलार्थीस निर्णय न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रदीर्घ कालावधीपर्यत वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा

त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०९-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खिसे श्रीधर जळबा, मु. पो. सुगाव तालुका देगलूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३०

निर्णय दिनांक ०९-०६-२००८

श्री. युवराज सुर्यकांत चव्हाण, : अपिलार्थी
प्रशांतनगर, बसस्टॅण्डच्या मागे,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
अंबाजोगाई, जिल्हा बीड
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. युवराज सुर्यकांत चव्हाण (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद श्री. देविदास शिवाजीराव जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय श्री. सोमनाथ गुंजाळ हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगरपरिषदेच्या कोंडवाड्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ नगरपरिषदेच्या जनावरांच्या कोंडवाड्याच्या चार्ज कोण पाहतो, सदरील कोंडवाड्याचा दैनंदिन खर्च काय आहे. २००५ ते २००७ आजपर्यंतच्या कोंडवाड्याचा मासिक खर्च किती, लेखी स्वरुपात देण्यात यावे. आजतागायत किती मोकार जनावरे पकडण्यात आली व त्याचा लिलाव कधी झाला याची सर्वे करणा-यासह माहिती देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील लिलावासंदर्भातील माहिती वगळता उर्वरीत सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिली.

जन माहिती अधिकारी यांच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक १०-०८-२००७ रोजी पारीत केले आहेत. सदर सुनावणीच्या दरम्यान अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना संपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कामकाजात अनियमितता, लक्ष न देणे, अर्जाचे गांर्भीय लक्षात न घेणे, कायद्याचे उल्लंघन करणे, पदाचा दुरुपयोग करुन अर्जदार व शासनाची फसवणूक केली असल्यामुळे त्यांनी प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे रुपये २५००० /- इतकी नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे तसेच जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. याचबरोबर त्यांनी नगरपरिषद कार्यालया-तील अधीक्षक श्री. एस. जी. निर्मळे यांनी पदाचा दुरुपयोग करुन दस्तऐवजावर सह्या केल्याबद्दल व चुकीचे, खोटे दस्ताऐवज तयार करुन दिल्याबाबत पोलीस कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतरही १०५ दिवस इतक्या विलंबाने त्यांना माहिती पुरविली आहे. ही माहिती तयार करत असतांना बनावट दस्तऐवज व कार्यालयीन टिपणी करुन कार्यालय अधीक्षक श्री. एस. जी. निर्मळे यांनी मुख्याधिकारी पदाचा गैरवापर केला आहे त्यामुळे त्यांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश व्हावे व श्री. निर्मळे यांच्यावर पोलीस कारवाई बाबत शिफारस करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीमध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीतील लिलावाच्या माहितीचा समावेश नव्हता कारण मोकाट जनावारांचा लिलाव अपिलार्थीने अर्ज करेपर्यत नगरपरिषद कडून केला गेला

नव्हता म्हणून मोकाट जनावरांचा लिलाव करण्याचा निर्णय झाल्यानंतर या लिलावा-संदंर्भातील वर्तमानपत्रात जाहीररित्या प्रसिध्द झालेल्या नोटीशीची प्रत त्यांनी दिनांक २४-०७-२००७ रोजी अपिलार्थीस दिली आहे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १२-०६-२००७ ला दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती दिल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोच सही असलेले कागदपत्र आयोगास दाखविले. सदर सही अपिलार्थीची असल्याचे अपिलार्थीने मान्य केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०७-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर त्यांनी दिनांक २४-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १०-०८-२००७ रोजी पारीत केले असून अपिलार्थीस दिनांक २४-०७-२००७ रोजी संपूर्ण माहिती मिळाली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती-तील मोकाट जनावरांच्या लिलावासंदर्भातील माहितीचा समावेश या माहितीमध्ये नाही, जन माहिती अधिकारी यांना याविषयी विचारले असता त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या वेळी मोकाट जनावरांचा लिलाव झाला नसल्याचे सांगितले. मोकाट जनावारांच्या लिलावासंदर्भात त्यांना पुढे विचारले असता वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०७-२००७ रोजी दिली असल्याचे आयोगासमोर सिध्द केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २४-०७-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने लिलावासंदर्भात मागितलेली

माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देतांना उपलब्ध नव्हती तर त्यांनी सदर माहिती उपलब्ध नसल्याबाबत अपिलार्थीस कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती या ठिकाणी केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००७ व २४-०७-२००७ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात असली, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही तरीही ती अपिलार्थीस २ टप्प्यावर पुरविली आहे. अपिलार्थीस अंतीमतः पूर्ण माहिती दिनांक २४-०७-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे ही माहिती दिनांक १६-०६-२००७ रोजी प्राप्त होणे अभिप्रेत होते, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यारिता जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३८ दिवस विलंब लागल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी सदर माहिती हेतूपूरःस्सर टाळल्याचे अथवा कोणत्याही असद्हेतूनू दडविल्याचे या प्रकरणी सिध्द होत नाही. मात्र अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक त्या गांभींयाने लक्ष दिल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. अशा प्रकारच्या वर्तनातून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट केला आहे. त्यांना त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सक्त ताकीद देण्यात येत आहे. इतःपर यापुढे त्यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्यास अर्जदाराच्या अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जरी त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असली तरीही जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे रुपये २५००० इतकी नुकसान भरपाई त्यांनी मिळण्यासंदर्भात आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी प्रतीदिनी रुपये २५० हे परिमाण हे अधिनियमातील कलम २० (१) मध्ये नमूद केले असून, २५० रुपये हा विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी-चा शास्तीचा दर असून सदर दर अपिलार्थीस देण्यात येणा-या नुकसानभरपाईचा नाही असे अपिलार्थीस येथे स्पष्ट करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कार्यालयीन अधीक्षक श्री. एस. जी. निर्मळे यांनी खोटे दस्तऐवज तयार करण्याचे नमूद केले आहे. या मुद्दयासंदर्भात अपिलार्थी यांना विचारणा केली असता अपिलार्थीने श्री. निर्मळे यांच्याकडे अपिलावर सह्या असलेल्या आयोगास दाखविल्या. सदर अपिलार्थीच्या मागणीचा दुरान्वये देखील या अपिलाशी कोणताही संबंध नसल्याने अपिलार्थीने निर्मळे यांच्यावर केलेले आरोप फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०९-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. युवराज सुर्यकांत चव्हाण, प्रशांतनगर, बसस्टॅण्डच्या मागे,

अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३१

निर्णय दिनांक ०९-०६-२००८

श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे, : अपिलार्थी
सहाय्यक प्राध्यापक (निवड श्रेणी),
अभियांत्रिकी विद्या शाखा, वाल्मी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
जल व भूमी व्यवस्थापन संस्था
(वाल्मी), औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता व सह
संचालक वाल्मी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) श्री. प्रकाश एकनाथ देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) श्री. दत्तात्रय हरिश्चंद्र पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वाल्मीच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " वाल्मीच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयाची पाहणी (Inspection) आजवर केंव्हा केंव्हा झाली ? प्रत्येक पाहणी कोणी केली ? प्रत्येक पाहणीचे निष्कर्ष काय आहेत ? "

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक ०७-०५-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या सदर अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-

वरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. या उत्तरामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे निर्देश देऊन अपिलार्थीचे दिनांक १२-०६-२००७ रोजीचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली असता या माहितीसंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०६-२००७ रोजी प्राप्त झालेले उत्तर मान्य नाही. प्रशासकीय अधिकारी यांचे कार्यालय हे वाल्मीमध्ये स्वतंत्र कार्यालय म्हणून अस्तित्वात आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्टयर्थ त्यांनी ''वाल्मी'' या संस्थेने ऑक्टोबर १९८० ते मे १९८२ या कालावधीमध्ये शासनास सादर केलेल्या वाल्मीच्या अहवालाची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली. त्यातील मुद्दा क्रमांक ६.२ प्रमाणे प्रशासकीय अधिकारी यांचे स्वतंत्र कार्यालय आहे असे त्यांचे म्हणणे आहे. याचबरोबर इंडियन इन्स्टिटयूट अहमदाबाद या संस्थेने ''वाल्मी'' या संस्थेचे मूल्यमापन केले असून त्या अहवालामध्ये देखील त्याच्या २० क्रमांकाच्या पृष्ठावर प्रशासकीय अधिकारी यांचे कार्यालय वेगळे असल्याचे दाखविले आहे. (संस्थेच्या ट्री चॉर्टमध्ये प्रशासकीय अधिकारी या नावाचा एक चौकोन आहे) जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या माहितीमध्ये ''वाल्मी'' संस्थेच्या नियमीत पाहणी अंतर्गत प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयाची पाहणी केली जाते

असे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेगळी माहिती दिली. या पत्रामध्ये त्यांनी आमदार समिती, वरिष्ठ अधिकारी व राजकीय नेते यांच्या भेटीचा संदर्भ दिला आहे जो त्यांना त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे अभिप्रेत नाही त्यामुळे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती देय आहे तीच माहिती त्यांना प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रशासकीय अधिकारी यांचे स्वतंत्र कार्यालय "वाल्मी" या संस्थेमध्ये नाही. "वाल्मी" ही राज्य शासनाची स्वायत संस्था आहे. प्रशासकीय अधिकारी हे "वाल्मी" या संस्थेमध्ये एक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. प्रशासकीय अधिकारी यांना त्यांच्या दैनंदिन कामामध्ये सहाय्य करण्याकरिता वेगळा कर्मचारीवर्ग नेमला आहे. तथापि प्रशासकीय अधिकारी व त्यांचे सहाय्यक त्यांना प्रशासकीय अधिकारी कार्यालय अथवा मूळ संस्थेचे स्वतंत्र असे उप कार्यालय म्हणून अस्तित्व नाही. संबंधीत कर्मचारी व त्यांचा संच हा वाल्मीचा एक अविभाज्य भाग आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे "वाल्मी" या संस्थेसंदर्भात जर माहिती मागविली तर ती त्यांना देता येईल. या कारणास्तव प्रशासकीय कार्यालयाची ते स्वतंत्रपणे माहिती अपिलार्थी यांना देऊ शकत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस "वाल्मी" या महासंचालकाच्या अधिपत्याखाली असलेल्या या संस्थेच्या तपासणीसंदर्भात अपिलार्थीस माहिती अपेक्षित असावी असे वाटल्यावरुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २७-०७-२००७ रोजी दिलेल्या पत्राव्दारे माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये

स्पष्ट केल्याप्रमाणे प्रशासकीय अधिकारी यांचे "वाल्मी" या संस्थेमध्ये स्वतंत्र कार्यालय आस्तित्वात नाही. प्रशासकीय अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे वाल्मी या संस्थेचे एक घटक म्हणून कार्यरत आहेत. अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जास त्यांनी त्यांच्या दिनांक २७-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक तो निर्णय दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कडे वाल्मीच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या पाहणी संदर्भात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. मूळात या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका त्यांच्याकडे असलेली माहिती जतन करुन ठेवणा-या विश्वस्ताची असते. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारावे व त्यांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी द्यावीत असे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. मात्र माहिती घ्यावयाची असल्यास अशा स्वरुपात विचारलेली माहिती ज्या कागदपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत अशा प्रकारची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयास काही हरकत नाही. अपिलार्थीच्या माहितीचे अवलोकन केले असता पुढे असे दिसून येते की, अपिलार्थीने ही माहिती मागवितांना "वाल्मी" या संस्थेचे प्रशासकीय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या पाहणीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे. मूळात प्रशासकीय अधिकारी यांचे

स्वतंत्र कार्यालय ‘‘वाल्मी’’ या संस्थेमध्ये अस्तित्वात नाही. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ‘‘वाल्मी’’ या संस्थेचा शासनास सादर केलेला प्रथम वार्षिक अहवाल पाहिला असता त्यातील मुद्दा क्रमांक ६.२ मध्ये प्रशासकीय अधिकारी यांच्या कर्तव्यविषयी ओहापोह केलेला आहे तर इंडियन इन्स्टिटयूट अहमदाबाद या संस्थेने ‘‘वाल्मी’’ या संस्थेच्या मूल्यमापन अहवालातील पृष्ठ क्रमांक २० वर ‘‘वाल्मी’’ या संस्थेच्या प्रशासकीय संरचनेचा तक्ता (ट्री चार्ट) यामध्ये दिलेला दिसून येत आहे. या तक्त्यामध्ये देखील संस्थेचे मुख्य अधिकारी कोण, संस्थेचे मुख्य ते सर्वात कनिष्ठ अधिकारी यांचा त्यांच्या दर्जानुसार क्रमाक्रमाने उल्लेख केलेला आहे. यामध्ये प्रशासकीय अधिकारी या पदाचा उल्लेख आहे. प्रशासकीय अधिकारी यांच्या बरोबरच इतर प्राध्यापकाचे पदनाम देखील त्या तक्त्यामध्ये दर्शविले आहे. याचा अर्थ प्रत्येक प्राध्यापकाचे वेगळे कार्यालय आहे असे अपिलार्थीस वाटत असावे. अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना प्रश्नार्थक स्वरुपात व चुकीचे गृहीतक मनात धरुन माहिती मागविली असल्यामुळे व वर विवेचन केल्याप्रमाणे प्रशासकीय अधिका-यांचे स्वतंत्र कार्यालय अस्तित्वात नसल्याने व त्याव्दारे अपिलार्थीने चुकीची माहिती मागविल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मूळ अर्जास प्रतिसाद दिला आहे. सदर प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला सदर निर्णय हा चुकीचा गृहीतकावर आधारीत दिल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना, त्यांनी "वाल्मी" या संस्थेच्या तपासणी विषयक कागदपत्रांच्या नस्त्यांच्या पाहणीसाठी वेगळ्याने अर्ज केल्यास मिळू शकेल. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीसाठी अशा पध्दतीचा अवलंब त्यांनी केल्यास त्यांना माहिती मिळू शकेल असे अपिलार्थीस येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०९-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे, सहाय्यक प्राध्यापक (निवड श्रेणी), अभियांत्रिकी विद्या शाखा, वाल्मी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३२

निर्णय दिनांक ०९-०६-२००८

श्री. दीपक दिनकरराव पाठक, : अपिलार्थी
ई-४३, एम. आय. डी. सी.
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
कार्यालय अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय, लातूर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दीपक दिनकरराव पाठक (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय श्री. रमेश किशनराव कवठेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय यांचे प्रतिनिधी कायदेशीर सल्लागार श्री. काशीनाथ गुणवंत साखरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत पुरवठादार व लघुउद्योग यांना उशिरा बील प्रदान केल्याबद्दल व्याज देण्यासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराविषयी, ०१-०४-२००४ ते १५-०३-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“a. Copy of each letter written to HO for want of funds towards interest for delayed payments as referred to in letter No. SE/LTR/III No. 2274 dated 11/04/05 and copy of reply received of each letter by HO in this matter.

b. Copy of each letter written to HO demanding Rs. 14 lacs for payment of Delayed Payment interest.

c. Copy of letter showing you have followed for payment of Delayed payment interest to SSI Units.

d. Copy of letter showing you have followed the HO Legal Circular No. 2464 dated 91/07/04 for Delayed Payments Interest to SSI Units.

e. Copy of letter of CE. BZ. Latur sent to The SE Latur, alongwith direction & HO Legal Circular regarding Delayed Payment Interest to SSI Units.

f. The day to day progress of letter No. SE/2274 dated 11/04/05 addressed to Mrs. Punam Pathak, against Ist Appeal reply Under RTI.

g. Is the Accounts Officer & The SE, Circle Office, Latur guilty of violating The Act 93 (The Interest on Delayed Payments to SSI Units) ?

h. Does this mean that the Accounts Officer & The SE, Circle Office, Latur, has obeyed or disobeyed the HO Legal Circular No. 2464 dated 01/07/04 and the Instructions of The CE, BZ, Latur ?

i. Does The MSEDCL plan to take any action against The SE & The Accounts Officer, Circle Office, Latur ? If yes, in how much time ? "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना

चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले असून जन माहिती अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ प्रमाणे कारवाई करण्यासाठी ते पात्र झाले असल्याचे नमूद केले आहे व त्याच बरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १४-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १२-०७-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये पिकोमॅटिक इंडस्ट्रीज लातूर यांना माहिती दिली असून अर्जदाराचा व पिकोमॅटिक इंडस्ट्रीज यांचा काहीही संबंध नाही. त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक (ए) व्दारे जन माहिती अधिकारी यांना त्यांनी त्यांच्या मुख्य कार्यालयाकडे त्यांच्या मूळ अर्जात निर्देशित केलेल्या विषयाशी संबंधीत पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या होत्या तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुख्य कार्यालयाकडून कोणतेही उत्तर आले नाही त्यामुळे ही माहिती जोडली नाही असे

उत्तर दिले आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ‘‘बी’’ संदर्भात जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेले पत्र उपलब्ध नसले तरी त्यांनी ते त्यांच्या वरिष्ठ अधिका-याच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेवून त्यांना त्याची प्रत पुरविणे जरुरीचे आहे तथापि अशा प्रकारची कृती जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. मुद्दा क्रमांक ‘‘सी’’ संदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाली आहे. मुद्दा क्रमांक ‘‘डी’’ संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे कळविले आहे हे चूक आहे. मुद्दा क्रमांक ‘‘इ’’ संदर्भात अपिलार्थीने यांनी त्यांना विचारलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती देता येत नाही असे कळविले आहे ते चुकीचे आहे. त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ‘‘एफ’’ च्या संदर्भात मागितलेल्या माहितीप्रीत्यर्थ त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त एकाच पत्राची प्रत प्राप्त झाली असून प्रत्येक दिवशी त्यांच्या अपील अर्जावर काय घडामोडी झाल्या याची माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ‘‘जी’’, ‘‘एच’’, ‘‘आय’’ हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अखत्यारित येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांचे हे उत्तर त्यांना मान्य नाही. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील ‘‘जी’’, ‘‘एच’’, ‘‘आय’’ या क्रमांकाव्दारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकाराच्या कक्षेखाली येते. ही वस्तुस्थिती पाहता संबंधितांवर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ‘‘ए’’ संदर्भात त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये ज्या पिकोमॅटिक इंडस्ट्रीचा उल्लेख केला आहे त्या पिकोमॅटिक इंडस्ट्रीजची मालकी अपिलार्थी श्री. पाठक यांच्या पत्नीची असल्या

मुळे अपिलार्थीचा सदर युनिटशी काहीही संबंध नाही हे म्हणणे चुकीचे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "ए" संदर्भात त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीस त्यांनी लिहिलेले उत्तर योग्य आहे. अर्जातील मुद्दा क्रमांक "बी" संदर्भात अपिलार्थीने त्यांनी मुख्य कार्यालयाकडे मागणी केलेल्या १४ लाख रुपये इतक्या अनुदानाशी संबंधीत पत्राची प्रत मागितली होती. त्यांनी १४ लाख रुपये इतक्या अनुदानाची मागणी त्यांच्या मुख्य कार्यालयाकडे कोणत्याही पत्राव्दारे केली नव्हती. अपिलार्थीस कोणत्याही पत्राची प्रत उपलब्ध नसल्याची कळविलेली माहिती त्यांनी त्यांच्या दिनांक १०-०४-२००५ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली होती. मुद्दा क्रमांक "सी" संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०४-२००५ रोजी-च्या पत्राची प्रत देऊन, त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सदर पत्राची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलातील मुद्दा क्रमांक "एफ" मध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक "डी" संदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००५ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक तो खुलासा केला आहे व त्याचीही प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक "इ" संबंधी माहिती त्यांना मोघम स्वरुपाची वाटल्याने ते ती माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या "एफ" मुद्याशी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक "जी", "एच", "आय" व्दारे मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची व त्यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही व ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीस धरुन नसल्याने ही माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस देण्यात आलेल्या बिलास लागलेल्या विलंबाप्रीत्यर्थ त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे मागणी केलेले व्याज माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा उपयोग करुन ते मिळवू पाहत आहेत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगा-कडे केलेले अपील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ठेकेदारांसाठी केले असल्यामुळे आयोगाकडे त्यांनी केलेले व्दितीय अपील फेटाळून लावावे अशी त्यांनी शेवटी विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती त्यांच्या दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली असल्याचे म्हटले आहे. सदर पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, माहितीसाठीचा अर्ज श्री. दीपक दिनकरराव पाठक या नावाच्या अर्जदाराने केला असून जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती पिकोमॅटिक इंडस्ट्रीज यांना पाठविली. या युनिटची मालक जरी अपिलार्थी यांची पत्नी असली व हे जन माहिती अधिकारी यांना जरी माहित असले तरीही त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास अपिलार्थीसच उत्तर देणे अधिनियमातील तरतुदीन्वये भाग होते. अपिलार्थी व त्यांची पत्नी या दोन्ही व्यक्ती पूर्णतः निराळ्या असून ज्या अर्जदाराने माहितीसाठीच्या प्रथम अर्ज केला आहे त्याच अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती पुरविणे अपेक्षित आहे. त्यांच्या या कृतीबाबत त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत असून येथून पुढे अशा प्रकारच्या चुका जन माहिती अधिकारी यांनी टाळाव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा “ए” लक्षात घेतला असता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मुख्य कार्यालयाकडे केलेल्या व त्यांच्या

कडील दिनांक ११-०४-२००५ पर्यतच्या पत्रामध्ये संदर्भित केलेल्या पत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मुख्य कार्यालयास पाठविलेल्या पत्रामध्ये संदर्भित केलेल्या प्रती दोन आहेत. याबाबत एक संदर्भ म्हणजे दिनांक ०९-०३-२००४ चे पत्र असून ते पत्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाचे पत्र असल्याचे दिसून येते. दुसरा संदर्भ म्हणजें दिनांक ०२-०४-२००५ चे पत्र. सदर पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथीस त्यांनी मागणी केल्याप्रमाणे देणे आवश्यक होते. तथापि दिनांक ०२-०४-२००५ च्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ''ए'' च्या संदर्भात पुरविलेली माहिती अपूर्ण ठरते. मुद्दा क्रमांक ''बी'' च्या संदर्भात अपिलार्थीने रुपये १४ लाख इतक्या व्याजाच्या रक्कमेचा संदर्भ दिला आहे व अशा अर्थाचे जन माहिती अधिकारी यांनी पत्र त्यांच्या कार्यालयाकडे पाठविले नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर योग्य ठरते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी रुपये २१.२५ लक्ष च्या जन माहिती अधिकारी व इतर यांना प्रस्तावित भरपाई संदर्भात त्यांच्या कार्यालयाने दिनांक १६-०४-२००५ रोजी वरीष्ठ कार्यालयाकडे केलेल्या संदर्भाची प्रत अपिलार्थीस दिल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलात कबूल केले आहे. म्हणजेच अपिलार्थीस त्यांच्या ''बी'' मुद्दयाशी संबंधीत माहिती मिळाली आहे. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ''सी'' शी संबंधीत माहिती मिळाली असल्यामुळे त्यावर आयोगाचे काहीही अभिप्राय नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ''ई'' संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रस्तावासंदर्भात विधी विहित पध्दतीचे पालन केले असल्याच्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मागितली आहे. अपिलार्थीची या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या मुद्दा क्रमांक ''एफ'' व्दारे त्यांच्या जन माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या दिनांक ११-०४-२००५ रोजीच्या पत्रावर झालेली दैनंदिन प्रगती अशा स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहितीच्या संदर्भात फक्त एकाच पत्राचा पत्रव्यवहार झाला असून या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०-०४-२००५ रोजीच्या पत्राव्दारे दिली होती. अपिलार्थीस त्यांच्या पत्रावर प्रत्येक दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून केलेल्या कार्यवाहीचा तपशील हवा आहे. सदर पत्रावर प्रत्येक दिवशी जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही अथवा यासंदर्भात संबंधीतांशी पाठपुरावा केला नाही व एकदाच पत्र पाठविले यावरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती अर्धवट आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडूनही अशा प्रकारे प्रत्येक पत्रावर प्रत्येक दिवशी काही तरी कारवाई होतेच असे कधीही संभवत नाही. कारण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये ब-याच विषयावरील पत्रव्यवहार अविरत चालू असतो यातील प्रत्येक पत्रावर प्रत्येक दिवशी काय कारवाई केली याची दैनंदिन नोंद ठेवण्याची पध्दत सार्वजनिक प्राधिकरणामध्ये रुढ नाही. या अर्जावर एकदाच पत्रव्यवहार झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती बरोबर दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दा क्रमांक ''जी'' ''एच'' ''आय'' व्दारे संबंधीत लेखाधिकारी हे दोषी आहेत काय, त्यांनी मुख्यालयाच्या परिपत्रक क्रमांक २४६४, दिनांक ०१-०७-२००४ च्या सुचनांचे पालन केले आहे काय अथवा उल्लंघन केले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

संबंधीत लेखा अधिकारी यांच्यावर कारवाई करणार आहे काय अशा प्रकारची जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये दिलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमा-तील तरतुदी नुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारची उत्तरे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे अभिप्रेत नाही त्यामुळे अपिलार्थीचे म्हणणे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ‘‘जी’’ ‘‘एच’’ ‘‘आय’’ हा माहिती अधिकार खाली येतो हे आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील ‘‘बी’’ या मुद्याशी संबंधीत माहिती व्यतिरिक्त उर्वरीत माहिती साधारणपणे दिली आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.  उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे व जी माहिती त्यांच्याकडून द्यावयाची राहिली आहे ती माहिती त्यांनी हेतूपुरःस्सर दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई बाबत कोणतेही आदेश नाहीत.  मात्र येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या पध्दतीनुसार वेळीच कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०९-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दीपक दिनकरराव पाठक, ई-४३, एम. आय. डी. सी. लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३६

निर्णय दिनांक : १०.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुरेश गंगाराम साळवे,<br>रा. प्रगती कॉलनी,औरंगाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक,<br>सहकारी संस्था, क्रांतीचौक, औरंगाबाद | | |
| १ श्री. आर.व्ही.परदेशी | : | त्रयस्थ पक्ष |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुरेश गंगाराम साळवे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्री. अनिलकुमार पुंजाजी दाबशेडे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) , श्री. सुभाष धोंडीराम माने जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. आर.व्ही. परदेशी (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २१.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. आर.व्ही.परदेशी, सहायक निरीक्षक यांच्याविषयी ते नोकरीस लागल्यापासून दि. २१.४.२००७ पर्यंतची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " श्री. आर.व्ही.परदेशी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था खुलताबाद, जि.औरंगाबाद हे राहणारे नाशिक जिल्हयाचे मात्र जातीचे प्रमाणपत्र राजपूत भामटा, औरंगाबाद तहसील कार्यालयाचे घेतले. त्यांचे जातीचे प्रमाणपत्र, शाळेचा टि.सी.,विभागीय जात पडताळणी समिती यांचा वैध्यते बाबतचा अहवाल, शाळा निर्गम उतारा व सर्व्हीस बुकाच्या पहिल्या पानाच्या झेरॉक्सच्या प्रमाणीत प्रती. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दि. १५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे कार्यालयाचे शिपायामार्फत अपिलार्थी यांचे घरी पाठविली. तथापि अपिलार्थीने मूळ अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर अपिलार्थी घरी भेटले नसल्यामुळे त्यांनी ती माहिती दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पोस्टाने पाठविली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३१.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ११.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी आपले या संदर्भातील आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसात माहिती देण्याचे सूचित केले.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्रयस्थ पक्षाला त्यांच्याकडील जातीचे प्रमाणपत्र, शाळेचा टि.सी, विभागीय जात पडताळणी समिती यांचा जात प्रमाणपत्र वैधतेबाबतचा अहवाल, शाळा निर्गम उतारा व सर्व्हीस बुकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत इत्यादीच्या प्रमाणित प्रती अपिलार्थीस पाठविण्याचे सूचित केले व त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस दिली. त्यानंतर त्रयस्थपक्षाने जन माहिती अधिकारी यांना त्याचदिवशी म्हणजे दि. १५.०६.२००७ रोजी त्यांच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना असे कळविले की, अपिलार्थीने मागितलेली माहितीमधील त्यांचे शैक्षणिक व जात प्रमाणपत्र हे गहाळ झाले असल्याचे व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्यासंबंधी मागितलेली माहिती ही काही बऱ्याच वर्षापूर्वीची असल्याने ती उपलब्ध करण्यासाठी वेळ लागत असल्याचे जन माहिती अधिकारी यांना अवगत केले व निदान सध्या तरी ही माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही, असे कळविले. त्रयस्थपक्षाचे हे पत्र प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी परत त्यांच्याकडील दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद, जे या प्रकरणातील त्रयस्थपक्षाचे नेमणूक प्राधिकारी आहेत, त्यांच्याकडून अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात पत्र दिलेले आहे. तथापि त्रयस्थ पक्षाचे नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडेही अपिलार्थी यांनी मागितलेली त्रयस्थ पक्षाबाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांना आढळून आले. सदर माहिती विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २४.७.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रावरुन दिसून येते. त्यानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती उपलब्ध झाली नसल्याचे नमुद केले आहे. त्याचबरोबर या अपील अर्जामध्ये

संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे त्रयस्थ पक्षास, ज्यांनी बनावट जातीचे प्रमाणपत्र शासनास सादर केले, त्यांना सहकार्य करीत असल्याचे नमुद करुन त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने त्यांना अपेक्षित असलेली माहिती व कागदपत्रे गहाळ केल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीमुळे त्यांना दि. २०.४.२००७ पासून शास्ती लावावी व संगनमताने रेकॉर्ड गहाळ केल्याबद्दल त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची अपिलार्थीने शेवटी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १५.५.२००७ रोजी कोणतीही माहिती पाठविली नाही. त्यांनी अपिलार्थीस दि. १५.६.२००७ रोजी टपालाने पाठविलेली सदर माहिती त्यांना दिनांक १६.६.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांनी मागणी केलेल्या संपूर्ण माहितीचा समावेश दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रामध्ये नसून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती दिली आहे. त्यांनी व्यक्तीशः माहितीची मागणी केल्याने, स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दि. २१.४.२००७ नंतर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेला होतात व या संदर्भात त्यांच्याकडे काही लेखी पुरावा उपलब्ध आहे काय, याची विचारणा केली असता, या प्रश्नाचे अपिलार्थी यांनी नकारार्थी उत्तर दिले. आजही त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आवश्यक आहे. असे आपल्या युक्तीवादाच्या शेवटी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. ५.६.२००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील शिपायामार्फत स्थानिक टपाल बटवडा पध्दतीने पाठविला होता. तथापि संबंधित शिपायाने या टपालवहीमध्ये 'घर सापडले नाही.पोस्टाने पाठविण्यात यावे.' असा शेरा दिला आहे. अपिलार्थीस स्थानिक टपाल पाठविल्याची सत्यप्रत अथवा नोंदवही जन माहिती अधिकारी हे आयोगास सादर करु शकले नाहीत. अपिलार्थी घरी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे, त्यांना तीच

माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. सदर पत्र अपिलार्थीस दि. १६.६.२००७ रोजी प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थी यांच्या घरातील व्यक्तीची पोचसही असलेले पोष्टाचे कार्ड त्यांनी आयोगास दाखविले. त्यांच्या पूर्वीच्या अधिकाऱ्याने या प्रकरणात अपिलार्थी हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर उपलब्ध होऊ न शकल्यामुळे सदर प्रकरण बंद केले होते व जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.६.२००७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार, त्यांनी अपिलार्थीस दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली होती. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जेवढी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे तेवढी माहिती (सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची छायाप्रत व त्रयस्थ पक्षाच्या जातीची नोंद घेतल्याबद्दल त्रयस्थपक्षाच्या सेवापुस्तिकेत केलेल्या नोंदीची छायाप्रत ) त्यांनी अपिलार्थीस दिली. त्यानंतर दि. १९.५.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाने त्यांना त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे कळविले व तदनंतर सदर जात व वैधता प्रमाणपत्राची सत्य झेरॉक्सप्रत अपिलार्थीस आज दि. १०.६.२००८ रोजी सुनावणीच्या दिवशी पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,अपिलार्थीस अपेक्षित असलेली जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध माहितीवरुन व त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त करुन घेऊन दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.५.२००७ रोजीच्या अपिलावर दि. ११.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले आहेत.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती, त्यामुळे संबंधित प्राधिकरणाकडे वैयक्तीकरित्या संपर्क साधून त्यांना ही माहिती विशेष मेहनत करुन प्राप्त करुन घ्यावी लागली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची काहीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, त्रयस्थपक्षासह दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्षाच्या जातीचे प्रमाणपत्र, शाळेचा टी.सी., शाळा निर्गम उतारा, विभागीय जात पडताळणी पथकाचा त्यांच्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा अहवाल व सेवापुस्तिकेतील पहिल्या पानाच्या झेरॉक्सप्रतीच्या प्रमाणित प्रती इत्यादी माहितीची मागणी केली होती. या पैकी अपिलार्थीस सेवापुस्तिकेतील पहिल्या पृष्ठाची छायाप्रत व अपिलार्थीच्या जातीची नोंद घेतलेल्या पृष्ठाची छायाप्रत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. तर दि. १०.६.२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील त्रयस्थपक्षाच्या जातीचे प्रमाणपत्राची व विभागीय जात पडताळणी विभागाचे वैधता अहवालाची सत्य झेरॉक्स प्रत दिली आहे. या ठिकाणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्षाची शाळेच्या टी.सी. व शाळा निर्गम उताऱ्याच्या प्रतीची मागणी केली आहे. या प्रती शासकीय प्राधिकरणामध्ये उपलब्ध नसतात, हे सर्वश्रुत आहे. शालेय शिक्षण संपल्यानंतर महाविद्यालयात प्रवेश घेतांना शाळेच्या टी.सी.ची मूळ प्रत महाविद्यालयामध्ये दाखल करावी लागते, त्यामुळे ही माहिती त्रयस्थपक्षाकडे कोणत्याही परिस्थितीत असणे संभवत नाही. त्याचबरोबर शाळा निर्गम उतारा (School leaving Certificate) याची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे उपलब्ध असू शकणार नाही. त्रयस्थ पक्षाचा वैयक्तिक तपशील त्यांच्या सेवापटलामध्ये नोंदविला जातो, त्यांचे नोकरीच्या कार्यकाळातील घडणाऱ्या प्रत्येक आस्थापनाविषयक तपशील उदा. त्यांची प्रथम नेमणूक, त्यांची जन्मदिनांक, त्यांनी घेतलेल्या रजा व त्यांच्या वेळोवेळी झालेल्या बदल्या व इतर तदनुषंगीक तपशील नोंदले जातात. त्रयस्थपक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एवढीच माहिती असणे अपेक्षित आहे. हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून शाळेचा टी.सी. व शाळा निर्गम उतारा प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे. अपिलार्थीस जर त्रयस्थ पक्षाच्या शाळा

निर्गम उतारा व टी.सी. ची प्रत मिळविण्यामध्ये अद्यापही स्वारस्य असेल तर त्यांनी यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे वेगळया अर्जाद्वारे मागणी करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी विशेष मेहनत घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला व या कामी त्यांना त्रयस्थपक्षाचे देखील सकारात्मक सहकार्य प्राप्त झाले आहे, हे पाहता अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तनाबाबत घेतलेला आक्षेप पुराव्याअभावी आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यास अपिलार्थीने स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे जाऊन, त्यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून माहिती मिळविणे अपेक्षित आहे. जर अपिलार्थी अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांचेकडे स्वतः उपस्थित राहिलेल्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसेल तर, त्यांनी आपली उपस्थिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी नोंदवून ठेवणे अपेक्षित आहे, असे आयोग मानते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती मिळाली नाही, हे त्यांचे म्हणणे येथे गौण ठरते. तसेच या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उशिरा माहिती दिली आहे, या अपिलार्थीच्या मुद्यावर असे भाष्य करण्यात येते की, मूळात अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित मागितलेली माहिती देखील ३४ वर्ष इतकी जुनी असल्याने ती त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना वेळ लागू शकतो. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर हेतुपुरस्सर अथवा कोणत्याही असद्‌हेतूने टाळाटाळ केल्याचे निष्पन्न होत नसल्याने, त्यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती मिळाल्याने माहिती पुरविणेबद्दल कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश साळवे,रा. प्रगती कॉलनी,मनपा शाळेजवळ, मकई गेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, क्रांतीचौक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३७

निर्णय दिनांक : १०.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विठ्ठल पांडुरंग काळम<br>रा. उस्माननगर, ता.कंधार,<br>जि.नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी सजा आडगाव,<br>ता.लोहा, जि.नांदेड<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>लोहा, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| १ श्री. रंगनाथ तुळशीराम क्षीरसागर<br>२ श्रीमती शकुंतलाबाई पांडुरंग काळम | : | त्रयथपक्ष |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नारायण पुंडलिक नांदेडे, जन माहिती अधिकारी तथा सध्याचे तलाठी सजा आडगाव ता.लोहा, जि.नांदेड , श्री. वैजिनाथ दिगांबर आप्पा तत्कालीन तलाठी सजा आडगाव ता.लोहा जि. नांदेड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. नरसिंग गंगाराम झंपलवाड, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील

कार्यालय, लोहा जि.नांदेड ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. विठ्ठल पांडुरंग काळम (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्रीमती शकुंतलाबाई पांडुरंग काळम (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ११.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून शेतजमिन सर्व्हे नं.११९(क) संबंधी सन १९७२ ते १९८५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) शेत सर्वे नं ११९ (क) मौजे आडगाव, ता.लोहा सदरील शेत सर्वे नं ११९ चे किती पोट हिस्से करण्यात आले कोणकोणत्या आदेशाने तारखेसह माहिती.

२) शेत सर्वे नं ११९ (क) मौजे आडगाव, ता.लोहा चा कोणता गट नंबर करण्यात आला व किती शेत सर्वे नंबरचा एक शेतगट करण्यात आला त्या सर्व शेतसर्वेनंबरची माहिती व एकत्रिकरणात झालेल्या शेतगट च्या नंबरची माहिती.

३) शेत सर्वे नं ११९ (क) मौजे आडगाव, ता.लोहा चे वर्ष १९७२ ते १९८५ पर्यंत किती शेत मालक होते त्यांच्या नांव व क्षेत्रफळासहची माहिती.

४) शेत सर्वे नं ११९ (क) मौजे आडगाव, ता.लोहा संबंधी घेण्यात आलेला फेरफार क्र. ८५० दि. २२.०२.१९९३ चा कोणत्या कायद्याने व नियमाने घेण्यात आला व शकुंतलाबाई पांडुरंग काळम हिचे नांव कमी करण्यात आले ची सविस्तर कायद्या व नियमानूसारची माहिती व सदरील फेर हा कोणी मंजूर केला व तारखेसह माहिती.

५) शेत सर्वे नं ११९ (क) (गट क्र.६४२ संबंधी) मौजे आडगाव, ता.लोहा फेरफार क्र. ८७१ दि. १७.०५.१९९३ हा वाटणी आधारे घेण्यात आलेला फेर हा कोणत्या कायद्याने व नियमाने घेण्यात आला व वाटणी झालेला कागद योग्य मुद्रांक शुल्कातील होता का? व सदरील फेर कोणी मंजूर केला ची तारखेसह माहिती.

६) शेत सर्वे नं ११९ (क) मौजे आडगाव, ता.लोहा चे मालक रंगनाथ पि.तुळशीराम यांचे नाव सदरील शेतास मालक म्हणून कोणत्या फेरफार आधारे व कोणत्या दस्ताऐवजा आधारे त्यांचे नांव मालक व कब्जेदार म्हणून लावण्यात आले व किती क्षेत्रफळापुरते लावण्यात आले ची लेखी माहिती."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १२.०६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपीलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज करुन व अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील अर्ज करुनही कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

अपिलार्थीने अर्ज करतेवेळी कार्यरत असलेले संबंधित तलाठी तथा जन माहिती अधिकारी श्री. वैजनाथ दिगांबर अप्पा यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीचा अर्ज केल्यानंतर त्यांची दि. २८.५.२००७ रोजी लागलीच तलाठी आडगाव ता. लोहा या पदावर बदली झाली. सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी तथा तलाठी (ज्यांचा अपील निर्णयामध्ये पहिल्या परिच्छेदामध्ये उल्लेख केलेला आहे) यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी माहितीसाठी केलेला प्रश्नाधीन दि.११.५.२००७ रोजीचा प्रथम अर्ज त्यांना तत्कालीन तलाठी यांनी हस्तांतरित न केल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि तहसीलदार, लोहा यांनी माहिती अधिकार विषयावर घेतलेल्या बैठकीनंतर व त्यांनी या विषयाशी संबंधित कागदपत्रांचा आपल्या दप्तरामध्ये कसून शोध घेतला व त्यानंतर, त्यांना अपिलार्थीच्या अर्जाची झेरॉक्स प्रत मिळाली व या पत्राच्या संदर्भाने त्यांनी त्यांच्याकडील दि. ९.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. १.३.२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने अर्ज करते वेळी या पदावर दि. ३०.६.२००७ पर्यंत श्री. एस.एस.कांबळे (सध्या सेवानिवृत्त) व दि. २९.२.२००८ पर्यंत श्री. टी.आर.फुलपगार (सध्या सेवानिवृत्त) हे अधिकारी कार्यरत होते. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी का घेतली नाही, याची कारणमिमांसा ते आज आयोगासमोर देऊ शकत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे अपील अर्ज करुनही या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या पूर्ण नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दि. ९.८.२००७ दाखल केले आहे. अपिलार्थीच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये एकूण सहा मुद्यांचा समावेश असून मुद्दा क्र.१ व २ ही भूमी अभिलेख खात्याशी संबंधित आहे, तर उर्वरित ४ ही मुद्दे महसूल खात्याशी संबंधित आहे. या प्रकरणी मुद्दा क्र. १ व २ हे दोन्ही मुद्दे आपल्या विभागाशी संबंधित नाहीत, हे जन माहिती अधिकारी यांना ज्ञात असूनही त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत संबंधित प्राधिकरणाकडे पाच दिवसांच्या आत न पाठवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) चा येथे भंग केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ९.५.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीवरुन कोणताही बोध होत नसल्याचे दिसून येत आहे. किंबहुना, अपिलार्थीने मागितलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडून कशी टाळली जाते, याचे हे पत्र म्हणजे उत्तम नमुना आहे. सदर पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केवळ अर्धवटच माहिती दिली असे नव्हे तर त्यांनी अपिलार्थीची दिशाभूल करणारी माहिती देखिल दिल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, आयोगास असे सांगण्यात आले की, या प्रकरणातील अर्जामधील उल्लेखिलेल्या मूळ जमिनीची मालकी श्री. रंगनाथ तुळशीराम क्षीरसागर यांची

होती व ती जमीन त्यांनी दि. ३०.५.१९८४ रोजी श्रीमती शकुंतलाबाई पांडुरंग काळम यांना विकली, तथापि या जमिनीच्या मालकी हक्काची नोंद श्रीमती शकुंतला पांडुरंग काळम यांच्या नावाने होवू शकली नाही, तदनंतर जमीनीच्या एकत्रीकरण कार्यक्रमामध्ये श्रीमती शकुंतलाबाई काळम व श्री. एकनाथ आबाराव यांच्या शेतीचा गट क्रमांक एकच असल्याने, या एकत्रिकरणात श्रीमती शकुंतलाबाईच्या मालकीची जमिन आबाराव यांच्या जमिनीमध्ये संलग्न करण्यात आली. श्री. आबाराव यांनी त्यानंतर त्या जमिनीची त्यांची पत्नी व मुले यांचे नावाने वाटणी करुन दिली. त्यानंतर सदर झालेली चुक लक्षात आल्यानंतर तत्कालीन तलाठी यांनी सदर जमीन श्रीमती शकुंतलाबाई यांच्या नावाने करुन आपली मूळ चुक दुरुस्त केली.श्रीमती शकुंतलाबाई यांनी तदनंतर दि. ४.६.२००७ रोजी श्री. दत्ता पूरबाजी क्षीरसागर यांना विकली आहे. सदर जमिन सध्या श्री. दत्ता पूरबाजी क्षीरसागर यांच्या मालकीची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे या संपूर्ण घडामोडीतील विविध टप्प्यावर झालेल्या घडामोडींची माहिती त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तरावरुन कोणताही बोध होत नसल्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस संपूर्ण माहिती तहसीलदार लोहा यांनी तयार करुन ती तपासून घेऊन त्यानंतर जन माहिती अधिकारी यांचेमार्फत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध देणे आवश्यक झालेले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी परत अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस समजेल अशा भाषेमध्ये द्यावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यापूर्वी संबंधित तहसीलदार यांनी ती तपासावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ ही महसूल खात्याशी संबंधित नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे, तथापि या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज भूमी अभिलेख खात्याकडे वर्ग न केल्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती देण्याचे अंतीम उत्तरदायित्त्व आता जन माहिती अधिकारी यांच्यावर येते, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील

मुद्दा क्र.१ व २ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी भूमी अभिलेख विभागाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस आयोगाने वर आदेशित केलेल्या मुदतीत पुरवावी. असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व त्याद्वारे स्वतःस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन त्यानंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती , तहसीलदार, लोहा यांच्याकडून तपासून घेऊन ती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत

करुन त्यानंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १०.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. . विठ्ठल पांडुरंग काळम,रा. उस्माननगर, ता.कंधार,जि.नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा आडगाव,ता.लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३८

निर्णय दिनांक : १०.०६.२००८

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, : अपीलार्थी
रा. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
दुय्यम निबंधक,
तालुका दुय्यम निबंधक कार्यालय,गंगापूर,
जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अरुण रंगनाथराव धोकटे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्री.अशोक नानाजी साळवे, जन माहिती अधिकारी तथा तालुका दुय्यम निबंधक, गंगापूर जि. औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. लिंबाजी कोंडीबा मुंढे,जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०८.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या खरेदीखतासंबंधी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) सहान जागा "खरेदी खत" दस्ताऐवज क्र. ६०४/दि.२२.२.१९९५ खरेदी खताची मुळ प्रत (मुळ प्रत.)
>
> २) दस्तऐवज क्र.७३७/८३, दि. २० एप्रिल १९८३ अन्वये झालेल्या खरेदी खताची मुळ प्रत."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दि. १३.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेला मुळ दस्त क्र. ६०४/९५ हा स्कॅनिंगसाठी पुणे येथील शासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालयास पाठविल्याचे व तो त्या कार्यालयाकडून परत प्राप्त होताच अपिलार्थीस देण्यात येईल, असे आश्वासित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.०६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे फलक लावले नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी खरेदीखत दस्तऐवज क्र. ६०४/दि.२२.२.१९९५ या खरेदीखताची मूळ प्रत त्यांना मिळाली नसून, ती, त्यांना हवी असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अपील

अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती व या सुनावणी संबंधी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविलेल्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी म्हणजे दि. १२.७.२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढून अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेले दस्त क्र. ६०४/९५ ची मूळ प्रत स्कॅनींग होऊन संबंधित कार्यालयाकडून प्राप्त होताच अपिलार्थीस घरपोच व विनामूल्य परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. या आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने दि. १२.७.२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करुनही विहित मुदतीत संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) नुसार कार्यवाही करुन अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची विनंती केली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे सौजन्य न दाखवून जन माहिती अधिकारी यांच्या बेकायदेशीर कृतीस प्रोत्साहन दिल्याचे नमुद केले म्हणून त्यांचेवरही कारवाई करण्याची विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या माहितीची मागणी/खरेदीखत दस्त क्र.६०४/दि.२२.२.९५ या खरेदीखताची मूळ प्रत, एवढयापुरतीच सिमीत ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या दोन बाबींपैकी दस्त क्र.७३७/८३, दि. २०.९.१९८३ ची मूळ प्रत त्यांना व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून त्यांची मागणी आता खरेदीखत दस्त क्र. ६०४/२०.२.१९९५ इतकीच मर्यादित आहे. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेतल्याने या दोन्ही अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर १५ दिवसांपूर्वी रुजू झाले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंबंधी त्यांच्याकडील दि. १३.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये सद्यस्थिती अवगत केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे संबंधित दुय्यम निबंधक हे विश्वस्त आहेत.नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशान्वये १९६४ ते ३१.१.२००२ या कालावधीशी संबंधित असलेल्या सर्व खरेदीखताच्या प्रतीचे स्कॅनिंग करण्याचा निर्णय झाल्यामुळे अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या दिवशी माहिती मागितली त्यापूर्वीच अपिलार्थीच्या दस्त क्र. ६०४/२२.२.१९९५ हा शासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय पुणे यांच्याकडे स्कॅनिंगसाठी पाठविण्यात आला होता. सदर दस्ताचे अद्यापपावेतो स्कॅनिंग पूर्ण न झाल्याने अपिलार्थीस ते अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी पुरवू शकत नाहीत, असे त्यांच्या या दि. १३.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस त्याच दिवशी प्राप्त झाले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही असलेल्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राची मूळ प्रत त्यांनी आज आयोगास

दाखविली. यावरुन सदर पत्र अपिलार्थीस मिळाल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. १२.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीस हजर राहण्यासाठी त्यांनी त्यांच्या दि.५.७.२००७ रोजीच्या अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविलेल्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले होते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी त्यांनी ठरलेल्या दिवशी घेऊन आपले आदेश त्याचदिवशी दि. १२.७.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढून अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेले दस्त क्र. ६०४/९५ ची मूळ प्रत स्कॅनींग होऊन संबंधित कार्यालयाकडून प्राप्त होताच अपिलार्थीस घरपोच व विनामूल्य परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या दोन दस्त क्रमांकापैकी एक दस्तक्रमांकामधील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून दस्त क्र.६०४/दि.२२.२.९५ ची मूळ प्रत त्यांना अद्याप जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने १९६४ ते दि. ३१.१.२००२ पर्यंतच्या सर्व दस्ताच्या प्रतींचे स्कॅनिंग करण्याचे धोरण ठरविले आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील त्यांच्या वेगवेगळया कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या खरेदीखताच्या प्रतींचे स्कॅनिंग करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक यांनी एक कार्यालय पुणे येथे निश्चित केले असून, या कार्यालयामध्ये अशाप्रकारच्या राज्यातील सर्व जमीन व्यवहाराच्या खरेदीखताच्या मूळ प्रतींचे स्कॅनिंग करण्याचे काम क्रमशः चालू असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. या प्रकरणी जर अपिलार्थीचे म्हणणे मान्य करुन अपिलार्थीचे दस्त क्र.

६०४/२२.२.९५ ची मूळ प्रत प्राधान्याने देण्याचे आदेशित केले तर अपिलार्थीच्या मूळ अर्जासारखेच इतर अनेक अर्ज प्राप्त होऊन दस्त प्रतीच्या स्कॅनिंगच्या नियमित कामकाजात अडचण निर्माण होऊन त्यांचे कार्यालयीन विहित पध्दतीत आयोगाने विनाकारण हस्तक्षेप केल्यासारखे होईल व परिणामी त्यांचे नियमित वितरण कार्यपध्दतीमध्ये विनाकारण अडथळे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दस्त क्र. ६०४/२२.२.९५ च्या मूळ प्रतीची मागणी केली आहे, याचा अर्थ त्यांना दस्ताच्या झेरॉक्स प्रतीची आवश्यकता नाही. जर त्यांना या दस्ताच्या मूळ प्रतीची आवश्यकता असेल तर नोंदणी महानिरीक्षक यांचे कार्यालयाने विहित करुन दिलेल्या तरतुदीचे व वितरण पध्दतीमधील विहित अटीचे पालन करणे भाग आहे. कोणत्याही शासकीय कार्यालयाने विहित करुन दिलेल्या पध्दतीमध्ये विनाकारण हस्तक्षेप करण्याचे अथवा अपिलार्थी यांनी विनंती केल्याप्रमाणे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या विचाराधीन दस्ताच्या सद्यस्थितीची आवश्यक ती कल्पना दिली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती दिली आहे.अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीपेक्षा ६ दिवस विलंबाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या दि. १८.६.२००७ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अपील सुनावणीची नोटीस व निर्णयाची प्रत अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचा पुरावा सादर केला आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही, या अपिलार्थीच्या म्हणण्यामध्ये तथ्यांश आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय

अधिकारी यांनी त्यांच्याकडून अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचेवर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित कार्यालयाची प्रचलित वितरण पध्दत मोडून हवी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीची विनंती मान्य झाल्यास वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे, निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे संबंधित दस्ताचे स्कॅनिंग पूर्ण होऊन ते संबंधित कार्यालयाकडून प्राप्त होईपर्यत वाट पहाणे योग्य राहील, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे स्कॅनिंगसाठी प्राप्त झालेल्या जमीन/भूखंड/सदनिका व तत्सम खरेदीखतांच्या मूळ प्रती मोठया प्रमाणात सादर केल्या गेल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः १९६४ ते दि.३१.१.२००२ हा मोठा कालावधी लक्षात घेतल्यास, या कामाच्या व्याप्तीचे प्रचंड आकारमान लक्षात येते. एवढे जरी असले तरी या कामाचा संपूर्ण निपटारा एका विशिष्ट कालावधीत करण्याच्या दृष्टीने त्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सर्व खरेदीखताच्या प्रतीचे स्कॅनिंग करुन त्या संबंधित सहायक निबंधकांकडे या कालावधीत परत पाठविण्याच्या दृष्टीने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची कसोशीने अंमलबजावणी करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १०.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, तालुका दुय्यम निबंधक कार्यालय, गंगापूर जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,कौन्सिल हॉलसमोर,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३९

निर्णय दिनांक : १०.०६.२००८

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपीलार्थी

राजे संभाजीनगर (प) तुळजापूर

जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,
उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
उस्मानाबाद जि. उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. संजय महादेवराव सोनवणे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्री. दिनकर जायभाये,जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संभाजी मुंढे, जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १४.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून घरगुती गॅसच्या गैरवापराबाबत दि.०१.०८.२००६ ते १४.०२.२००७ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) दि. २८ सप्टेंबर २००६ चे पत्र (२) आर.टी.ओ. कार्यालयाचे दि. ४.८.२००६ चे पत्रातील मुद्दा क्र. २ च्या नेमणुक केलेल्या अधिकाऱ्यांची नावे व केलेली कारवाई त्याचा लेखी खुलासा व त्याच्या छायांकित सत्यप्रती (३) तुळजापूर व उस्मानाबाद शहरात व ग्रामीण भागात गॅसचे घरपोच दर किती व विक्री ठिकाणी किती (४) तुळजापूर शहरातील व ग्रामीण भागातील गॅसधारक संख्या किती (५) गॅस वितरण एजेन्सी साठी ग्राहक संख्येची बंधन आहे का? असेल तर किती ग्राहकासाठी १ एजेन्सी नेमता. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या या अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापि अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खालीलप्रमाणे कळविले.

‘संदर्भिय पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार मागितलेली माहिती (घरपोच गॅस दराबाबत) ही आपण संबंधित गॅस एजन्सीकडून प्राप्त करुन घ्यावी.’

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०५.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या

अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांवर कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची मागणी केल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर दि. १८.०५.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.०५.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना दहा दिवसांच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले आहे.जन माहिती अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० नुसार शास्ती लावली नाही किंवा मा. आयुक्त यांचेकडे देखिल प्रकरण दाखल केले नाही, असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात आयोगास सादर करीत आहे, त्यांनी आज रोजी सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तीवादामध्ये असे म्हटले आहे की,त्यांचे दि. १४.२.२००७ रोजीचा अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. ६.६.२००७ रोजी प्रतिसाद दिला व या पत्रामध्ये त्यांनी दिलेली माहिती अर्धवट असल्यामुळे त्यांचेविरुध्द कलम २० (१) व (२) अन्वये कार्यवाही करावी. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यांच्या कार्यालयातील त्यांचे प्रतिनिधी श्री. वाघमारे हे अव्वल कारकुन उपस्थित राहिले. श्री. वाघमारे यांचे अधिकारपत्र जन माहिती अधिकारी यांनी सादर करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी आज रोजीपर्यंत जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे पालन केले नाही. त्यांना दि.

१४.२.२००७ रोजी माहिती मागितली होती, सदर माहिती पुरविण्यासाठी शेवटची मुदत दि. १६.३.२००७ रोजी पर्यंत होती. आज दि. १०.६.२००८ रोजी माहिती प्राप्त होण्यासाठी ४५० दिवस इतका विलंब झाल्याने जन माहिती अधिकारी यांचयवर प्रतिदिनी २५०/- प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर रु.१,१२,५००/- इतका दंड लावण्यात यावा. केवळ जन माहिती अधिकारी यांनी वेळीच व योग्य माहिती दिली नाही म्हणून त्यांना अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोग यांचे कार्यालयात येण्यासाठी त्यांनी केलेल्या कागदपत्रांचा व प्रवास खर्च म्हणून रु.१०००/- नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर डिसेंबर २००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्या वेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीने मागितलेल्या ५ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. १ मध्ये अपिलार्थीने निश्‍चित कोणती माहिती मागितली याचा अर्थबोध होत नाही. मुद्दा क्र. २ मधील अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात या निर्णयामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये उहापोह केला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित तीनही मुद्दे गॅस एजन्सी व गॅस वितरणासंदर्भात असून अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात कधीही उपलब्ध असत नाही. तथापि एवढे असूनही त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर संबंधित गॅस एजन्सीजकडे करुन दि. ६.६.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक माहिती संबंधिताकडून प्राप्त करुन घेऊन विनामूल्य पुरविली आहे.अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मागितलेल्या मुद्दा क्र. ३,४ व ५ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात व कधीही असू शकत नाही, कारण गॅस एजन्सीवर त्यांचे सरळ नियंत्रण नसते. सदर एजन्सीजवर संबंधित गॅस कंपनीचे थेट नियंत्रण असते. अपिलार्थी यांच्या अर्जातील गॅस संबंधी माहिती त्यांनी संबंधित गॅस एजन्सीज कडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेतली व ती त्यांनी अपिलार्थीस दि. ६.६.२००८ रोजी विनामूल्य दिली आहे. संबंधितांस सदर माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीने दि. ६.६.२००८ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर त्यांची पोचसही दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे झालेल्या प्रथम सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे निश्चितपणे कोणती माहिती उपलब्ध आहे, याचा त्यांना अंदाज न आल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. त्यांच्या या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती देणे आवश्यक होते व तसे कळविणे आवश्यक होते, अशाप्रकारची कार्यवाही माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली नाही, असे नमुद केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दि. १४.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये काही माहितीची मागणी केली होती. या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.३.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी माहिती देणे अथवा आवश्यक ते माहितीचे शुल्क अपिलार्थीस कळविणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास मूळात प्रथम प्रतिसाद दि. १.६.२००७ रोजी देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी संबंधित गॅस एजन्सीकडून प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांचेकडील या पत्रान्वये कळविले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने या प्रकरणी एकूण ५ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्र. १ चे अवलोकन करता अपिलार्थीस निश्चित काय माहिती हवी आहे, याचा कोणताही बोध होत नाही. मुद्या क्र.२ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीस प्रादेशिक

परिवहन कार्यालयाकडून दि. ४.८.२००६ रोजी पत्र देण्यात आले असून त्यामध्ये तुळजापूर शहरात रिक्षात गॅस वापराबाबत अशा रिक्षाची तपासणी करण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाकडून अधिकाऱ्यांचे एक पथक कार्यवाही करीत आहे, असे उत्तर दिले गेले आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या नेतृत्त्वाखाली नियुक्त पथकातील अधिकाऱ्यांची नावे जन माहिती अधिकारी यांचेकडून मागितली आहेत. या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस अद्यापपर्यंत दिली गेली नसल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य देण्यात यावी, असे त्यांना आता आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित ३ मुद्यांबाबत असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून घरगुती गॅसच्या वापराबाबत प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली होती. मूळात जन माहिती अधिकारी यांचे गॅस वितरण पध्दतीवर/प्रक्रियेवर कोणतेही सरळ नियंत्रण नाही. तसेच या संबंधातील सांख्यिकी माहिती देखिल त्यांच्याकडे कोणत्याही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने उपलब्ध असणे संभवत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसून येत नाही. तथापि त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दि. १४.२.२००७ रोजी मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर एकूण ३० दिवसांच्या अवधीत या प्रकरणी कळवावयास हवे होते, परंतु या प्रकरणी असे दिसून येते की, त्यांनी अपिलार्थीस मूळात प्रतिसादच अंदाजे ७९ दिवस इतक्या विलंबाने दिला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस तसे

का कळविले नाही, याचे कारण फक्त त्यांच्यातील इच्छाशक्तीचा अभाव एवढेच असू शकते. अर्थात हे कारण अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठीचे समर्थन करु शकत नाही, हे ही तेवढेच खरे आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे आवश्यक तो प्रतिसाद न देऊन स्वत:ला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी व कर्मचारी ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) अन्वये माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय लावलेल्या ७९ दिवस इतक्या विलंबाबाबत, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे ७९ दिवसांकरिता रु.१९७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

**लेखाशीर्ष:-**

**"००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार-००७०-००६-१"**

सदर शास्तीची अधिकारी/कर्मचारी निहाय विभागणी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तसेच संबंधित अधिकारी/ कर्मचारी हे शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात नियमितपणे करतील असे पाहून या संबंधातील आपला अहवाल आयोगास ऑगस्ट २००८ पासून दरमहा नियमितपणे सदर शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थी यांनी आज रोजी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या युक्तीवादातील मुद्यामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडील प्रथम सुनावणीस जन माहिती अधिकारी

यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. वाघमारे हे उपस्थित होते, या संदर्भात श्री.वाघमारे यांचे अधिकारपत्र सादर करण्याची आयोगास विनंती केली आहे. अशाप्रकारे प्रथम सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडील सुनावणीसंबंधीच्या कागदपत्रांच्या प्रती सादर करण्याची पध्दत रुढ नाही. तसेच अपिलार्थीस, आयोगाकडे केवळ त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्यांसंदर्भातीलच माहिती मागता येईल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्यांना जर श्री. वाघमारे यांचे अधिकारपत्राची प्रत हवी असेल तर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळयाने अर्ज करावा. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचे कारण म्हणजे जन माहिती अधिकारी यांचेवर जन अपिलीय अधिकारी यांनी दंड लावला नाही, असे नमुद केले आहे, यासंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन अपिलीय अधिकारी यांना, जन माहिती अधिकारी यांचेवर कारवाई करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत, त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांची जन माहिती अधिकारी यांना दंड न लावण्याची कृती बरोबर आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या या निवेदनामध्ये/युक्तीवादामध्ये शेवटी जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे ४५२ दिवसांकरिता रु.१,१२,२५०/- इतका दंड लावण्याची आयोगास विनंती केली आहे.तथापि माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार सदर शास्तीची जास्तीत जास्त रक्कम २५,०००/- इतकीच निश्चित करण्यात आली आहे, हे त्यांना ज्ञात करुन देण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावतांना त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिलेल्या प्रथम प्रतिसादापर्यंतचा ३० दिवसांचा अनुज्ञेय कालावधी आयोगाने लक्षात घेतला आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेत व योग्य माहिती न दिल्याने त्यांना १०००/- इतकी नुकसान भरपाई मिळावी, अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली आहे. ते तुळजापूर येथील रहिवासी असून आज ते त्यांचे द्वितीय अपील सुनावणीसाठी औरंगाबाद येथे उपस्थित राहिले आहेत. तुळजापूर ते औरंगाबाद एकेरी बसभाडे रु. २१०/- असल्याने व अपिलार्थी यांच्या मागणीमध्ये काही

तथ्यांश आढळल्याने अपिलार्थीस रु. ४२०/- इतकी नुकसान भरपाई जन माहिती अधिकारी यांनी त्यांना द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करुन दि. ६.६.२००८ रोजी आवश्यक ती माहिती दिली आहे, त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती देणे बाकी रहात आहे याचे आदेश या निर्णयामध्ये वरील परिच्छेदामध्ये दिले आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय लावलेल्या ७९ दिवसांच्या विलंबाकरिता दरदिवशी रु.२५०/- प्रमाणे एकूण १९७५०/- सदर शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. अपिलार्थीस एकूण रु.४२०/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. सदर रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत अदा करावी.

५. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर अधिकारी/कर्मचारी हे

शास्तीचा भरणा नियमितपणे माहे ऑगस्ट,२००८ पासून करतील असे पहावे व या संदर्भातील आपला अहवाल आयोगास नियमितपणे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरली जाईपर्यंत, पाठवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १०.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे,राजे संभाजीनगर (प) तुळजापूर जि.उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (आर.पी.ए.डी.द्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद जि. उस्मानाबाद.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४०

निर्णय दिनांक : १०.०६.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हरिचंद्र शंकरराव महाळंकर,<br>मु.पो.सताळा (खुर्द) ता. अहमदपूर<br>जि.लातूर | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी कार्यालय,<br>अहमदपूर जि.लातूर.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>अहमदपूर जि.लातूर | : | प्रतिवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हरिचंद्र शंकरराव महाळंकर व त्यांचे वकील श्री. प्रकाश ग.महाळंकर (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्री. खानापूरे चंद्रशेखर नागनाथ, जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय अहमदपूर जि. लातूर ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अहमदपूर जि.लातूर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ३०.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेंतर्गत माहे एप्रिल १९९१ मध्ये फलोत्पादन योजनेच्या अधिकाऱ्यासोबत त्यांनी केलेल्या कराराच्या प्रतीची मागणी खालीलप्रमाणे केली होती.

> " दोन हेक्टर अंबा फळरोप लागवडीच्या माध्यमातून मला कायमस्वरुपी स्वयंरोजगार मिळणारच आहे. या एकमेव अपेक्षेपोटी मी प्रत्यक्ष कर्ज स्वरुपाच्या शासनमान्य लिखीत करारावर महाराष्ट्र शासनाच्या रो.ह.यो.अंतर्गत अहमदपूर तालूका फलोत्पादन योजनेकडून अर्थिक सहाय्य घेतलेले आहे.
>
> करिता मे. साहेबांनी वरील प्रमाणे मी लिखीत केलेल्या कराराची प्रत मला न्यायलयीन कामकाजासाठी उपलब्ध करुन देण्याची कृपा करावी. ही विनंती. "

सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर यांचेकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांना उद्देशून दिलेले असून त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.०६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी

यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे व त्याचबरोबर अधिनियमातील कलम १९(८)(ख) प्रमाणे त्यांना झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई देण्याचे आदेशित करण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी आपले आदेश एका पत्राच्या स्वरुपात पारित केले आहेत. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही, तसेच उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांनी त्यांच्याकडील दि. २२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे, अशी विधाने केली आहेत. अपिलार्थीच्या मूळ अपिलावर या प्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीची तत्कालीन सद्यस्थिती या पत्राद्वारे अपिलार्थीस अवगत केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांचे सदर निर्णयाने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे त्यांचे वकील श्री.प्रकाश महाळंकर यांनी असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर यांचेकडे असल्याचे कळविले आहे. तथापि नंतर उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर यांनी अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. या विषयी मूळात या शासकीय प्राधिकरणाकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती निश्चितपणे कोणाकडे आहे, याबाबत मतैक्य असल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या आदेशामध्ये उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांच्या दि. २२.६.२००७ रोजीच्या पत्राच्या आधारे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले आहे.

मात्र उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांच्या दि. २२.६.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता त्या पत्रामध्ये शासनाच्या परिपत्रकानुसार अभिलेख्यांचे वर्गीकरण केल्याने सदर माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही, असे कळविले, त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती निश्चितपणे जन माहिती अधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी,उदगीर यांच्याकडे असावयास हवी आहे. जन माहिती अधिकारी यांनी जर ही माहिती अभिलेख्यांच्या वर्गीकरणानुसार आतापर्यंत नष्ट केली असेल तर, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तसे कळवावयास हवे होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले नाही. उपरोक्त प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न देऊन अधिनियमातील तरतुदीचा भंग केला आहे, त्यामुळे त्यांना कलम १९(८)(ख) मधील तरतुदीनुसार नुकसान भरपाई देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थी यांनी या संदर्भातील प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केल्यानंतर देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय दिला आहे. अपिलार्थीने सन १९९१-९२ या वर्षामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत आंबा लागवडीचा कार्यक्रम घेतला होता. त्यावेळी हा कार्यक्रम उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात आला. त्यानंतर कृषी विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या फेररचनेमध्ये बदल करण्यात आला व सुधारित रचनेनुसार ही योजना व योजनेशी संबंधित कागदपत्रे उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांच्याकडे दि. १.७.१९९८ रोजी हस्तांतरित करण्यात आली. या प्रकरणी उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेले अभिलेखे/कागदपत्रांचा त्यांचे कार्यालयात कसून शोध घेऊनही ते त्यांचे कार्यालयात नसल्याचे आढळून आले आहे.अपिलार्थीने संबंधित विषयासंदर्भात एक अर्ज शासन स्तरावर केला असता, शासनस्तरावर या प्रकरणाची चौकशी झाली असून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सन १९९१-९२ या वर्षातील रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम ही योजना उपविभागीय कृषी अधिकारी, (प्रशिक्षण व भेट) या कार्यालयाकडून राबविण्यात आली. त्यानंतर दि. १.७.१९९८ पासून कृषी केंद्र योजना व मृदसंधारण योजना यांचे एकत्रिकरण करण्यात आले व एक खिडकी हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. सदर योजनेअंतर्गत उपविभागीय कृषी अधिकारी (प्रशिक्षण व भेट योजना) उदगीर यांचे कार्यालयातील सर्व अभिलेखे उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर यांचे कार्यालयाकडे शासनाने दिलेल्या सूचनाप्रमाणे वर्ग करण्यात आले. उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा त्यांचे कार्यालयात कसोशीने शोध घेऊन त्यांचे दि. २२.६.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे नमुद केले आहे. तसेच शासनाच्या परिपत्रकानुसार अभिलेख्यांचे वर्गीकरण करण्यात आल्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शासकीय अभिलेख्यांच्या कोणत्या प्रवर्गात मोडते, या संदर्भात शासनाचे काही आदेश आहेत काय व जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सदर अभिलेख्यांचे वर्गीकरण करतांना संबंधितांकडून नष्ट करण्यात आली असेल तर, या संदर्भातील पुराव्याची जन माहिती अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी हे या प्रश्नावर आयोगास कोणतेही उत्तर देऊ शकले नाही. ही वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर यांचे कार्यालयातील सर्व अभिलेख्यांमध्ये परत कसोशीने शोध घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे वर्गीकरण, ती कोणत्या वर्गात मोडते व हे अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांनी नष्ट केले किंवा कसे, याची माहिती घ्यावी. जर संबंधित अभिलेखे नष्ट केल्याचे कोणतेही पुरावे त्यांना उपलब्ध झाले नाही तर, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ३०

दिवसांचे आत पुरवावी आणि जर अभिलेख्यांच्या वर्गीकरणाचा पुरावा व अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती नष्ट केल्याचा पुरावा संबंधितांकडून प्राप्त झाला अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावे.

या प्रकरणी प्रथम अपील व द्वितीय अपीलाचे सुनावणीस हजर राहण्यासाठी रु.५००/- इतका खर्च झाला असे अपिलार्थी यांचे वकील यांनी सुनावणीमध्ये सांगितले. या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने व आयोगाकडे व प्रथम अपिलाचे सुनावणीस व संबंधित प्राधिकरणाकडे वेळोवेळी उपस्थित राहावे लागले, हा अपिलार्थी यांचा युक्तीवाद मान्य करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रु.५००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी, असे त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) च्या तरतुदीअन्वये सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर अथवा कोणत्याही असद्हेतूने अपिलार्थीकडून माहिती दडविण्याचा प्रयत्न केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसांचे आत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी किंवा सदर माहितीचे अभिलेखे संबंधित कार्यालयाकडून नष्ट केले असतील तर तसे अपिलार्थीस या माहितीबाबत कळवावे.

३. अपिलार्थीस रु.५००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत असून, सदर नुकसानभरपाईची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १०.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हरिचंद्र शंकरराव महाळंकर,मु.पो.सताळा (खुर्द) ता. अहमदपूर जि.लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषी अधिकारी कार्यालय,अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४१

निर्णय दिनांक ११-०६-२००८

श्री. बापु भानुदास शिंदे, : अपिलार्थी
एकोडी सागज पो. भगूर,
तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, वैजापूर
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग वैजापूर तालुका वैजापूर
जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय वैजापूर जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, वैजापूर जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बापु भानुदास शिंदे हे गैरहजर

आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. अशोक पांडुरंग कुळधर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. शामलाल रतनसिंग छानवाल (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बल्लाळी सागज येथील कंटूर बंल्डींग, नाला बल्डींगच्या कामासंदर्भात व मजुराच्या हजेरीपत्रकासंदर्भात ०१-०३-२००६ ते ३०-०८-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ कॅनटर बलडीगची मौजे बल्लाळीसागज येथील मजुराचे हजरीपत्रके व अंदाजपत्रक, शेतीच्या बांधावरील मातीबांध (कॅनटर बलडीग) चे हजरीपत्रके व अंदाजपत्रक मौजे बल्लाळी सागज ता. वैजापूर. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहिती पोटीचे शुल्क रुपये १६०० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठी प्रती पृष्ठाचा दर अपिलार्थीस कळविला नाही. अपिलार्थीस सदरचे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर कोणताही पुरावा, आयोगाने त्यांना पाठविलेल्या पत्रामध्ये स्पष्टपणे सूचित करुनही दाखवू शकले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविले होते किंवा कसे याबाबत आयोगास संभ्रम होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००७ रोजी सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दोन कागदपत्रावरुन दिसत आहे, तथापि त्याबाबत सुनावणीच्या इतिवृत्ताच्या कागदावर कोणाचीही सही नाही तर या पत्रासोबत जोडलेल्या दुस-या कागदावर अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या सह्या आहेत. या सह्या देखील कोणत्या कागदपत्राशी संबंधीत आहेत हे या कागदावरील सह्याच्या वर दुसरा कोणताही विशिष्ट असा उल्लेख नसल्याने सांगता येत नाही. या सुनावणीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आपला कथित निर्णय त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविला आहे. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस रुपये १६०० इतक्या रक्कमेचे चलन तयार करुन या रक्कमेचा भरणा बॅकेमध्ये करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व सदर रक्कम भरल्याची प्रत त्यांना प्राप्त होताच अपिलार्थीस आवश्यक माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्राने उत्तर देऊन अपिलार्थीस रुपये १६०० इतक्या रक्कमेचा भरणा सदर माहितीपोटीचे शुल्क म्हणून त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. तथापि त्यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने भरणा न केल्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अपील केल्यानंतरही त्यांनी अशाच प्रकारचा निर्णय या प्रकरणामध्ये दिलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या अर्जावर दिनांक ०५-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०८-०५-२००७ रोजी पारीत केले. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६०० इतके बॅकेमध्ये भरण्याचे सांगितले. या पत्राबरोबर त्यांनी १६०० रुपये इतक्या रक्कमेच्या २ चलन प्रती करुन त्या अपिलार्थीस पाठविल्या होत्या.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक २५-०१-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि आयोगाने पूर्वसूचना देऊनही जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीच्या संबंधीत पृष्ठाची झेरॉक्स प्रत अथवा जावक नोंदवही आयोगास दाखविली नाही. याचबरोबर अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यात येणारी प्रस्तावित माहिती किती पृष्ठाची आहे व सदर माहिती देण्यासाठी प्रती पृष्ठ दर किती आहे याचा काहीही उल्लेख केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) अन्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी सदर शुल्क कशाच्या आधारे ठरविले आहे याच्या हिशोबासह फीचा तपशील कळवावयाचा होता. याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडून त्यांचे दिनांक २५-०१-२००७ रोजीचे कथित पत्र त्यांना प्राप्त झाल्याचा उल्लेख प्रथम अपील व आयोगाकडे केलेले व्दितीय अपील यामध्ये केलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००७ रोजीचे पत्र मुळात पाठविलेच नसावे हा आयोगाचा संशय अधिक दृढ होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अशा प्रकारच्या केलेल्या अनियमिततेमुळे व अपिलार्थीस माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस आता विनामूल्य द्यावी लागेल. याचबरोबर या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्रव्यवहार करतांना, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील ठरवितांना योग्य ती काळजी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहितीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे व सतर्कतेने कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. **कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास सदर माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधीत अर्जदाराची आहे असे येथे स्पष्ट करण्यात येत आहे. अर्जदाराने व्यक्तिशः माहिती मागविणे याचा अर्थ अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः (कोणताही प्रतिनिधी न पाठविता) हजर राहून आपली हजेरी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नोंदवून व त्याबाबतचा पुरावा जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन माहिती हस्तगत करण्याविषयी प्रयत्न करणे अशा स्वरुपाची प्रक्रिया "व्यक्तिशः" या शब्दात अभिप्रेत आहे.** या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थी आपली हजेरी त्यांच्या नोंदवून त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. यावरुन अपिलार्थीस माहिती न मिळण्यामध्ये ते स्वतः काही अंशी जबाबदार असल्याचे दिसून येते. तथापि माहितीचा अधिकार अधिनियमाचा मूळ हेतू लक्षात घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचा सकारात्मक दृष्टीकोन ध्यानात ठेऊन हे आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ११-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बापु भानुदास शिंदे, एकोडी सागज पो. भगूर, तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय वैजापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, वैजापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४२

निर्णय दिनांक ११-०६-२००८

श्री. पटेल शेख अहेमद महंमद अब्दुल हफीज, : अपिलार्थी
रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, हजरत उमर
फारुख उर्दु हायस्कूल, प्राथमिक
शाळा, मिल्लतनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, हबीबीया वेल्फेअर ॲण्ड
एज्युकेशन सोसायटी, मार्फत हजरत
उमर फारुख उर्दु हायस्कूल,
मिल्लतनगर, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पटेल शेख अहेमद महंमद अब्दुल

हफीज (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. मोहमद ईस्माइल मोहमद ईब्राहीम जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत उमर फारुक उर्दु हायस्कूल, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हबीबीया वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " अनुदानीत सर्व वर्ग तुकडीनिहाय तांदुळ, शालेय पोषण आहार बाबत तपशील (शिजविणे, वितरण, ठेकेदाराचे नावासहीत) कामासाठी निविदा काढली होती काय ? निविदा काढली असेल तर वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या सत्यप्रती, जर निविदा काढली नसेल तर त्याची कारणे याचा तपशील, आपल्या शाळेतील घेण्यात आलेल्या परिक्षा, घटक चाचण्या, प्रथम सत्र परिक्षा, व्दितीय सत्र परिक्षा याबाबत जमा करण्यात आलेल्या फीचे तपशीलवार विवरण तसेच प्रमाणित ऑडिट रिपोर्ट व खर्चाबाबतची सविस्तर लेखी माहितीच्या सत्यप्रती मिळणेबाबत तसेच सर्व वर्गाची एकूण वर्गनिहाय संख्या, विद्यार्थ्यांकडून जमा केलेले शैक्षणिक शुल्क, प्रवेश फी, या रक्कमेची तपशीलवार माहिती व खर्चाचे विवरण इत्यादींच्या सत्यप्रती मिळणेबाबत. तसेच प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्याच्या वर्गनिहाय १ ली ते ७ वी पर्यन्त प्रवेशानर्गम सत्यप्रती प्रवेशपत्राच्या सत्यप्रती तसेच प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या जाती व पोटजातीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती तसेच अर्जनिहाय

विद्यार्थ्यांच्या नावाची यादी व विद्यार्थी उपस्थिती रजिस्टरच्या सत्यप्रती मिळणेबाबत. ”

अपिलार्थीने सदर माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आला नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे सांगितले. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज पोस्टाने पाठविला आहे तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक १६-०४-२००७ रोजीचा अर्ज प्राप्त झाला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या

अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास जाणूनबुजून नाकारले तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणतीही कृती केली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जातील माहिती त्यांना ८ दिवसाच्या आत हवी आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा अपील अर्ज स्विकृत न करता टपाल परत केले असे विधान केले आहे, या विधानापृष्ट्यर्थ त्यांना परत आलेले टपाल दाखविण्याबाबत आयोगाने विचारणा केली असता सदर टपाल आता त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. यावरुन अपिलार्थीच्या या दाव्याबद्दल आयोग साशंक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे कोणतेही टपाल परत केले नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाचे टपाल त्यांना प्राप्त झाले नाही. अपिलार्थीचे कोणतेही टपाल त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय घेता आला नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी त्यांचा अर्ज अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविला होता. त्यांनी सदर अर्ज अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविल्याचा पुरावा म्हणून पोस्टाची पावती आयोगास सादर केली आहे.

यावरुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाव्दारे अपिलार्थीस पत्र पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज त्यांच्या शाळेकडे प्राप्त झालेला नाही. याच शाळेच्या विरुध्द याच अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जावर आयोगाने दिनांक ०४-०६-२००८ रोजी सुनावणी घेतली असता त्यावेळी देखील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे सुनावणीस गैरहजर होते. यावरुन संबंधीत शाळेचा, शिक्षण संस्थेचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा अनादर करण्याकडे कल असल्याचे दिसून येत आहे. संबंधीत शिक्षण संस्थेस शासनातर्फे अनुदान प्राप्त होत असल्याने व या शिक्षण संस्थेवर शासनाचे नियंत्रण असल्याने ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे, त्यामुळे त्यांच्या माहिती अधिका-यास, अपिलार्थीने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ मधील प्राप्त झालेल्या हक्कानुसार त्यांनी कलम ६ अन्वये विचारलेली माहिती देणे भाग आहे. अपिलार्थीने आता मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांना व्यक्तिशः हस्तांतरीत करण्याचे व ती प्रत जन माहिती अधिकारी यांनी स्विकारण्याचे मान्य केले आहे. याचबरोबर शिक्षण उप संचालक, लातूर यांनी देखील या शाळेच्या अपिलार्थीच्या या अर्जातील विषयासंदर्भातील सर्व अभिलेख्यांची पाहणी करणे, एकंदरीत त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने गरजेचे झाले आहे असे आयोगास वाटते. सबब वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद<br>
दिनांक	११-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. पटेल शेख अहेमद महंमद अब्दुल हफीज, रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत उमर फारुख उर्दु हायस्कूल, प्राथमिक शाळा, मिल्लतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, हबीबीया वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, मार्फत हजरत उमर फारुख उर्दु हायस्कूल, मिल्लतनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४३

निर्णय दिनांक ११-०६-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. शंकर इंगळे,<br>आनंदनगर चौक, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा कृषि अधीक्षक,<br>नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा कृषि अधीक्षक,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक प्रशासन अधिकारी, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कृषि उपसंचालक कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकर इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. नथ्थ्युजी बाळकृष्ण कोलपवार, जन माहिती

अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. आप्पाराव राजकुमार हसणाबादे, जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उप संचालक, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००५ मधील अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांच्या अनुदानासंदर्भात २००५ ते ११-०५-२००७ या कालावधीतील एकूण ६ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद यांनी अपील क्र. २००६/७०२/०२ दि. २४-१-०७ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहिती अधिका-याकडून रु. २५००० /- वसूल करुन ती रक्कम ज्या चालानव्दारे सरकारी खजिण्यात भरली त्या चालानची प्रत द्यावी.

२. अद्याप रक्कम वसूल केली नसल्यास विलंबाची कारणे द्यावीत.

३. २००५ मधील शेतक-याचे लहान ता अर्धापूर येथील अनुदान रु. १,७१,५०० /- द्यावयाचे राहिले, त्या हलगर्जीपणास जबाबदार असलेल्या कर्मचा-यांची नावे द्यावीत.

४. त्या जबाबदार असलेल्या कर्मचा-याकडून आलेल्या खुलाशाच्या झेरॉक्स प्रति द्याव्यात, व शोकॉज नोटीसीची प्रत द्यावी.

५. त्यांच्यावर सेवा नियमाप्रमाणे केलेल्या कारवाईची माहिती द्यावी. कारवाई केली नसल्यास कारणे द्यावीत. याबाबत झालेल्या सर्व संबंधीत पत्रव्यवहाराच्या प्रति द्याव्यात.

६. रु. १,७१,५०० /- चे राहिलेले अनुदान वाटप केलेली तारीख द्यावी. वाटप झाले नसल्यास कारणाची माहिती द्यावी.

७. सर्व प्रति प्रमाणित करुन द्याव्यात. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला.

जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास हेतूपूरःस्सर टाळाटाळ केल्याचे व अधिनियमातील कलम ७ (८) मधील निर्देशीत केल्याप्रमाणे तपशील दिला नसल्याचे नमूद केले आहे व या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची व अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे त्यांना विनामूल्य माहिती देण्यास जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १३-०७-२००७ रोजी पारीत केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न देता अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती / स्पष्टीकरण दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी या प्रकरणी दोषी असल्याचे नमूद केले आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस जन माहिती अधिकारी यांना बोलाविले नसल्याची माहिती आयोगास उपलब्ध करुन दिली आहे. तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ ची त्यांना माहिती दिली नाही व मुद्दा क्रमांक ४ व ५ ची त्यांना खोटी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी हे या प्रकरणी दोषी ठरत असल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करावी, याचबरोबर, जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतःच खरी माहिती दडवून खोटी माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावरही दंडाची व शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ५ ची माहिती त्यांना मोफत देण्याची व अपिलार्थीस आर्थिक नुकसानभरपाई मान्य करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये उडवाउडवीची उत्तरे दिली असून त्यामध्ये त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे, तथापि सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होती. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती उपलब्ध होती असे म्हटले तरी त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (3) (i) च्या तरतुदी नुसार अपिलार्थीचा अर्ज संबंधितांकडे पाठवून त्यांनी त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली

नाही. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आदेशीत करु शकत नाहीत. जर अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांना अपिलार्थीचा अर्ज संबंधीत प्राधिकरणाकडे पाठवून देण्याचा पर्याय त्यांच्याकडे शिल्लक राहत असतो. जन माहिती अधिकारी यांची माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई न करण्याची ही दुसरी वेळ असून दुस-या एका प्रकरणामध्ये त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये परत पाठविला. त्यांच्या या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या दिनांक ०२-०२-२००६ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. या सर्व पत्रव्यवहारावरुन जन माहिती अधिकारी यांचा माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा उद्देश दिसून येतो. याचबरोबर दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आमंत्रित केले नव्हते व जन माहिती अधिकारी यांना सुनावणीसाठी आमंत्रित करण्याची आवश्यकता नाही असे त्यांना सांगण्यात आले. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्यास आदेशीत करण्याऐवजी त्यांनी त्यांच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ व्दारे त्यांना खोटी माहिती पुरविण्यात आली असून अनुदान वाटपास विलंब झाल्यामुळे संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून देखील त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली नाही अशी चुकीची माहिती दिली. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी हे पूर्णपणे दोषी असल्यामुळे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) व (२) नुसार कारवाई करण्याचे आदेश होऊन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी. मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ५ च्या

संदर्भात विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी. उपरोक्त प्रकरणी अपील सुनावणीसाठी हजर राहण्याकरिता त्यांना आलेल्या खर्चाची रक्कम संबंधितांकडून त्यांना प्राप्त व्हावी अशी विनंती त्यांनी आयोगास युक्तिवादाच्या शेवटी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. एम. के. जाधव हे अधिकारी (सध्या जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी परभणी यांचे कार्यालय) या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीशी केला गेलेला संपूर्ण पत्रव्यवहार त्यांच्यामार्फत केला गेलेला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीचा मूळ अर्ज ते या पदाचा पदभार स्विकारण्यापूर्वीच पाठविला असल्यामूळे अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. २००५ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानभरपाई म्हणून रुपये १,४८,३०० इतके अनुदान तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर यांना दिले गेले असून या अनुदानाच्या वाटपासंदर्भात झालेला पत्रव्यवहार तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर यांनी दिनांक ०६-१०-२००७ रोजी अपिलार्थीस दाखविला होता. अनुदान वाटपाबाबत विलंब झाल्या प्रकरणी त्यांनी उपविभागीय कृषि अधिकारी, नांदेड यांची चौकशी करण्यासाठी नेमणूक केली होती. त्यांचा अहवाल दिनांक २७-०५-२००८ रोजी प्राप्त झाला असून त्यांच्या चौकशीमध्ये अनुदान वाटपाबाबत विलंब होण्या प्रकरणी कोणीही दोषी आढळून आले नाही त्यामुळे कोणावरही कारवाई केली गेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक ११-०७-२००७ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळेस त्यांनी जन माहिती अधिकारी यांना उपस्थित राहण्याविषयी सूचना दिली होती. तथापि त्यांच्या या म्हणण्यापृष्ट्यर्थ ते आयोगास कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. अपील सुनावणीमध्ये चर्चा

झाल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याचे काम जरी जन माहिती अधिकारी यांचे असले तरी त्यांनी ते काम केले. या प्रकरणी त्यांच्या कार्यालयाकडून संबंधितांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या गेल्या नव्हत्या. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण ६ मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ५ च्या संदर्भात हे आदेश सीमीत ठेवण्यात येत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक २ मध्ये शास्तीची रक्कम अद्याप वसूल केली नसल्यास विलंबाची कारणे द्यावीत अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अथवा कारणे अपेक्षित करणारी माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विचारता येणार नाही कारण माहितीचा अधिकार अधिनियमातील जन माहिती अधिकारी यांची भूमिका त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे विश्वस्त अशा प्रकारची असते. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती जतन करुन ठेवणे व माहितीचा अधिकार अधिनियमाखाली कोणत्याही अर्जदाराने ज्याज्यावेळी माहिती मागविली त्यात्यावेळी ती त्यांना पुरविणे अशा प्रकारची कृती या अधिनियमात अभिप्रेत आहे. त्यांनी अमूक एक कृती का केली नाही किंवा कोणतीही घटना घडल्यास त्याची कारणे काय यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करणे माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अपेक्षित नाही त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ हा निकाली निघत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये मौजे ‘‘लहान’’ तालुका अर्धापूर येथील अनुदान रुपये १,७१,५०० द्यावयाचे राहण्यासंदर्भात केलेल्या हलगर्जीपणाबद्दल जबाबदार असलेल्या कर्मचा-यांच्या नावाची माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली होती. यासंदर्भात आयोगास जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे अशी माहिती देण्यात आली की, त्यांना दिनांक २६-०४-२००७ रोजी शासनाकडून अतिवृष्टीपोटी झालेल्या नुकसानभरपाईपोटी रक्कम रुपये १,४८,३०० इतके अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर अनुदान तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे वितरणा-साठी दिले. सदर अनुदानाचे वाटप तालुका कृषि अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००७ रोजी केले. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ३ व्दारे अनुदान वाटपात हलगर्जीपणा केल्या प्रकरणी जबाबदार असलेल्या कर्मचा-यांची नावे जन माहिती अधिकारी यांना विचारली, तथापि या प्रकरणी मुळात कोणत्याही अधिका-यावर जबाबदारी निश्चित केली गेली नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीची सद्यःस्थिती कळवावयास हवी होती, तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यास प्रथमतः सूचित केले. तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी स्वतः दिनांक ०९-०५-२००७ रोजी अर्धापूर कार्यालयातील माहिती घेतली असल्याचे अवगत केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तरामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती विसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ४ मध्ये जबाबदार असलेल्या कर्मचा-यांकडून आलेल्या खुलाशाच्या झेरॉक्स प्रती व शोकॉजच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. मुळात महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे या प्रकरणी कोणतीही चौकशी आदेशीत केली गेली नसल्याने अपिलार्थीच्या या मुद्दयावर देखील जन माहिती अधिकारी यांनी निरंक माहिती देणे

अभिप्रेत होते. तथापि याही मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधीतांना नोटीस देण्यात आली नसल्याचे त्यांच्या अपील निर्णयामध्ये अवगत केले. या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि सदर माहिती खोटी असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी झालेल्या पत्रव्यवहाराची व उपविभागीय कृषि अधिकारी, नांदेड यांच्याकडून झालेल्या चौकशी अहवालाची प्रत आयोगास सादर केली असून त्यामध्ये या प्रकरणामध्ये कोठलाही भ्रष्टाचार झालेला नसून कोणत्याही कर्मचा-याकडून दिरंगाई झाल्याचे दिसून येत नाही असे म्हटले आहे. उपविभागीय कृषि अधिकारी, नांदेड यांचा अहवाल जिल्हा कृषि अधीक्षक अधिकारी यांनी मान्य केला आहे किंवा कसे यावर उपस्थित जन माहिती अधिकारी हे आयोगास कोणतीही माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ संदर्भातील माहिती चौकशी अधिका-याच्या अहवालाच्या स्विकृतीच्या निर्णयानंतरच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना पुरवावी लागेल. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याने मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस पुरविली गेल्याचे दिसत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ अनुदान वाटपातील दिरंगाई प्रकरणाशी संबंधीतावर करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात केल्या गेलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती. तथापि या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी वा तालुका कृषि अधिका-याकडून प्राप्त झाल्या नसल्याचे दिसून येत आहे. थोडक्यात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे अभिप्रेत नाही. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक आहे. मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात चौकशी अहवालावरील निर्णयाअभावी, तर मुद्दा क्रमांक ५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारवाई केली नसल्यास त्याची कारणे मागितली आहेत ज्याकरिता मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात केलेले वरील विवेचन लागू पडते, मात्र याच मुद्दयामध्ये अपिलार्थीने निर्देशित केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस मिळाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता या प्रकरणी त्यांनी केलेली कारवाई चुकीची असून कोणत्याही अर्जदारास माहिती कशी देण्यात येऊ नये याचे हे उत्तम उदाहरण ठरेल. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रत्येक मुद्दयावरील माहिती नाकारुन अपिलार्थीस सदर माहिती तालुका कृषि अधिकारी नांदेड व अर्धापूर यांच्याकडून घेण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती त्यांच्या बेजबाबदारपणाची व त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाचे किमान आवश्यक ते ज्ञान नसल्याचे द्योतक आहे असे दिसून येते. उपरोक्त प्रकरणी जर अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी कलम ६ (३) अन्वये अपिलार्थीचा अर्ज संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे, असे आयोगास वाटते. आज रोजी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी अपिलार्थीस पुरविली गेलेली माहिती पाहता अद्याप त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस त्यांनी आतापर्यंत प्राप्त झालेली माहिती अर्धवट ठरते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीमध्ये त्यांनी जन माहिती

अधिकारी यांना सुनावणीस बोलाविले होते किंवा कसे याचा दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्रावरुन बोध होत नाही. तद्वतच त्यांनी या अपील निर्णयामध्ये अवगत केलेल्या पत्रावरुन जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या म्हणणे मांडण्यासाठी संधी दिली असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय देतांना तो कसा असू नये याचे दिनांक १३-०७-२००७ चे पत्र हा उत्तम नमुना ठरु शकेल असे आयोगाचे मत आहे. अपील ठरविण्याप्रकरणी दोन्ही बाजुंना बोलावून, त्यांचे म्हणणे व युक्तिवाद नोंदवून त्यावर आपला निर्णय देणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अशा प्रकारच्या कोणत्याही कृतीचा जन अपिलीय अधिकारी यांनी येथे अवलंब केलेला नाही. यापुढे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर त्यानी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना बोलावून त्यावर आपले एकत्रित आदेश पारीत करावेत असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. वर विवेचन केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यास टाळाटाळ झाल्याचे व अपिलार्थीस आजपर्यंत प्राप्त झालेली माहिती अर्धवट असल्याचे सिध्द झाले असल्याने यास संबंधीत जन माहिती अधिकारी हे खचितच दोषी आहेत अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई दर्शविली असून स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध न करुन देऊन त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित

मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, आता अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली असती तर अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची व निष्कारण खर्च करण्याची गरज पडली नसती, हा अपिलार्थीचा युक्तिवाद मान्य करण्यात येऊन या प्रकरणी त्यांना नांदेड - औरंगाबाद या प्रवासातील जाण्या-येण्याचा खर्च रुपये २५० /- इतकी नुकसानभरपाई माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (अ) च्या तरतुदी अन्वये देण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती

का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रुपये २५० (रुपये दोनशे पन्नास) इतकी नुकसानभरपाई हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत द्यावी.

औरंगाबाद<br>
दिनांक ११-०६-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकर इंगळे, आनंदनगर, चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक कार्यालय जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४४

निर्णय दिनांक ११-०६-२००८

श्री. मो. मोईजखान मो. अस्गरखान, : अपिलार्थी
४२७, प्र. नि. हा. जवळ, कैलासनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मो. मोईजखान मो. अस्गरखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. काशिबा भीमराव काजुलवाड जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. अतुल त्र्यंबकराव जटाळे नायब तहसीलदार म. १ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार नांदेड, यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. धनंजय

अंबादासराव कुलकर्णी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे रॉकेल वितरणासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " केरोसीन हॉकर्स / किरकोळ विक्रेते यांना नांदेड शहरातील कार्डधारक जोडण्याकरिता केलेल्या चौकशीचा अहवाल, चौकशी करण्याची पध्दत, चौकशीनुसार देण्यात आलेला मासिक पुरवठा नेमून दिलेले कार्डधारकांना गॅस कनेक्शनसंबंधी विचारपूस करुन केलेल्या चौकशीचा अहवाल, चौकशी करणा-या कर्मचारी संबंधीताची पध्दत यांची यादी, चौकशीनुसार अर्धघाऊक विक्रेत्यांकडून देण्यात येणारा मासिक पुरवठ्या तपशील. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी म्हणजे दिनांक २२-०५-२००७ रोजीच पारीत केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे

अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झाला नाही. राज्य माहिती आयोगाकडील व्दितीय अपील सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नांदेड तालुक्यातील केरोसीन वितरणाची माहिती दिली. यामध्ये देखील जन माहिती अधिकारी यांनी किरकोळ विक्रेत्यांनी प्रत्यक्ष उचल केलेले केरोसीन हा रकाना रिक्त ठेवला आहे. त्यांनी मागितलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांना अवगत झाली नव्हती तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवावयास हवे होते म्हणजे त्यांना प्रथम व व्दितीय अपील करावयाची वेळ आली नसती.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा उलगडा त्यांना त्यावेळी झाला नव्हता त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस यासंदर्भातील शासनाच्या परिपत्रकाच्या प्रती व्यक्तिशः हस्तांतरीत केल्या होत्या. तथापि त्यावेळी अपिलार्थी यांच्याकडून सदर प्रतीची पोच त्यांनी लेखी स्वरुपात घेतली नाही. मात्र सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीशी संबंधीत माहिती त्यांना दिनांक २२-०५-२००८ रोजी पाठविली आहे. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षित केली होती.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची त्यांनी दिनांक २२-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीच्या माहितीच्या मागणीसाठीच्या दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा अर्थबोध होत नाही. तथापि अपिलार्थीस रॉकेल नियतनासंदर्भात कोणतीतरी माहिती हवी आहे असे जन माहिती अधिकारी यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दिनांक २२-०५-२००८ रोजी सदर माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविली आहे. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जासंबंधाने कारवाई करुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याची मागणी अपिलार्थीकडे करणे आवश्यक होते. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कृती न करुन अधिनियमातील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीस रॉकेल नियतनाची माहिती हवी आहे असा त्यांनी अंदाज काढून अपिलार्थीस नांदेड तालुक्यातील रॉकेल नियतनाची

दिनांक २२-०५-२००८ रोजी म्हणजे एक वर्षाच्या कालावधीने त्यांना विनामूल्य माहिती पुरविली आहे हे पाहता अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक त्या गांभीर्याने लक्ष पुरविल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून यापुढे त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या अर्जांवर कारवाई करतांना सतर्क राहावे अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे. अपिलार्थीने, किरकोळ केरोसीन विक्रेत्यांनी किती रॉकेल उचलले याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००८ रोजीच्या पत्रामध्ये त्यांना उपलब्ध करुन दिली नाही असा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे किरकोळ केरोसीन विक्रेत्यांनी उचललेले रॉकेल यासंदर्भातील माहिती मागविल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने उपस्थित केलेला हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. मूळात अपिलार्थीने निश्चित स्वरुपात कोणतीही मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली नसल्याने या प्रकरणी अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होत नाही, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक कारवाई न केल्यामुळे त्यांना वर उल्लेख केल्याप्रमाणे सक्त ताकीद देण्यात येत असून या ताकीदीची नोंद तहसीलदार, नांदेड यांनी त्यांच्या सेवापुस्तिकेत घ्यावी, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले

द्वितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ११-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मो. मोईजखान मो. अस्गरखान, ४२७, प्र. नि. हा. जवळ, कैलासनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण उपसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४५

निर्णय दिनांक ११-०६-२००८

श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, : अपिलार्थी
संपादक, नांदेड पोलखोल,
एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तहसील कार्यालय, हदगाव,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, हदगाव,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगाव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. रंगराव किसनराव मेंडके, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगाव(यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. नारायण वामनराव पैलवाड, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. ओमप्रकाश नथमल काबरा हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे हदगाव मुख्यालयातील अर्धघाऊक केरोसीन विक्रेते यांनी किरकोळ विक्रेत्यांना केरोसीन विक्री केलेल्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच किरकोळ विक्रेत्यांनी कार्डधारकांना विक्री केलेल्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रतीची जानेवारी २००६ ते डिसेंबर २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ माहे जानेवारी २००६ ते डिसेंबर २००६ या कालावधीत हदगाव मुख्यालयावरील अर्धघाऊक केरोसीन विक्रेता श्री. काबरा यांनी किरकोळ विक्रेत्यांना केरोसीन विक्री केलेल्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच किरकोळ विक्रेत्यांनी कार्डधारकांना विक्री केलेल्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रती देण्यात याव्यात. ”

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर दिनांक २९-११-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०६-१२-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतीमतः सुनावणी दिनांक ०५-०३-२००७ रोजी घेऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित करणारे आदेश त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिले. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी एकूण रुपये १७५८८ /- इतक्या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २३-०७-२००७ रोजी भरले. तथापि अपिलार्थीस माहिती देतांना प्रत्यक्षात एकूण ५९०९ इतक्या पृष्ठाची माहिती दिली गेली. त्याच्या प्रती पृष्ठ रुपये २ प्रमाणे एकूण रुपये ११८१८ इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांनी ठेऊन उर्वरीत रक्कम ५७७० ही अपिलार्थीस दिनांक २१-०५-२००७ रोजी परत केली.

या सर्व प्रकरणामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मूळ अर्ज केल्यानंतर ४ महिन्याचा कालावधी लोटून गेल्यानंतर सशुल्क माहिती प्राप्त झाली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निःशुल्क माहिती देण्याचे त्यांना आदेश द्यावेत व त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेले शुल्क परत करण्याची आयोगास विनंती केली आहे व याचबरोबर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची देखील त्यांनी या अर्जामध्ये विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी कार्यवाई का केली नाही, हे ते सांगू शकत नाहीत. अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी श्री. डी. एन. गायकवाड हे नायब तहसीलदार होते ते सध्या तहसील कार्यालय, लोहा, जिल्हा नांदेड येथे कार्यरत आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले त्यावेळी श्री. अभिमान्यू बोधवडकर हे तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची दिनांक ०५-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे दिनांक ३०-०३-२००७ रोजी आदेशीत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सुचनेनुसार तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटी रुपये १७५८८ इतक्या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सांगितले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना देण्यात येणारी माहिती एकूण ८७९४ इतक्या पृष्ठांची असल्याचे नमूद केले आहे. ८७९४ ही पृष्ठांची संख्या त्यांना अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या माहितीवरुन प्राप्त झाली होती. तथापि प्रत्यक्षात ज्यावेळी अपिलार्थीस माहिती देण्यात आली त्यावेळी माहितीच्या पृष्ठांची संख्या ५९०९ इतकी

असल्याने ती माहिती देण्यापोटी त्यांनी अपिलार्थीकडून प्राप्त झालेली रक्कम रुपये १७५८८ मधून रुपये ११८१८ ठेऊन घेऊन रुपये ५७७० इतकी उर्वरित रक्कम दिनांक २१-०५-२००७ रोजी अपिलार्थीस परत केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्या कडे त्यांच्या दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये वर उल्लेखिल्याप्रमाणे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०६-१२-२००६ रोजी प्राप्त झाला. यावर अधिनियमातील कलम ७ (१) व (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते. म्हणजेच त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०१-२००७ पूर्वी त्यांना देण्यात येणा-या प्रस्तावित माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहिती देण्याचा प्रती पृष्ठ दर व भरावे लागणारे एकूण शुल्क कळविणे भाग होते. तथापि या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे ७ (३) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या पध्दतीप्रमाणे तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताच प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले, त्याची सुनावणी दिनांक ०५-०३-००७ रोजी होऊन दिनांक ३०-०३-२००७ रोजी आदेश पारीत केले. दिनांक ३०-०३-२००७ रोजी आदेश पारीत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०५-२००७ रोजी रुपये १७५८८ इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले. या सुचनेनुसार अपिलार्थीने रक्कम रुपये ११८१८ इतकी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात २३-०७-२००७ रोजी भरली. (माहिती दिली –

दिनांक २१-०७-२००७) सदर रक्कमेचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिनांक २१-०७-२००७ रोजी दिली. अपिलार्थीस आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करण्याआधी माहिती कशी देण्यात आली याची विचारणा करता, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रत्यक्षात रक्कम जमा केली. सदर रक्कम जमा करण्याची नोंद त्यांनी त्यांच्याकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी घेतली आहे.

वरील घटनाक्रमाच्या प्रत्येक घटनेची तारीख पाहिली असता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियमाचे किमान आवश्यक ते गांभीर्यही अद्यापपावेतो कळले नसल्याचे दिसून येते. कोणत्याही नागरिकास त्यांनी माहितीसाठीचा अर्ज केल्यापासून सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत माहिती द्यावयाची असते. विहित केलेली मुदत हा माहिती अधिकाराचा मूळ गाभा आहे. विहित मुदतीचे बंधन न पाळून जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाचे पावित्र्य भंग केले आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी माहितीपोटी किती शुल्क भरावयाचे ही माहिती ३० दिवसाच्या आत म्हणजे दिनांक ०५-०१-२००७ पूर्वी कळविणे अगत्याचे होते तथापि त्यांना ही माहिती दिनांक १८-०५-२००७ रोजी म्हणजेच अंदाजे ५ महिने इतक्या उशिराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कळविण्यात आली. माहितीचा अधिकार अधिनियम कलम ७ (६) मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देण्यासाठी कालमर्यादेचे पालन करण्यात कसूर केली असेल तर माहिती मिळण्याची विनंती करणा-या व्यक्तीस ती माहिती मोफत देण्यात येईल असे स्पष्ट म्हटले आहे. वास्तविकतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील ज्यावेळी केले होते त्यवेळी ३०

दिवसाचा मोफत माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश पारीत करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील तरतुदींचा कोणत्याही प्रकारे अभ्यास न करता दिलेला दिनांक ३०-०३-२००७ रोजीचा निर्णय अधिनियमातील कालमर्यादेच्या मुद्दयावर रद्द ठरविण्यात येत असून माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावयाची होती ती माहिती अपिलार्थीस देण्यापोटी त्यांच्याकडून घेतलेले शुल्क रुपये ११८१८हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत परत करण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून दिनांक २३-०७-२००७ रोजी भरुन घेतलेले शुल्क रुपये ११८१८ हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच

३० दिवसाच्या आत परत करावे. सदर रक्कम अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत परत न केल्यास अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडून दर महिना दर शेकडा एक टक्के दराने व्याजाची मागणी या कामी त्यांना झालेल्या नुकसानभरपाईची रक्कम म्हणून प्राप्त करुन घेऊ शकतील. सदर व्याजाची रक्कम संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी येणेप्रमाणे अपिलार्थी कडून विनंती प्राप्त झाल्यानंतर, स्वतःच्या पगारातून अपिलार्थी यांना द्यावयाची आहे.

३ संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, संपादक, नांदेड पोलखोल, एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हदगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४६

निर्णय दिनांक ११-०६-२००८

श्री. सोळंके मन्मथ गंगाधर, : अपिलार्थी
व्दारा- सौ. रत्नमाला शिंदे, बँक कॉलनी,
अहिल्यादेवि कन्या शाळेजवळ, वसमत
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सोळंके मन्मथ गंगाधर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. उमाकांत दत्तात्रय तोटावाड जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नूरमोहमद

दोस्तमोहमद पठाण जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत त्रयस्थ पक्ष श्री. डी. के. दुगे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ परभणीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित एफ-१०९८ चे ९२-९३ पासूनचे आजपर्यतचे आपले कार्यालयास सादर केलेले संचालक मंडळाचे प्रति.

२. मी आपले कार्यालयात न्याय मिळणेसाठी किती निवेदनाचे प्रति सादर केल्या व त्यावर आपले कार्यालयाचे केलेली कार्यवाहीची टिपण्णी आदेशाची प्रति व संस्थेवर केलेली कार्यवाहीची प्रत.

३. जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित निवासी अस्थिव्यंग विद्यालय वसमत निवासी मुकबधीर विद्यालय वसमत, निवासी मतिमंद विद्यालय वसमत, येथील आपण ९५-९६ पासून केलेले तपासणी अहवालाचे प्रति.

४. माझे निवेदनावर व अपंग आयुक्त पुणे यांचे कडून व इतर वरिष्ठ पातळीवर वरुन आलेल्या पत्रव्यवहारावर आपण संस्थेची केलेली चौकशीची प्रत.

५. श्री. ङि के. दुर्गे माजी उपाध्यक्ष जि. प. हिंगोली यांनी दिलेल्या निवेदनावर आपण केलेली टिपण्णी व त्यांना निवेदनाचे संदर्भात दिलेल्या उत्तराची प्रत.

६. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे आपण माझे निवेदनावर केलेल्या कार्यवाहीबाबत टिपणी आदेश व केलेली कार्यवाहीची प्रत.

७. दिनांक १२-१२-२००१ चे पद मान्यतेचे आदेशाची प्रत व त्या आदेशाची संदर्भ क्रमांक १ ते ८ ची प्रत.

८. ९५-९६ पासून जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ परभणी संचलित एफ-१०९८/९१ चे तिनही निवासी शाळेस दिलेले वेत्तोनोतर अनुदान प्रति वर्ष निहाय आजपावेतो.

९. माझे १२-१२-२००१ चे पद मुख्य कार्यकारी अधिकारी हिंगोली यांनी रद्द केल्याबाबतचे त्यांचे टिपणी मान्यतेची प्रत.

१०. निवासी अस्थिव्यंग विद्यालय वसमत येथील दिड वर्षापासून अनाधिकृत गैरहजर असलेल्या कर्मचा-याच्या रिक्त जागी कोणी काम केले व संस्थेने दिलेले वृत्त पत्रात दिलेल्या जाहीर प्रगटनाची प्रत. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात आला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक

१६-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे सदर अपील करीत असल्याचे कारण त्यांनी अपिलाचे प्रयोजन म्हणून दर्शवून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंतही मिळाली नसून या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक २९-०५-२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जाच्या वेळी श्री. व्ही. पी. सोळंकी नावाचे अधिकारी व इतर अधिकारी कार्यरत होते. श्री. व्ही. पी. सोळंकी हे सध्या गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली येथे कार्यरत आहेत. संबंधीत अधिका-यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का दिली नाही याची कारणे आता ते सांगू शकत नाहीत. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या मुद्दयावरील माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १०-०६-२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी का निर्णय घेतला नाही याची कारणे त्यांना माहिती नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने

माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ६ च्या तरतुदीच्या अनुषंगाने विहित नमुन्यामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी प्रथम माहितीसाठीचा अर्ज केला होता. त्या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्दयावर माहिती मागविली होती. परंतु अपिलार्थीच्या या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या १० मुद्दयापैकी ४ मुद्दयावरील माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात विचारली असल्यामुळे व ही माहिती इतर प्राधिकरणाकडे असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, ४, ६ व १० हे मुद्दे वगळून उर्वरीत ६ मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदी नुसार द्यावी लागेल. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६-०३-२००७ रोजी प्राप्त झाला होता. सदर अर्ज प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आवक / जावक लिपिकाने त्यांच्या कार्यालयाचा शिक्का व पोच सही दिली आहे. यावरुन हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होऊनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही टप्प्यावर कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व तिची व्याप्ती पाहता ती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विशेष कष्ट घ्यावे लागले असते असे संभवत नाही. केवळ इच्छाशक्तीचा अभाव याच कारणाने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली

नसावी असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जाकडे त्यांनी पूर्णतः दुर्लक्ष करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून - जो त्यांचा हक्क आहे - कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवले आहेच परंतु या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे देखील त्यांनी या प्रकरणी पुरेपूर दर्शन घडविले आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस येथे निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीचा भंग करुन त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई दर्शविली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच, त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य

प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सोळंके मन्मथ गंगाधर, व्दारा- सौ. रत्नमाला शिंदे, बॅक कॉलनी, अहिल्यादेवि कन्या शाळेजवळ, वसमत तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२५१

निर्णय दिनांक : १२.०६.२००८

१ श्री. बाबूराव माधवराव शिंदे, : अपीलार्थी
मु.पो.हरिश्चंद्र पिंप्री ता. वडवणी जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, वडवणी जि.बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०६.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. वशिष्ट मसु तावरे, कनिष्ठ अभियंता, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी जि.बीड यांचे प्रतिनिधी ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजेंद्र रामराव भारती, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे प्रतिनिधी ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. बाबूराव माधवराव शिंदे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १३.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये सन २००१ ते २००६ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील मंजूर झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व इतर बाबीसंदर्भात त्यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " २००१ ते २००६ पर्यंत मंजूर झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहीरी कोठे खोदल्या आहेत व कोणत्या योजनेअंतर्गत मंजूरी मिळाली व त्यासाठी किती निधी उपलब्ध झाला.
>
> १) पिण्याच्या पाण्याचा विहीरी सार्वजनिक व मागासवर्गीय वस्तीकरीता झालेल्या मंजूरच्या बाबत व १५.८.२००६ च्या ग्रामसभेचा इतिवृत्तांत.
>
> २) २००१ ते २००६ पर्यंतच्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी व जनावरांच्या हौद बांधकामाबाबत कोणत्या खात्यामार्फत योजना घेतली.
>
> ३) पिण्याच्या पाण्याची १९७२ च्या विहीर कोणत्या योजनेअंतर्गत कडे बसवले व सन २००१ ते २००६ पर्यंतच्या झालेल्या ग्रामसभेच्या वृत्तांताच्या प्रती. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०३.०३.२००७ व ०५.०३.२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती दिली व त्यातील ग्रामसभेच्या बैठकीच्या इतिवृत्तासंदर्भात त्यांचेकडील दि. ५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती त्यांना देण्याकरिता रु.२९०/-इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याकरता सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेनुसार अपिलार्थी यांनी दि. २२.३.२००७ रोजी

रु.२९०/-इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात पावती क्र. ४९४८० द्वारे केला व त्यांना हव्या असलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रती जन माहिती अधिकारी यांचेकडून हस्तगत करुन घेतल्या. सदर प्रती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पोचसही दिल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.०४.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०५.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ११.०५.२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे आदेश दिले आहेत.या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणतीही विशिष्ट कालमर्यादा घालून दिलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०८.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मागणी करुनही माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,अपिलार्थीस दि. १३.२.२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांना दि. ३.३.२००७ रोजी व दि.

२२.३.२००७ रोजी पुरविली आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहितीशी संबंधित कार्यालये -- लघु पाटबंधारे विभाग, ग्रामपंचायत/पंचायत समिती स्तरावरुन प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस का पुरविली नाही, याचे कारण विचारले असता, कोणतेही कारण ते आयोगास सांगू शकले नाहीत.आता उर्वरित माहिती त्या विभागाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासित केले.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १०.४.२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेऊन दि. ११.५.२००७ रोजी आदेश पारित केले आहेत, या आदेशामध्ये अपिलार्थीस त्यांनी विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी प्रथम अर्ज दि. १३.२.२००७ रोजी केला होता. या अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीस २००१ ते २००६ पर्यंत मंजूर झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी संदर्भात व या कामाकरिता उपलब्ध झालेल्या निधीचा व ग्रामसभेच्या २००१ ते २००६ या कालावधीतील झालेल्या बैठकांच्या इतिवृत्ताच्या प्रती हव्या असल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००१-०६ या कालावधीतील पिण्याच्या पाण्याच्या विहिरी कोठे कोठे घेतल्या आहेत, जनावरासाठी हौदाचे बांधकाम या कामासाठी किती निधी उपलब्ध झाला व या कालावधीत झालेल्या ग्रामसभेच्या बैठकांची इतिवृत्ते यांच्या सत्यप्रती इत्यादी माहितीची मागणी केली होती. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांनी दि. ३.३.२००७ रोजी आवश्यक

ती माहिती पुरविली आहे, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता अभियान, ग्राम पंचायत, हरिश्चंद्र पिंप्री यांच्याकडील माहिती दिली नसल्याचे नमुद केले आहे. सदर माहितीचा समावेश जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३.३.२००७ च्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीमध्ये नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती अपूरी असल्याचे ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, हरिश्चंद्र पिंप्री ता. वडवणी यांनी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. ५.३.२००७ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती लघुपाटबंधारे विभाग,ग्रामपंचायत,पंचायत समिती स्तरावरील होती व या सर्वांकडून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संकलीत करुन पुरविलेली नाही किंवा अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर अधिनियमातील कलम ६(३)(i) प्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ११.५.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये नमुद करुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित सर्व यंत्रणांकडून माहिती गोळा करुन ती अपिलार्थीस पुरविण्याचे सूचित केले होते. तथापि आजतागायत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीने तसे त्यांच्या युक्तीवादामध्ये मान्यही केलेले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहकारी व कर्मचारी यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून

कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवून, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १२.०६.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबूराव माधवराव शिंदे, मु.पो. हरिश्चंद्र पिंप्री, ता.वडवणी जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी जि.बीड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२५०

निर्णय दिनांक १२-०६-२००८

श्री. संदिपान आप्पाराव थोरात, : अपिलार्थी
मेडिसीन वर्ल्ड, मेन रोड, धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
कार्यालय उपविभागीय अभियंता
लघुपाटबंधारे उपविभाग, केज,
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास
महामंडळ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, (गोदावरी
मराठवाडा विकास पाटबंधारे
महामंडळ) बीड लघुपाटबंधारे बीड,
मुख्यालय अंबाजोगाई, जिल्हा बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, केज, जिल्हा बीड
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग, बीड मुख्यालय अंबाजोगाई

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संदिपान आप्पाराव थोरात हे गैरहजर आहेत तर श्री. मधुकर आश्रुबा मस्के जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, केज (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एम. व्ही. कुलकर्णी, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग, बीड मुख्यालय अंबाजोगाई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार कायदा लागू झाल्यापासून ते १२ ऑक्टोंबर २००५ पूर्वीच्या चार महिन्याच्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयात अधिनियमातील कलम ४ (१) प्रमाणे केलेल्या कारवाईबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ या कायद्याच्या कलम ४ (१) प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. के मा अ - २००५/प्र.क्र.१९०/०५/५ मंत्रालय मुंबई – ३२ दि. १८/०६/२००५ अन्वये १७ कामे सर्व प्राधिकरणांनी / आपल्या कार्यालयाने करणे बंधनकारक करण्यात आले होते. यासह केंद्र शासनाच्या दि. २६ मे २००५ चा आदेशही आपणाकडे शासनाने दिलेला आहे. या १७ कामांची (आपण मुदतीत केलेल्या) परिपूर्ण माहिती मला मुद्दानिहाय फीस सह कळवावा मला ही सर्व माहिती परिपूर्णरित्या पाहिजे आहे. कृपाया अर्धवट माहिती देवू नये. आपण माहिती अधिकारी नसाल तर आपण हे प्रकरण माहिती अधिकाराच्या कायद्याप्रमाणे माहिती अधिका-याकडे वर्ग करावे. ”

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस नेमक्या कोणत्या मुद्दयांची माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याचे त्यांना कळवून त्यांच्या कार्यालयामध्ये समक्ष हजर राहून अथवा टपालाव्दारे कळविल्यासही पूर्तता केली जाईल असे अपिलार्थीस सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) व (२) प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेण्याऐवजी सर्वप्रथम जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना निश्चित कोणत्या मुद्दयावर माहिती हवी आहे याची विचारणा केली. तदनंतर त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची दिनांक १७-०७-२००७ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन (उप कार्यकारी अभियंता यांचे दिनांक २५-०७-२००७ रोजीचे पत्र) दिसून येते. दिनांक १७-०७-२००७ रोजी झालेल्या कथित सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना लेखी विचारणा केल्यानंतरही त्यांच्या मूळ अर्जाबाबत खुलासा केला नसल्याने, त्यांचे अपील फेटाळून लावले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उप कार्यकारी अभियंता यांच्या सहीने दिनांक २४-०५-२००७ रोजी माहिती दिल्याचे पत्र आयोगास सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची विनामूल्य मागणी कायम ठेऊन जन माहिती

अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) व (२) अन्वये कारवाई करण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना, निश्चितपणे अपिलार्थीस कोणती माहिती द्यावयाची त्याचा अर्थबोध न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या पत्राप्रमाणे कळविले. तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडूनही अपिलार्थीस, त्यांना नेमकी कोणती माहिती हवी असे कळविले गेले. तथापि अपिलार्थीचे त्यांना कोणतेही पत्र आले नाही व त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता ते ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अधिकारपत्र दिले असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे वेगळा युक्तिवाद केला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती विशिष्ट स्वरुपाची अशी होती. या माहितीमध्ये, उप अभियंता व कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांना अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती हवी आहे हे न कळणे म्हणजे हे दोन्ही अधिकारी सध्या ते कार्यरत असलेल्या पदावरील किमान पात्रता तरी धारण करतात किंवा कसे याबाबत संदेह निर्माण करणारे आहेत, असे येथे म्हटल्यास वावगे होणार नाही. या दोन्ही अधिका-यांना आपापल्या पदाची

जबाबदारी व कर्तव्य याचे फारसे ज्ञान नसावे असे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते.

अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) च्या संदर्भात माहिती कशी असू नये याचे हे प्रकरण उत्तम नमुना असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीशी त्यांनी दिलेली कथित मुद्दयांची माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे तर काही मुद्दयावरील माहिती संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयामध्ये उपलब्ध आहे, याबाबतचे विवरण महामंडळाच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल, संबंधीत कर्मचा-याकडे ठेवण्यात आलेली आहे, अशा प्रकारे दिले आहे. कलम ४ (१) मध्ये कलम १० अन्वये प्रत्येक कर्मचारी व अधिकारी यांना मिळणारे मासिक वेतन जाहीर करण्याचे अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस - संबंधीत कर्मचा-याकडे ठेवण्यात आली आहे - अशा प्रकारे दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे केलेले विडंबन आहे, असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमामधील कलम ४ (१) मध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने स्वतःहून त्यांच्याकडील माहिती नागरिकांना माहितीसाठी उपलब्ध करुन द्यावयाची आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित माहितीचे स्वरुप पाहिल्यास त्यांनी अपिलार्थीस एकाही मुद्दयावर सरळ व स्पष्ट माहिती दिली नसल्याचे दिसून येते. उलट अपिलार्थीपासून काही माहिती लपविण्याचा त्यांचा कल असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४ (१) प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीची अंतीम मुदत दिनांक १२-१०-२००५ अशी होती. उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अधिनियमामध्ये प्रसिध्द केलेली विहित मुदत टळून गेल्यानंतरही १ वर्षे ३ महिने इतका कालावधीनंतरही या आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांच्याकडून न होणे हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीस निश्चितपणे पोषक नाही किबहुना ते मारकच आहे असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबधीत सहाय्यक अधिकारी / कर्मचारी निश्चितपणे जबाबदार ठरत असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा उशिरा, चुकीची, अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती या प्रकरणी त्यांनी दिल्याचे निःसंशयपणे सिध्द झाल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक अधिकारी / कर्मचारी यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०

(१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यामध्ये करावा.

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग, बीड मुख्यालय अंबाजोगाई यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा जास्तीत जास्त पाच हप्त्यात शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला या संदर्भातील अनुपालन अहवाल तदनंतर जुलै २००८ पासून दरमहा आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगास आश्वासीत केले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता टळून गेला असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती आता अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (१) च्या अंमल-बजावणी संदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे फारसे गंभीर नाहीत असे आयोगास दिसून आले आहे. या क्षेत्रीय कार्यालया-सारखीच परिस्थिती जलसंपदा विभागाच्या इतर कार्यालयांमध्येही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भात सचिव (जलसंपदा) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे अधिनियमातील कलम

४ च्या अंमलबजावणीसंदर्भात निश्चित धोरण ठरवून एका विशिष्ट कालावधीमध्ये जो २ महिन्याहून जास्त असणार नाही त्याची अंमलबजावणी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी कर्मचारी यांना मिळून एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालात केलेल्या विवेचनाप्रमाणे एक महिन्याच्या आत करावा.

४ संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा जास्तीत जास्त पाच हप्त्यात शासकीय कोषागारात करतील असे कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग, बीड मुख्यालय अंबाजोगाई यांनी पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून दरमहा नियमितपणे सदर शास्तीची रक्कम शासकीय

कोषागारामध्ये पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १२-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संदिपान आप्पाराव थोरात, मेडिसीन वर्ल्ड, मेन रोड, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे उपविभाग, केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग, बीड मुख्यालय अंबाजोगाई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३४

निर्णय दिनांक १३-०६-२००८

श्री. बळवंत किशनराव मोरे, : अपिलार्थी
व्दारा- तिरुमला एस. टी. डी.
विष्णूनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,
नांदेड

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : तालुका कृषि अधिकारी, बिलोली, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बळवंत किशनराव मोरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अजीजखान दौलतखान, जन माहिती

अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मैनोद्दीन काशिमसाब आझर, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बिलोली तालुक्यातील कामा-साठी धान्य योजनेची कामे इतर तालुक्यातील कर्मचा-यांकडून करवून घेतल्याबाबत २००६-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. "कामासाठी धान्य" योजनेअंतर्गत २००६-२००७ वर्षात झालेल्या कामाची कामनिहाय, गावनिहाय, पगारपत्रकाची, तसेच पे बीलाच्या छायांकीत सत्यप्रती.

२. आपल्या कार्यकक्षेमधील वरील कामे दुस-या तालुक्यातील कर्मचा-यांनी केली त्यांची नांवे, पदे व केव्हापासून व कामनिहाय, गावनिहाय, कामाची माहिती अहवाल.

३. वरील कामाची मूळ अंदाजपत्रके, कामनिहाय खर्च झालेली रक्कम, आपण स्वतः या कामाची तपासणी केलीबाबतचा अहवाल.

४. तालुकासाहय कर्मचा-यांनी वरील कामांची देयके त्यांच्या स्वाक्षरीने आपणाकडे सादर केली अशी नियमबाह्य बिले आपण कोणत्या अधिकार व कायद्याने मंजूर केली त्या अधिकारपत्राची नक्कल.

५. ता. कृ. अ. या पदावर आपण बिलोली येथे रुजू झालेचा दिनांक व त्या आधीची कामाची बीले आपण कोणत्या अधिकाराने मंजूर केली त्या अधिकारपत्राची नक्कल.

६. वरील सर्व देयके मंजुरीच्या कार्यालयीन टिप्पणीची नक्कल.

७. धान्य वाटपपत्रकाची नक्कल."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सरळ प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी यांना उद्देशून केलेला दिनांक २६-०२-२००७ रोजीचा अर्ज या प्रकरणी जे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले होते ते श्री. देशपांडे त्यांच्याकडे त्यांनी तो दिनांक २७-०२-२००७ रोजी हस्तांतरीत केला. सदर अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याची पोच त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर दिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना उद्देशून केले आहे. उपरोक्त प्रकरणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या अपील अर्जावर तालुका कृषि अधिकारी, बिलोली यांना त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले असल्याचे नमूद करुन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढल्याचे त्यांना कळविले. या पत्राची प्रत त्यांनी तालुका कृषि अधिकारी यांना दिली आहे.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी या पत्राबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व अपिल अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविली नाही व

जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे या कागदपत्रांची मागणी न केल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकला नाही. परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००७ रोजी अर्ज दाखल करुन त्यांना आजपावेतो म्हणजे सुमारे एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक अथवा त्यांनी दिलेल्या निर्णयावर निश्चितपणे कोणाकडे अपील करावयाचे याची माहिती न झाल्याने, त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी जे, कृषि विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी आहेत त्यांच्याकडे माहिती प्राप्त होण्यासाठी प्रथम अपील केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या पदावर ते दिनांक २९-११-२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी श्री. आर. पी. देशपांडे नावाचे कर्मचारी मंडळ कृषि अधिकारी तथा जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांना तालुका कृषि अधिकारी यांनी

सुनावणीस उपस्थित राहण्यास दिनांक ०५-०६-२००८ रोजी सूचना देऊन देखील ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत ते माहिती का देऊ शकले नाहीत याची माहिती संबंधीत माहिती अधिकारी देऊ शकतील. त्यांनी पदभार स्विकारण्यापूर्वी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दिनांक ०५-०९-२००७ रोजी केले असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काही प्रयत्न केले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती पैकी ७५ टक्के माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून उर्वरीत २५ टक्के माहिती ७ दिवसाच्या आत तयार होईल व यानंतर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य देण्यात येईल असे त्यांनी अंतिमतः आयोगास आश्वासित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने या अपील अर्जावर ते सुनावणी घेऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा दिनांक २६-०२-२००७ रोजीचा मूळ अर्ज जरी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नव्हता तरी, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज दुस-याच दिवशी (दिनांक २७-०२-२००७ रोजी) या प्रकरणी प्रत्यक्षात ज्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे त्यांच्याकडे हस्तांतरीत केला. सदर जन माहिती अधिकारी यांचे नाव श्री. आर. पी. देशपांडे असे आहे. आज सुनावणीस त्यांना हजर राहण्यासाठी तालुका कृषि अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००८ रोजी सूचना देऊनही ते हजर नाहीत. यावरुन संबंधीत कर्मचा-याचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात किती निष्क्रीय दृष्टीकोन आहे, हे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती तर दिलीच नाही परंतु आपली बाजू मांडण्या-

साठी ते त्यांच्या वरिष्ठांनी सूचना देऊन देखील आयोगाच्या सुनावणीस हजर राहिले नाहीत, या बाबीची येथे गांभीर्यपूर्वक नोंद घेण्यात येत आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे दिनांक ०५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. स्वतः जन अपिलीय अधिकारी नसल्याकारणाने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या पत्राबरोबर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठवावयास हवा होता, परंतु त्यांनी अपिलार्थीचा मूळ अपील अर्ज अथवा त्याची प्रत या प्रकरणी जे प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत त्यांच्याकडे न पाठविता, त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याची सूचना दिली. या टप्प्यावर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधिताकडे हस्तांतरीत न करण्याची गंभीर चूक झाली असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या गंभीर चूका त्यांनी यापुढे टाळाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या चूकीमुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही, माहिती प्राप्त झाली नाही व त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करणे भाग पडले. वास्तविक पाहता जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी या सर्व अधिका-यांची कार्यालये एकाच ठिकाणी असताना, ती कार्यालये जनसामान्यांना माहिती देण्यासंर्भात कशा प्रकारची वागणूक देतात, त्याचे हे प्रकरण म्हणजे एक मुर्तीमंत उदाहरण आहे. तालुका कृषि अधिकारी यांनी, त्यांना जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर अपिलार्थीच्या मूळ अर्जाची अथवा अपील अर्जाची थोडीशी जरी विचारणा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे केली असती तर त्यांना अपिलार्थीच्या अपील अर्जाची प्रत मिळू शकली असती. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जाची प्रत प्राप्त करुन घेण्याचे साधे सौजन्यही त्यांनी

या प्रकरणी दाखविल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने आज सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांच्या विरुध्द अपील कोणाकडे करावयाचे याचे फलक दर्शनी भागामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लावले नसल्याचे अवगत केले. यावरुन तर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची अंमलबजावणी करण्याकरिता करावी लागणारी प्राथमिक तयारी देखील नांदेड जिल्ह्यातील कृषि विभागाने केली नसल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन करता, त्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडे मागणी केलेली माहिती ही वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे व या माहितीस कोणताही आधार नसल्याने ती जन माहिती अधिकारी यांना वृथा विचारल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये त्यांनी आपणाकडे सादर केलेली काही नियमबाह्य बीले आपण कोणत्या अधिकार व कायद्याने मंजूर केली त्या अधिकार पत्राची नक्कल मागितली आहे. कोणत्याही शासन व्यवस्थेमध्ये बेकायदेशीर व नियमबाह्य बीले प्रदान करण्याची तरतूद कोठेही, कोणत्याही अधिनियमाव्दारे अथवा परिपत्रकाव्दारे असणे शक्य नाही या बाबीची अपिलार्थीस पूर्णतः कल्पना असूनही, अपिलार्थीने माहिती अधिकाराखाली अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारणे, हे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. कोणत्याही जन माहिती अधिका-याकडे माहिती विचारतांना अर्जदाराने संयम व विवेक बाळगणे गरजेचे आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे संयम व विवेक बाळगून माहिती मागणे अशा प्रकारचे गृहीतक माहिती अधिकार अधिनियमामागे आहे, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी व येथून पुढे अशा प्रकारच्या माहितीची मागणी करण्याचे त्यांनी टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित ५ मुद्दयांशी

संबंधीत माहिती मात्र अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देणे भाग आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी प्रामुख्याने जन माहिती अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हे जबाबदार ठरत आहेत. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, तो जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केल्या गेलेल्या अधिका-याकडे त्वरीत हस्तांतरीत केला असता तर अपिलार्थीच्या अपील अर्जाचा त्यांच्या स्तरावर निर्णय होऊन अपिलार्थीस यापूर्वीच माहिती प्राप्त होऊ शकली असती, परंतु अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हस्तांतरीत न करता तो स्वतःकडे विनाकारवाई ठेऊन दिल्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून अधिक कालावधीकरिता वंचित राहावे लागले.

अपिलार्थीने आयोगाकडे अवगत केलेल्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या फलकाच्या वस्तुस्थितीसंदर्भात जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक व पदनामाचे फलक सहजपणे दृष्टीस पडतील अशा पध्दतीने लावावेत.

वरील वस्तुस्थिती, घटनाक्रमाचे विवेचन पाहता अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित

ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी हे प्रामुख्याने जबाबदार ठरत असून, अपिलार्थी-च्या अर्जास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही न देऊन व त्याव्दारे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत व या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली करावा,

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी, वरील आदेश क्रमांक ३ चे अनुपालन कसे होईल हे पहावे व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास जुलै २००८ पासून नियमीतपणे सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बळवंत किशनराव मोरे, व्दारा- तिरुमला एस. टी. डी. विष्णूनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३३५

निर्णय दिनांक १३-०६-२००८

श्री. एकनाथ राजाराम जाधव, : अपिलार्थी
रा. बोरगाव तालुका हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तहसील कार्यालय, हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०६-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राधाकिसन बंडूजी तुपे, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, हिमायतनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर

अपिलार्थी श्री. एकनाथ राजाराम जाधव व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार हे गैरहजर आहेत

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत राबविल्या जाणा-या संजय गांधी निराधार योजनेसंदर्भात ०१ जानेवारी २००५ पासूनची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " आपल्या कार्यालयामार्फत राबविल्या जाणा-या संजय गांधी निराधार योजनेची मासिक सभा किती किती दिवसांना घेणे बंधनकारक आहे मागील २००५ पासून आतापर्यत झालेल्या मीटीगाची माहीती सविस्तर देणे या योजनेत कीती लाभार्थी वगळण्यात आले त्यांची नांवे व त्यांना का वगळण्यात आले त्यांना लावलेले निकष कोणते ? व नविन किती लाभार्थीची निवड करण्यात आली ? शासनामार्फत अशा राबविल्या जाणा-या योजना कीती ? कोणाकोणाला ल्याचा लाभ देण्यात आला व या योजनेचे निकष कोणकोणते आहेत ह्याची सविस्तर माहिती गाववार, नाववार देणे. या योजनेवर (सर्व) शासनाकडून किती रक्कम उपलब्ध झाली ? लाभार्थीचा वाटप किती झाली व बॅकात शिल्लक किती संबंधीत सर्व योजनेवर प्रशासकीय खर्चाकरिता किती रक्कम उपलब्ध झाली व ती कशा पध्दतीने खर्च करण्यात आली ह्याची सविस्तर माहिती दि. ०१ जानेवारी २००५ पासून देणे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००७ रोजी प्राप्त झाल्याची कबुली अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या दिनांक

नसलेल्या निवेदनाव्दारे दिली आहे. सदर निवेदनाची झेरॉक्स प्रत उपस्थित नायब तहसीलदार (महसूल) श्री. राधाकिसन बंडूजी तुपे यांनी समक्ष उपस्थित राहून दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्यासाठी, उडवाउडवी केल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी पत्र लिहून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये यापुर्वीच माहिती दिली असल्याचे कळवून त्यांचा प्रथम अपील अर्ज खारीज केल्याचे अपिलार्थीस कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिनांक १०-०५-२००७ रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी हे दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने अपिलार्थीस ही माहिती प्रत्यक्षः दिनांक २८-०७-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन देखील त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. तसेच त्यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये पाठविलेल्या माहितीवर अपिलार्थी यांचे समाधान झाले आहे व त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबद्दल त्यांचा कोणताही आक्षेप नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून त्याव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दल कारणे अपेक्षिली आहेत. अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील काही भागाकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तहसीलदार, हदगाव यांच्याकडे मिळू शकेल असे नमूद करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या निकषासंदर्भातील माहिती, अपिलार्थीस निकषाच्या प्रती देण्याऐवजी सदर निकषाबाबत स्थायी आदेशाच्या संचिका त्यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करुन मिळेल, असे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या संजय गांधी निराधार योजनाच्या निकषासंदर्भात त्यांना शासनाकडून प्राप्त झालेले आदेश, परिपत्रके इत्यादीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस या

प्रकरणी देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. आता अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेल्या निवेदन पत्रामध्ये त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे, या माहितीवर त्यांचे समाधान झाल्याचे नमूद केले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नसल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडण करण्यासाठी आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी देखील आयोगासमोर त्यांना सुनावणीची पूर्वकल्पना असूनही अनुपस्थित आहेत, हे पाहता अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व अपील चालविण्यामध्ये फारसे स्वारस्य नसल्याचे दिसून येते. या सर्व कारणास्तव अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-०६-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. एकनाथ राजाराम जाधव, रा. बोरगाव तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील

कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.